शनिवार । १८ जुलै १९८१ । एक रुपया

# माणूस

## सप्रेम नमस्कार...

☐ नोव्हेंबर ८० तो आजतागायत आपल्या साप्ताहिकाने शेतकरी चळवळ, शेतकरी संघटना व शेतकरी नेते श्री. शरद जोशी आणि शेतकरी समाज यांना फार आस्थापूर्वक, वस्तुस्थितीची जाण ठेवून सहानुभूतीची वागणूक दिली त्याबद्दल मी स्वतः व चांदवड या दुष्काळी तालुक्याच्या शेतकऱ्यांच्या वतीने आपला फार फार आभारी व ऋणी आहे. 'माणूस' आज खेड्यापाड्यातला मुंडासेवाला विकत घेऊन वाचतो आहे. यामुळे पेपर स्टॉलवालेही चक्रावतात !

७ जुलै ८१ — भास्कर शिवराम गांगुर्डे
सोग्रस, ता. चांदवड, जि. नासिक

☐ 'साप्ताहिक माणूस' आवर्जून विकत घेऊन वाचणारा मी एक. वाचकांच्या यक्षप्रश्नांना नेहमीच महत्त्व देऊन त्यासंबंधीचे लेख आपण देत असता. आजच दि. ११ जुलैचा अंक मिळाला. त्यातही आम्हा मुंबईकरांच्या जिव्हाळ्याचा प्रश्न 'लोकल्स'–चर्चिला गेला आहे. त्यात लोकलवर काम करणाऱ्यांची बाजू मुलाखतीद्वारा श्री. राजे ह्यांनी मांडली आहे. त्याबद्दल आपले आभार.

—पण त्यामुळेच एक प्रश्न मनात निर्माण झाला. काही काही वेळेस काही पत्रांची सुरुवातच आपण 'फ्रंट' पेजवर करता–त्याला महत्त्व देता; परंतु ह्या मुंबईकरांच्या जिव्हाळ्याच्या विषयासंबंधीचे वर्णन फ्रंट पेजवर–कमीत कमी –' मध्य रेल्वेची बदनाम लोकल वाहतूक'–आत पहा–असे असते तर काय

→

## पुस्तके

**दि. के. बेडेकरांना गाडगीळांच्या कथेत मानवी जंतूसाठी वेदांत दिसला. गाडगीळांना जी. एं. मध्ये एक गरगरणारा भोवरा दिसत आहे. कोठेतरी काहीतरी चुकते आहे खचित. कारण रसिक वाचकाला त्या दोन्ही लेखकांच्या श्रेष्ठ कलाकृतीत फक्त एक तरल, आर्त, स्वच्छ जीवनस्पर्शच होत होता.**

पृष्ठ....१६

बिघडले असते? मुंबईत कुतूहल वाढून विक्री वाढली असती ह्याची तुम्हाला भीती वाटली?

देवळाचे चित्र कशाकरिता ?

चांगल्या लेखाव्दारेसुद्धा 'धंदा' बघा-यचाच नाही, असं काही आपण व्रत घेतलं की काय ?

१० जुलै ८१ — म. वि. रानडे, डोंबिवली

## 'रोटरी'बद्दल असा मत्सर का ?

□ 'माणूस'च्या ४ जुलैच्या अंकात 'मुंबई वार्ता' सदरात 'ताजमहाली रोटेरिअन्ससह दिग्दर्शिका' वाचले. 'थंडगार' वातावरणाला सरावलेला कोणी 'प्रतिष्ठित' सहसा अशा वृत्तपत्रीय वृत्तांताचा प्रतिवाद करायला जात नाही आणि जर वृत्तांत प्रामाणिक असेल तर तस करायचं कारणही नाही; पण 'रोटरी-लायन्स' ही नावे म्हणजे एक तुच्छतादर्शक शिवी होणार असेल तर कोणी तरी दुसरीही बाजू मांडायला पाहिजे; म्हणून हे पत्र.

रोटरीबद्दल वरील रिपोर्टसारखे आपले प्रतिनिधी जेव्हा उपहासगर्भ किंबहुना तुच्छतादर्शक विधाने करतात, त्या वेळी वाटते, असे का व्हावे ? खरे विचारले तर मला वाटते की, 'कोल्ह्याला द्राक्षे आंबटच' वाटायची !

मुंबईच्या ताजमहालात जशा रोटरीच्या सभा होतात, त्याचप्रमाणे भारतात (व इतर देशातही–असे देश व विभाग आता १५६ झाले आहेत.) कोरेगाव, जयसिंगपूर, चिपळूण, चिकोडीसारख्या तशा आडवळणाच्या लहानसहान गावीही त्या नियमितपणाने होत असतात. या सभा गावात उपलब्ध असलेला एखादा हॉल, शाळा, चावडीसारख्या ठिकाणीही होतात. तिथे 'थंडगार' वातावरण नसते किंवा आपल्या प्रतिनिधीच्या डोळयाला खुपणारी चैनीची कोणतीही साधने नसतात आणि एकूण रोटरी-सभासदापैकी बहुसंख्य सभासद आता लहान-सहान गावांतील आहेत हे आकडेवारीनेही सांगता येईल. म्हणून रोटरी म्हणजे काही केवळ ताजमहाल, ओबेरॉय नव्हे. स्थानिक परिस्थितीनुसार आणि सभासदाच्या प्रभावानुसार व सोयीनुसार कोठलीही जागा असू शकते.

'सर्व रोटेरियन्स आपली 'मिड-डे मील्स' वगैरे तेथेच घेऊन मोकळी झाली', यावरील वृत्तातातील वाक्याबद्दल मी फक्त लेखिकेची कीव करू शकतो. कारण प्रगत औद्योगिक शहरात अशा लंच मीटिंग का घ्याव्या लागतात याची काहीही कल्पना त्यांना नसावी आणि ती माहिती घेण्याचा कसलाही प्रयत्न त्यांनी केला नसावा. 'लंच' किंवा 'डिनर'चे समर्थन करण्याची ही जागा नसल्याने मी लेखकांनी जरा अधिक माहिती घ्यावी एवढेच सुचवीन.

रोटरीच्या अशा काही पद्धतीचे मूळ आणि उपयुक्तता यांचा बारकाईने विचार केला आणि समजावून घेतले तर केवळ मत्सरग्रस्त व्यक्तींखेरीज अन्य कोणी अशी टीका करणार नाहीत. अर्थात त्याला खुले मन हवे.

'कार्यक्रमाला वेळ कमी पडेल' असे 'आश्वासन' वगैरे मजकूरही एका 'Holier than Thou' या वृत्तीतून उतरलेला असावा. अपंगांसाठी प्रत्यक्ष कार्य रोटरी काय करते आणि जगभर किती करते याची माहिती हवी तर लेखिकेने योग्य रोटरी अधिकाऱ्याकडून मिळवावी, मग आपले मत बनवावे. छिद्रान्वेषी दृष्टीने काही साधणार नाही.

'रोटरी, लायन्स, जेसीजच्या सभा अशाच होत असतात' हे असेच आणखी एक सरधोपट आक्षेपार्ह विधान. सगळ्याच संघटनाच्या बाबतीत विधान करताना लेखिकेने अशा किती सभा पाहिल्या वा लक्षात घेतल्या ते कळत नाही. 'अशाच' सभा घ्यायला खरे तर रोटेरिअन्ससारख्यांना तसा वेळ नसतो. वेळात वेळ काढून ते सभाना उपस्थित राहतात ते काय केवळ चैन म्हणून ? चैन किंवा ढोंगच करायचे असेल तर या वर्गातील लोकाना अन्य मार्ग उपलब्ध नसतात काय ? (वास्तविक नियमित सभांना सभासदांना हजर ठेवणे हे एक संघटकांना आव्हानच असते.)

मी केवळ रोटरी-सभासद आहे म्हणूनच हा लेखनाचा प्रपंच करतो आहे असे नव्हे, तर याकडे आता एका वेगळ्या दृष्टीने पाहिले पाहिजे आणि काही तरी पूर्वग्रहामुळे आणि असूयेने लिहिले जाऊ नये असे मला वाटते म्हणून. कारण आजच्या एकूण सामाजिक संदर्भामध्ये रोटरीसारखी एखादी संस्था वेगळी काढून तीवर उपहासात्मक लिहिणे कितपत न्याय्य आहे ? असे लेखन म्हणजे सवंग लोकप्रियता मिळविण्याचा मार्ग होईल.

पैसा मिळविणे हा काही गुन्हा नव्हे


**साप्ताहिक माणूस**

वर्ष : एकविसावे

अंक : सातवा

१८ जुलै १९८१

किंमत : एक रुपया

संपादक
श्री. ग. माजगावकर

सहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

वार्षिक वर्गणी :
चाळीस रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे, येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

**साप्ताहिक माणूस**
१०२५ सदाशिव, पुणे ३०. दूरध्वनी : ४४३४५९

त्याचा उपभोग घेणे हेही स्वाभाविक म्हणावे लागेल. मात्र त्याचे प्रदर्शन वा गैरवापर होऊ नये हे तत्त्व म्हणून कोणालाही मान्य होईल; पण आजच्या परिस्थितीत इतरत्र तरी काय दिसते ? रोटरीसारख्या संघटनांचा दूरान्वयानेसुद्धा संबंध नसलेले शासकीय अधिकारी, स्वायत्त संस्थांचे निर्वाचित सदस्य व पदाधिकारी, श्रीमंत बागायतदार, राजकीय पुढारी, कामगार पुढारी इत्यादींचे बाबतीत वस्तुस्थिती काय आहे ? अर्थात रोटरीचे समर्थन म्हणून या परिस्थितीचा उल्लेख केलेला नाही, तर एकूण सामाजिक परिस्थिती जी असते आणि आहे त्याचेच काहीसे प्रतिबिंब आपल्या समाजजीवनातल्या प्रत्येक संस्थेमध्ये कमी-अधिक प्रमाणात पडणार हे कटु असले तरी सत्य आहे. म्हणून मला म्हणावेसे वाटते की, एखाद्या संस्थेवर तिला वेगळी काढून टीका करणे अन्यायाचे ठरेल.

वास्तविक रोटरी सभासद कोण आहेत ? अनेकदा कामगाराहून अधिक काम करणारे, प्रचंड जबाबदाऱ्या स्वीकारणारे व त्यामुळे उद्भवणारे ताण आणि तणाव सहन करणारे कुशल व्यवस्थापक, आपापल्या क्षेत्रात काही नाव मिळविलेले, नेतृत्वाचे गुण अंगी असणारे, निर्मितिक्षमता असणारे आणि रोटरीसारख्या संस्थांत तरी अजिबात भ्रष्टाचार न करणारे राजकारणविरहित असेच लोक आहेत, याची दखल आता समाजानेही घ्यावी. विज्ञाननिष्ठ इहवादाची दृष्टी असलेल्या जीवनोन्मुख वृत्तीच्या या माणसांचीही काही बाजू असेल एवढा विचार करून, मगच लेखणी उचलावी. टीकेचे आम्हाला मुळीच वावडे नाही; पण ती द्वेषमूलक, असूयायुक्त वा मत्सरग्रस्त किंवा थिल्लर नसावी एवढेच आमचे मागणे.

५ जुलै — रोटेरियन माधव धोपेश्वरकर
द्वारा, जयेन्द्र पब्लिसिटी
कोल्हापूर.

## ९ जुलै—संध्याकाळ

२९ जून ८१ ... त्या दिवशी रात्री आम्ही काकांचा, ख्यातनाम साहित्यिक दि. बा. मोकाशींचा शेवटचा निरोप घेतला. 'वैकुंठ'मध्ये चिरनिद्रेतील काकांचे, जवळ जाऊन मी शेवटचे दर्शन घेतले आणि हळूच म्हणालो, 'गुडनाईट, काका !'......बहुधा रोज रात्री आमच्या गप्पा झाल्यानंतर आम्ही वाड्यातील मुले काकांचा असाच निरोप घेत असू. गेल्या कित्येक रात्री पाठीच्या वेदनांमुळे काकांना सुखाची निद्रा जवळ जवळ पारखी झालेली होती. आज त्या वेदना संपल्या होत्या. काकांच्या गप्पागोष्टींनी हलणारा, बोलणारा, हसणारा, खिदळणारा भोंग वाडा आज सुना सुना झाला होता. शेजारी म्हणून काकांवर आमचे प्रेम होते. तसेच लेखक म्हणून, मित्र म्हणून असंख्य लोकांनी काकांवर मनापासून प्रेम केले...त्याचे प्रत्यंतर ९ जुलै रोजी त्यांच्या मित्रांनी आयोजित केलेल्या श्रद्धांजलीच्या सभेमध्ये आले...शोकसभा हा शब्द मी मुद्दाम टाळला आहे. कारण शोकसभेची अवकळा या संपूर्ण कार्यक्रमात जाणवली नाही. दुःख होते, गांभीर्य होते, पण दिखाऊपणा जराही नव्हता. जणू काही ही शोकमग्न संध्याकाळदेखील मोकाशींच्या स्मृतीने प्रसन्न झाली होती.

महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या सभागृहात झालेल्या या श्रद्धांजली सभेची सुरुवात श्री. श्री. ग. माजगावकर यांनी केली. सभेच्या कार्यक्रमाची माहिती त्यांनी दिली. त्यानंतर बोललेल्या वक्त्यांमध्ये स. शि. भावे, विद्याधर पुंडलिक, ज्योती मोकाशी, वि. रा. करंदीकर आणि श्री. ग. माजगावकर यांचा समावेश होता. पु. ल. देशपांडे यांच्या कथावाचनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

प्रसिद्ध समीक्षक प्रा. स. शि. भावे म्हणाले, "साधेपणा, सहजता हा जसा मोकाशींच्या व्यक्तिमत्वाचा विशेष होता, तसाच तो त्यांच्या साहित्याचाही होता. जाणीवपूर्वक लिहिणे मोकाशींना मान्य नव्हते. ते लिहिताना जाणीव विरघळून जात असे.



कै. दि. बा. मोकाशी

सामान्यतः लेखकाला स्वतःच्या लिखाणातून काही तरी सांगायचे असते, आणि आपण जे सांगणार आहोत त्याबद्दलचे एक कौतुक लेखकाच्या मनात असते. त्यामुळ अनेकदा चांगले साहित्य वाचल्यानंतरही शेवटी एक कडू चव उरते. मोकाशींच्या साहित्यात हा रेसिडयुअल भाग अनुभवास येत नसे.

"मोकाशींचे साहित्य वाचताना ते परकी आहे, बाहेरून आलेले आहे असे कधी जाणवले नाही. मोकाशींच्या साहित्यात दुःख आहे; पण गाडगीळांच्या साहित्यातील दुःख तात्विक, पढिक वाटते, तसे ते नाही किंवा खानोलकरांच्या साहित्यातील दुःखासारखे जीवनाचे संपूर्ण अस्तित्व झाकोळून टाकणारे असेही नाही. सर्वसामान्य माणसे ज्या दुःखांचा सहजपणे स्वीकार करतात ते दुःख मोकाशींना जाणवले आहे. हे दुःख सांगणारा, त्याचे विश्लेषण करणारा दुसरा साहित्यिक आपल्याकडे नाही. हा मोकाशींच्या साहित्याचा मोठेपणा आहे."

शेजारी असलेला लेखक म्हणून मोकाशींचे गुणविशेष सांगताना प्रसिद्ध साहित्यिक श्री. विद्याधर पुंडलिक म्हणाले, "शेजारची जागा रिकामी झाल्यानंतर, तुमच्यासारखाच चांगला भाडेकरू हवा असे मालकांनी सांगितले. तेव्हा माझ्यापेक्षाही चांगला भाडेकरू आणतो, असे मी मालकांना सांगितले आणि त्याप्रमाणे १९६६ मध्ये मोकाशी

आमच्या शेजारी राहण्यास आले. इतक्या वर्षांमध्ये मोकाशींचा आवाज टिपेला गेलेला मी कधी ऐकला नाही. लेखक म्हणून, माणूस म्हणून कोणत्या गोष्टीला किती महत्त्व द्यायचे हे फार थोडया लोकांना कळते. मोकाशींना ते कळले होते. मोकाशींना श्रीमंतीची हौस नव्हती; परंतु गंमत म्हणून लॉटरीचे तिकीट ते काढीत असत. त्यांना मी एकदा सहज विचारले, मोकाशी, लॉटरीचे तिकीट तुम्ही कसे काय आणता? तेव्हा हसतच त्यांनी प्रतिप्रश्न केला,

'मोकाशांना लॉटरी लागू नये असा सरकारने कट तर केलेला नाही ना?'

"शांतरस हा मोकाशींच्या साहित्याचा विशेष मला वाटतो. आवळून, टेन्स् लिहिलेले मला आवडत नाही असे ते म्हणत. ताण-रहित साहित्य लिहिणे, हेच मोकाशींचे वैशिष्टय होते. मोकाशी बरोबरीच्या इतर मराठी साहित्यिकाचे लिखाण फारसे वाचत नसत; परंतु इतरांशी साहित्यविषयक चर्चा करताना माझे तुम्ही वाचले पाहिजे असेही त्यांनी कधी सांगितले नाही. अशी डिसार्मिंग सिंप्लीसिटी-निर्व्याजता त्यांच्याजवळ होती. उंच झोका घेताना एका विशिष्ट क्षणी पोटात आनंदाचा खड्डा पडतो. हा आनंदाचा क्षण पकडणे, मोठा करणे हे मोकाशींच्या साहित्यात दिसते."

यानंतर नुकतीच बी. ए. झालेली मोकाशींची धाकटी मुलगी ज्योती बोलली. वडील म्हणून मोकाशींविषयी बोलताना ती म्हणाली, "लेखक म्हणून काका मोठे होतेच; परंतु वडील म्हणूनही ते अधिक चांगले होते. त्यांनी आम्हाला प्रेम करायला शिकविले. काका लेखक तर होतेच; परंतु इतरही अनेक गोष्टी करण्यात त्यांना रस होता. त्यांच्या अनेक छंदापैकी मुलांच्या पुस्तकांना सुबक कव्हरे घालणे हा एक त्यांचा आवडता छंद होता. त्यामुळे शाळेत आमची पुस्तकं उठून दिसायची. शाळा-कॉलेजमध्ये आम्ही पहिले आले पाहिजे असा त्यांचा अट्टाहास नसे. तर अनेक गोष्टींमध्ये आम्ही रस घ्यावा, अनेक गोष्टी स्वतःच्या स्वतः करण्यास शिकावे यावर त्यांचा भर असे. त्यांचा स्वतःचा ज्योतिषाचा छंद प्रसिद्धच होता. रॉयल्टीचा चेक येण्यास उशीर झाला की, ते गंमतीने आईला म्हणत, 'मालू, चंद्र कुठे आहे ते पाहिले पाहिजे.' त्यांनी आम्हाला भरपूर स्वातंत्र्य दिले. इंग्रजी वाचण्याच्या बाबतीत मात्र त्यांनी थोडी सक्ती केली व त्याचा आम्हाला फायदाच झाला. परीक्षेचे टेन्शन कमी करण्यासाठी दरवर्षी परीक्षेच्या आधी ते आम्हाला सिनेमा दाखवीत असत. तिथे मात्र निवड आमची असे."

यानंतर महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष डॉ. वि. रा. करंदीकर यानी परिषदेच्या वतीने मोकाशींना श्रद्धांजली वाहिली. शेवटी 'माणूस'चे संपादक श्री. श्री. ग. माजगावकर म्हणाले, "मोकाशी शांत स्वभावाचे खरे; परंतु प्रसंगी धावपळ करूनही त्यांनी लिखाण केल्याचे मला स्मरते. वीस वर्षांपूर्वी पानशेतच्या पुरानंतर पुण्यात खिन्न, उदासीन वातावरण पसरले होते. अशा वेळी 'सिटी दॅट वुडन्ट डाय' हे लंडन शहराने बॉम्बवर्षावाशी दिलेल्या सामन्याचे वर्णन चित्रित करणारे पुस्तक मिळवून त्याचा 'माणूस'साठी त्यांनी रातोरात अनुवाद करून दिला. अलीकडे 'माणूस'मध्ये 'संध्याकाळचे पुणे' हे सदर त्यांनी लिहिण्यास सुरुवात केली आणि त्यासाठी थोडी-फार दगदग, धावपळ हौसेने केली. 'संध्याकाळचे पुणे'मध्ये वृत्तान्तकथन तर आहेच, त्याचबरोबर मोकाशींमधील ललित लेखकही त्यामध्ये जागा आहे. त्यांच्या या वेगळ्याच स्वरूपाच्या लिखाणाला 'वृत्तांत-कथा' असे म्हणावयास हवे. मराठी साहित्याला आणि वृत्तपत्रसृष्टीलाही मोकाशींची ही नवी देणगी आहे."

यानंतर दुखवटयाचा ठराव वाचून दाखविण्यात आला व सर्वांनी उभे राहून मोकाशींना श्रद्धांजली वाहिली. कथावाचन सुरू होण्यापूर्वी अलीकडेच मोकाशींनी त्यांच्या नातवाला सांगितलेली एक लहानशी ध्वनिमुद्रित गोष्ट श्री. वि. ग. कानिटकरांनी श्रोत्यांना ऐकविली. मोकाशींचा आवाज ऐकत असताना त्यांच्या वियोगाचे दुःख गडद झाले होते होते. अशा वातावरणातच मोकाशींची 'आमोद सुनासी आले' ही खूप गाजलेली कथा वाचण्यास श्री. पु. ल. देशपांडे यांनी सुरुवात केलेली. कथा-वाचन संपले आणि मोकाशींच्या कसदार लिखाणाची स्मृती जागवीत त्यांच्या असंख्य चाहत्यांनी त्यांचा भावपूर्ण निरोप घेतला.

—अनिल काळे

पुणे वार्ता

# मंत्रिमंडळ बैठकीचा एकपात्री प्रयोग

होणार, होणार म्हणून गेला जवळजवळ महिनाभर गाजत असलेल्या राज्य मंत्रिमंडळाची विभागीय बैठक १०, ११ आणि १२ जुलै असे तीन दिवस पुण्यात पार पडली.

दहा जुलैला सकाळी दहाच्या सुमारास मुख्यमंत्री ए. आर. अंतुले यांचं विमान लोहगाव विमानतळावर उतरलं आणि या तीन दिवसातल्या धादल-धावपळीमध्ये खरा रंग भरायला सुरवात झाली. नियोजित वेळेपेक्षा मुख्यमंत्री जवळजवळ पावणेदोन तास उशीरा आले होते. त्यामुळे पुण्यात सकाळी नऊपासून आखण्यात आलेले त्यांचे सर्व कार्यक्रम तेवढा वेळ पुढे पुढे ढकलले गेले.

विमानतळावरून अंतुलेसाहेब कौन्सिल हॉलवर आले. या सबंध परिसराला एखाद्या लष्करी छावणीचंच स्वरूप प्राप्त झालं होतं. जिकडे तिकडे पोलीस, हेल्मेटधारी एसआरपीवाले आणि आठ-आठ दहा दहा फूट उंचीचे बांबूचे कठडे. निळया-जांभळया जीप गाडया आणि व्हॅन्सही भरपूर. शिवाय कमिशनराच्या ऑफीसमागच्या पटांगणात एस. टी. गाडया कधी निदर्शकांना धरून नेण्यासाठी, तर काही वेळा पोलीसांची ने-आण करण्यासाठी.

कौन्सिल हॉलच्या आवारात मुख्यमंत्र्यांच्या हस्ते वृक्षारोपण व्हायचं होतं. त्यामुळे त्यांची गाडी पोर्चमध्ये शिरल्यावर सर्व ज्येष्ठ पोलीस आणि मुलकी अधिकारी

मलपृष्ठ १ वर

# राजस्थान

## पहाडियांचा पहाड कोसळला

वा. दा. रानडे

गेल्या वर्षी काही राज्यात विधानसभाच्या निवडणुका होऊन इंदिरा कॉंग्रेसला बहुमत मिळालेल्या राज्यात जे नवे मुख्यमंत्री निवडले गेले त्याच्याविरुद्ध असंतुष्ट गटाच्या हालचाली तेव्हापासूनच सुरू झाल्या होत्या. पण या मुख्यमंत्र्याना एक वर्ष तरी काम करू द्या, त्यांच्या कामगिरीचा आढावा घेऊन आवश्यक वाटल्यास नेतृत्व बदलाचा विचार नंतर करता येईल, असे आवाहन पंतप्रधान श्रीमती गांधीनी केले होते. त्यामुळे बंडखोर गटांनी एक वर्ष कशीबशी तग धरली आणि वर्ष उलटताच त्यांच्या हालचालीना पुन्हा वेग आला आणि पहिला बळी राजस्थानचे मुख्यमंत्री जगन्नाथ पहाडियांचा पडला. पहाडिया मोठे कार्यक्षम व कर्तृत्ववान मुख्यमंत्री होते. केवळ गटबाजीने त्यांचा बळी घेतला असे येथे सुचित करावयाचे नाही. पहाडिया व त्याचे काही कुटुंबीय यांच्याविरुद्ध भ्रष्टाचाराचे आरोप करण्यात आले होते. त्याच्या कारभाराविरुद्ध तक्रारी करणारे निवेदन कॉंग्रेस श्रेष्ठींना सादर करण्यात आले होते. परदेशी पाहुण्याच्या स्वागतप्रसंगी पहाडिया मुख्यमंत्र्यांना शोभेसे वागले नाहीत, अशीही त्याच्याविरुद्ध तक्रार होती. केनियाच्या अध्यक्षांनी जयपूरला भेट दिली तेव्हा पाहुणे आले तरी विमानतळावर पहाडियांचा पत्ता नव्हता. आतरराष्ट्रीय वृत्तसंस्थाच्या ज्येष्ठ पत्रकाराच्या एका गटाने जयपूरला भेट दिली त्यावेळी मुख्यमंत्री पहाडियांनी त्यांच्या सन्मानार्थ मेजवानीचा कार्यक्रम आयोजित केला होता; पण पहाडियाची वाट पहात पाहुण्याना दोन तास ताटकळत बसावे लागले. हे वृत्तांत समजल्यावर कॉंग्रेस श्रेष्ठीही पहाडियांच्या कार्यपद्धतीबद्दल नाराज झाले होते.

पहाडियांचे शासन डळमळीत झाले आहे हे गेल्या मार्चमध्येच उपसभापतीच्या निवडणुकिचे प्रसंगीच स्पष्ट झाले होते. निवडणूक २८ मार्चला होती. या पदासाठी ताकिउद्दिन यांना उभे करावे असे पहाडियानी ठरविले होते आणि त्यांना अर्जही भरायला सागितला होता; पण त्या नावाला कॉंग्रेसश्रेष्ठीनी मान्यता दिली नाही व त्यांच्याऐवजी अहमद बक्षी सिंधी यांचे नाव सुचविले. पहाडिया गटाला ते मान्य नव्हते, सत्तारूढ पक्षातर्फे उभ्या करावयाच्या उमेदवाराच्या नावाची शिफारस पक्षनेत्याने म्हणजेच मुख्यमंत्र्यानी करावी, अशी प्रथा आहे; पण पहाडियांनी ही प्रथा पाळली नाही. त्यांनी किंवा त्यांच्या मंत्रिमंडळ गटापैकी कोणीही सिंधी यांच्या अर्जावर सूचक म्हणून सही केली नाही. सुरिंदर मोहन व्यास यांनी सूचक म्हणून आणि श्रीराम गोटावाला यानी अनुमोदक म्हणून अर्जावर सह्या केल्या होत्या. हे दोघेही पहाडियाविरोधी गटाचे होते. दिल्लीत पंतप्रधान श्रीमती गांधीची भेट घेऊन त्यांनी पहाडियांच्या कारभाराविरुद्ध तक्रारी केल्या होत्या. सिंधी पहाडियाविरोधी गटाचे होते. कॉंग्रेसश्रेष्ठीनी पहाडियानी सुचविलेले नाव डावलून सिंधी यांचे नाव सुचविले तेव्हाच कॉंग्रेस-श्रेष्ठींचा पहाडियाविरोधी कल स्पष्ट झाला होता.

पहाडियांविरुद्ध कॉंग्रेसश्रेष्ठींचे मन प्रतिकूल करणारी आणखी एक घटना लक्षात घेतली पाहिजे. राम किशोर व्यास यांची ईशान्येकडील राज्याचे राज्यपाल म्हणून नेमणूक होण्यापूर्वी ते राजस्थान प्रदेश इंदिरा कॉंग्रेसचे अध्यक्ष होते. ते पहाडियांविरोधी गटाचे होते. व्यास या पदावर असेपर्यंत मंत्रिमंडळास स्थैर्य येणार नाही असे पहाडियांनी कॉंग्रेसश्रेष्ठींना सांगितले होते; पण तेवढयाने श्रेष्ठीचे समाधान झाले नाही. तेव्हा पहाडियांनी त्यांना पटेल असा दुसरा युक्तिवाद केला. रामकिशोर व्यास विधानसभा निवडणुकीत पराभूत झाले होते. अशा पराभूत व्यक्तीला प्रदेश कॉंग्रेसचे अध्यक्ष नेमल्याने संघटनेची प्रतिष्ठा कमी होईल,हा त्यांचा मुद्दा श्रेष्ठीना पटला. त्यांनी व्यास याना राजीनामा देण्यास सागितले. त्यांच्या राजिनाम्यानंतर प्रदेश कॉंग्रेसचे अध्यक्षपदी राम नारायण चौधरी यांची निवड करण्यात आली. पण व्यास अध्यक्षपदी असू नयेत हे पटविण्यासाठी पहाडियांनी जो मुद्दा माडला होता तो चौधरीच्या बाबतीतही लागू पडत होता. विधानसभा निवडणुकीत तेही पराभूत झाले होते; पण पहाडियांनी ही गोष्ट कॉंग्रेसश्रेष्ठीपासून हेतुपूर्वक दडवून ठेवली, अशी टीका त्यांच्याविरुद्ध करण्यात येत आहे.

राजस्थान विधिमंडळ इंदिरा कॉंग्रेस पक्षाची सभा गेल्या मार्चमध्ये झाली होती त्यावेळी अ. भा. कॉंग्रेस कमिटीचे निरीक्षक म्हणून बूटासिंग उपस्थित होते. सभेला उपस्थित असलेल्या ३६ पैकी ३० आमदारानी पहाडियांचे कार्यपद्धतीवर टीका केली. पक्षात त्यांच्यामागे बहुमत राहिलेले नाही हे त्याच वेळी स्पष्ट झाले. बूटासिंग यांनी कॉंग्रेसश्रेष्ठीना या वस्तुस्थितीची कल्पना दिली. वास्तविक त्याचवेळी नेतृत्वात बदल झाला असता, पण सध्याच्या मुख्यमंत्र्याना एक वर्ष तरी काम करू द्या, हे पंतप्रधानांचे आवाहन मानून थोडी वाट पहा असे बंडखोरगटाला सांगण्यात आले. वर्ष पुरे झाल्यानंतर आता ते निमित्त राहिले नाही. पहाडियाची बाजू श्रेष्ठीनी घ्यावी एवढी कार्यक्षमताही त्यांनी आपल्या कारभारात दाखविलेली नाही. एक नाकर्ता मुख्यमंत्री अशीच त्यांची प्रतिमा असल्याचा केंद्रीय संसदीय मंडळाच्या बहुसंख्य सभासदाचा ग्रह आहे; तेव्हा १० जुलैच्या बैठकीत त्यांना राजिनाम्याचा सल्ला देण्यात आला व नवा नेता निवडण्याचे काम परराष्ट्र मंत्री नरसिंगराव याच्याकडे सोपविण्यात आले. पहाडिया यांनी गेल्या शनिवारी राजीनामा दिला. हा लेख प्रसिद्ध होईपर्यंत नवा नेता निवडलाही गेला असेल त्याला पहाडिया गट पाठिंबा देईल का ? की त्याच्याविरुद्ध कारवाया तो चालू ठेवील ? तसे झाल्यास त्यातून अस्थैर्यच निर्माण होईल.

प्रश्न केवळ राजस्थानचा नाही. हरियानाचे भजनलाल, कर्नाटकचे गुडूराव, महाराष्ट्राचे अंतुले याच्याविरुद्धही पक्षात गट आहेत. नेतृत्वबदलाची मागणी या राज्यातही जोर धरण्याचा संभव आहे. त्यातून अस्थिरतेचे नवे पर्व सुरू होईल.

□

# मुंबई वार्ता

## □ शांततेचा अनुभव

माणसाची जगण्याची सारी धडपड अखेर असते कशासाठी ? कशासाठी–पोटासाठी हे जसं खरं, तसं खंडाळघाच्या घाटासाठी–हेही खरं. पोटासाठी मिळालं आणि खंडाळघाच्या घाटही मिळाला की खरं म्हणजे सुखी व्हायला हरकत नाही.

पण गोष्ट इथेच संपत नाही. खरं म्हणजे ती इथे सुरू होते. कदाचित असं तर होत नसावं ना, की पोटासाठी धावता–धावता आणि खंडाळघाचा घाट चढता–चढताच एवढी दमछाक होते की, मग 'अरे, यातून आपल्याला सुखी पण व्हायचंय बरं का !' हे साफ विसरायलाच होतं. जगण्याच्या या खटपटीत ताणतणावच जास्ती निर्माण होतात. कधी त्यातलंच एखादं काही तरी मनात झिरपत झिरपत जाऊन भोवरीसारखं रुजून बसतं आणि मग ती असह्य ठणका बरोबर घेऊन रडक्या तोडानं माणूस खंडाळघाचा घाट चढतो.

या ताण–तणावांपासून सुटका कशी मिळवायची ? अर्जेंटिनातल्या सिलोला त्याचा एक मार्ग सापडला आहे. त्यानं स्थापन केलेल्या 'कम्युनिटी ग्रुप'चं हे बारावं वर्ष. आतापर्यंत पुष्कळ देशातल्या पुष्कळ शहरात हे 'कम्युनिटी' ग्रुप्स स्थापन झाले आहेत. त्यांच्या 'गाइडेड एक्सपीरियन्स' मधून ते 'सेल्फ लिबरेशन' ला मदत करतात. 'मानवी समतोल आणि विकास' हे त्यांचं उद्दिष्ट.

पूर्वीच्या लोकांचं एक बरं होतं. म्हणजे फार पूर्वीच्यासुद्धा नाही. अगदी आपले आजी–आजोबा किंवा हवं तर आई–वडिलांचीसुद्धा पिढी घ्या. सध्याकाळच्या कातर हुरहुरत्या वेळाना देवळात जाऊन बसलं की त्याना बरं वाटत होतं भजन–कीर्तनात त्याना मनापासून रस घेता येत होता. एकटं वाटलं, तर सहजच शेजारच्या घरात डोकवून 'झाली का उन्हाळी वाळवणं ?' अशी चौकशी करता येत होती. आपल्या पिढीला मात्र हे सगळे दरवाजे बंद ! कल्पना करून बघा की, ऑफिसमधून आल्यावर हातात छोटोशी पिशवी आणि दुसऱ्या हातात फुलवात घातलेलं निरांजन घेऊन तुम्ही देवळात निघाला आहात ! या सगळ्यापासून आपण इतके लांब आलो आहोत की तिथल्या परतीच्या वाटा आता बुजल्या आहेत आणि हा कंटाळा, अस्थिरता, बेचैनी ह्या अशा काही सार्वत्रिक गोष्टी आहेत की सगळी माणसं त्याला सारखीच बळी पडतात मग ती गरीब–श्रीमंत, सुशिक्षित–अशिक्षित, पुष्कळ जबाबदारी असलेली–नसलेली कशीही असो. कम्युनिटीवाल्यांनी एक छोटीशी प्रश्नपत्रिका काढली आहे. '१) तुमचं काम २) तुमचं कुटुंब ३) तुमचे बायकोबरोबरचे-नवऱ्याबरोबरचे संबंध ४) तुमचे मित्र–या ठिकाणी येत्या दोन वर्षात तुम्हाला काय मिळवायचंय हे तुम्हाला माहीत आहे का ? प्रश्नांना उत्तरं तीन –१) होय २) नाही ३) डाउटफुल.' या प्रश्नांना पैकी ४ ही प्रश्नाना तुमचं उत्तर 'होय' असेल–तर तुम्ही दुसऱ्याना मदत व्हावी, म्हणून 'कम्युनिटी' त या !

जर तुम्ही 'डाउटफुल' असाल तर शंकासमाधनासाठी 'कम्युनिटी' त या !

आणि जर तुमची उत्तरं 'माहीत नाही, असतील–तर आम्ही तुम्हाला ॲम्ब्युलन्स पाठवून 'कम्युनिटी' त बोलवून घेऊ !

एकूण काय, तर 'कम्युनिटी' त या !

बरंय बुवा. असं म्हणून मी 'कम्युनिटी' च्या एका कार्यक्रमाला – चुकले – 'गाइडेड एक्सपीरियन्स' ला गेले.

फोर्टमधल्या जुन्या इमारती. अशाच एका इमारतीतील कोपऱ्यातली खोली. छोटीशी. बाहेर रिपरिप पाऊस, त्यामुळे आत खूप उबदार. रस्त्यावरची ओसरती वर्दळ. जमलेले चेहरे बहुतेक प्रौढ आणि मध्यमवयीन, दिवसभरचं काम संपवून आलेला थकवा.

इन्स्ट्रक्टर सुंदरेशन आले. सुरुवातीला थोडं प्राथमिक बोलणं, माहिती आणि मग 'गाइडेड एक्सपीरियन्स' ला सुरुवात. आजचा एक्सपीरियन्स 'पीस' किंवा 'रिलॅक्सेशन' चा. 'शांततेच्या अनुभवाची' ही कल्पना मात्र छान होती. भारतीय तत्त्वज्ञान आणि योगामध्ये या कल्पनेला समांतर असं काही आहेच; पण हा 'इन्स्टन्ट कॉफी' सारखा 'इन्स्टन्ट पीस' चा मार्ग होता (आणि तोही रजनीश, चरस – गांजा ... इ. मंडळींना बाजूला ठेवूनच !) इन्स्ट्रक्टर सूचना देत होता आणि बाकीचे त्याप्रमाणे तो अनुभव अनुभवत होते.

तिथल्या व्यक्तींना आलेल्या अनुभवाचं स्वरूप असं सुरुवातीला अर्थातच चमत्कारिक वाटणं हे आलंच. दहा बाय दहाच्या या खोलीबाहेर पडलं की बाहेर अफाट गर्जणारी मुंबई ! आपण दिवसभर धावत-पळत केलेली कामं आणि आत्ताचं हे निरुद्देश, निरुद्योगी, डोळे मिटून बसणं ! ही झोप नाही, समाधी नाही, हिप्नॉसिस नाही, ध्यान नाही की पूजा नाही. हा शांततेचा अनुभव आहे. म्हणजे काय ?–म्हणजेच शांततेचा अनुभव !

पण मग बघता बघता त्या खोलीचं स्वरूपच पालटलं. डोळ्यापुढे शीतल अंधार पसरला. वाहनांचे आवाज मंदावले. शेजाऱ्याचा सर्दीनं जड झालेला श्वास जाणवेनासा झाला. आता फक्त डोक्यावरच्या पंख्याची भरतीच्या लाटासारखी घरघर, आपण आणि आपली शांतता !

–ही 'कम्युनिटी' वाढेल ? की संपून जाईल ? सुखाची गुरुकिल्ली त्यांना खरंच सापडेल ? कळेलच आपल्याला काय होईल ते.

## □ वन वुमन शो

परवा रॅम्पार्टरोच्या आर्टिस्ट्स सेंटरमध्ये सिंधू काटदरे भेटल्या. तुम्हीही त्यांची छायाचित्रं पाहिली असतील. मुंबईकरांना त्यांचा अधिक परिचय आहे तो 'मिडडे', 'मुंबई सकाळ'मधून येणाऱ्या त्यांच्या छायाचित्रामधून. काही काही क्षेत्रं अशी आहेत की, जिथे स्त्रियांचा वावर अगदीच कमी आहे. खरं म्हणजे काही-काही नसून पुष्कळशी क्षेत्रं अशीच आहेत की जिथे स्त्रिया बाद आहेत ! मुळात पत्रकार स्त्रिया विरळ आणि त्यातही पत्रकारितेच्या अंगानं जाणाऱ्या छायाचित्रकर्त्या ? त्या तर अगदी दुर्मिळच आहेत. सिंधू काटदऱ्याच्याच शब्दात सांगायचं, तर अशा तऱ्हेची 'पिक्टोरियल फोटोग्राफी' करणाऱ्या मुंबईत त्या एकट्याच ! दिल्लीला एक चित्रांगदा शर्मा आहेत; पण मुंबईत ज्या स्त्री–छायाचित्रकर्त्या आहेत, त्या व्यावसायिक आहेत. लग्नसमारंभाचे फोटो काढणाऱ्या कलदर फोटोग्राफीच्या फंदात न पडणाऱ्या.

सिंधू काटदरे या क्षेत्रात तशा नवीन आहेत. १९७७ सालपर्यंत त्या संगीतक्षेत्रात नाव कमवून होत्या. 'ओम कला मंदिर' नावाचं त्यांचं एक कलापथकही होतं. त्यांच्या कार्यक्रमातून त्यांनी एकदा बालगंधर्वांना आणि एकदा एका अपंग कला संस्थेला मदतही केली होती.

पण '७७ साली संगीताला पूर्णविराम मिळाला आणि संगीतातला तो हरवलेला सूर त्यांना इथे सापडला ती लय आणि

तो-ताल, त्यांच्या छायाचित्रातल्या प्रकाश आणि छायेच्या कृष्णधवल समतोलात सापडतो. एखाद्या निसर्गदृश्यातल्या, एखाद्या वठलेल्या झाडात जाणवतो. रंगीत छायाचित्रातल्या त्रिमितीचा भास, रंगातला तरलपणा आणि पोत या साऱ्यामध्ये त्या संगीताचा भास असतो.

इंडो-अमेरिकन सोसायटीच्या एका छोटयाशा अभ्यासक्रमातून त्यांना फोटोग्राफीची जुजबी ओळख झाली होती. 'फोटोग्राफिक सोसायटी ऑफ इंडिया' मध्ये त्यांना तांत्रिक बाबींचा पूर्ण परिचय झाला; पण त्यातली कला ही अर्थात त्यांचीच, त्यांनी मेहनतीनं वाढवलेली. मुंबईसारख्या शहरात एकटयाच एका बाईनं कॅमेरा घेऊन कुठे-कुठे फिरायचं म्हणजे थोरच. लोक इतक्या नजरांनी बघणार, त्या साऱ्याला तोंड द्यायचं; पण त्या साऱ्याशी जुळवून घेत त्यांची आगेकूच सुरू आहे. छायाचित्रकलेची गंमत अशी असते की बहुधा प्रत्येकच चित्राला काही तरी इतिहास असतो. आपल्या फोटोंचा आलबम उघडून सिंधू काटदरे त्यात अशाच हरवून गेल्या. 'फोटो घ्यावा की नाही?'

असा विचार करत घेतलेला फोटो-'गोईंग टू मार्केट'-लांबच लांब शेतांच्या आणि झाडांच्या पार्श्वभूमीवर लगबगीनं बाजाराला निघालेल्या स्त्रिया.- फोटो कसा येईल याचीही शाश्वती नव्हती; पण त्यानं अनेक बक्षिसं पटकावली. काही ठिकाणी हार्याकिंग-कम-फोटोग्राफी, जिवावर उदार होऊन केलेली. बॉम्बे जिमखान्यावर सहजच मिळालेला आणखी एक फोटो. खूपच खूप टेबल-खुर्च्या. सगळं मोकळं. एकच एक कावळा मान मुरडून विचारतो आहे की, जेवायला कधी वाढणार? भूक लागली बुवा!

शीर्षक 'अॅन अर्ली बर्ड गेटस् नो वर्म'!

फक्त चार वर्षांतच सिंधू काटदरे छायाचित्रकारीत चांगल्या रुळल्या आहेत. त्यांच्या छायाचित्रांनी देश-परदेश पाहिला आहे. एडिंबरोच्या प्रदर्शनात संपूर्ण भारतातून केवळ त्यांचंच छायाचित्र स्वीकृत झालं होतं. जहांगिर आर्ट गॅलरीत वन मॅन शो करणं हे मानाचं समजलं जातं. तिथेही 'वन वुमन शो' करण्याचं श्रेय त्यांच्या पदरी आहे. तरी मनात खंत आहेच! छायाचित्रकला हा छंद म्हणावा, तर तो फारच खर्चिक आहे. व्यवसाय म्हणावा, तर स्त्री असल्यामुळे त्यांना कुठल्याही वर्तमानपत्राच्या स्टाफवर रहाता येत नाही. कारण कुठल्याही ठिकाणी, कुठल्याही वेळी कॅमेरा गळयात अडकवून फिरणं शक्य नाही. दुसरं शल्य असं की, सगळया कला-विद्यांना सरकारदरबारी उत्तेजन मिळतं; पण छायाचित्रकलेला ना कसलं बक्षिस, ना काही शिष्यवृत्ती. खरं म्हणजे छायाचित्रकला ही किती महत्त्वाची आहे, उद्या सर्व फोटोग्राफर्सनी युनियन केली आणि जाहीर केलं, की आमच्या मागण्या मान्य केल्याशिवाय आम्ही कुणाही मंत्र्या-संत्र्यांचे फोटो काढणार नाही!

तर काय आफत येईल!
पण जरा हायसंही वाटेल! ◻

## ◻ साम्यवादी चित्रपट

चिनी चित्रपट पाहिला आहे का कुणी? म्हणजे ज्यांनी पाहिला आहे त्यांचं सोडून द्या हो; पण तेवढे सोडून बाकीच्या कुणीतरी निश्चितच पाहिलेला नाही! बाकीच्या साम्यवादी देशांचे चित्रपट पुष्कळ बघायला मिळतात- म्हणजे पोलिश, रशियन वगैरे. पण चिनी चित्रपट, इथे, भारतात पहायला मिळणं म्हणजे खरोखरच दुर्मिळ चीज.

त्यामुळे मागच्या पंधरवडयात एक चिनी चित्रपट बघायचा योग आला. तेव्हा कमालीच्या उत्सुकतेने तो पहायला गेले. चित्रपटाचं नाव 'द गर्ल डाइवर्स' किंवा चिनी भाषेत जे काय च्याव-म्याव असेल ते. गोष्ट म्हटली तर साधी. पण अवघड आणि तपशीलात जाणाऱ्या दिग्दर्शकाच्या हातात पडली तर अवघड. शिया-हो ही शाळकरी मुलगी. पोहोण्याच्या, सूर मारण्याच्या खास प्रशिक्षणासाठी तिची निवड होते. मार्गदर्शन, मैत्रिणींचं सहकार्य आणि अंगभूत कसब अशा 'सामूहिक' प्रयत्नातून तिला ज्यूनियर नॅशनल चॅम्पियनशिप मिळते. यशानं ती प्रथम चढून जाते; पण मग परत वास्तवात येते. नंतर एक 'व्यक्तित्ववादी' आणि 'वैयक्तिक आकांक्षे' सारख्या 'अ-साम्यवादी' विचाराचे शिक्षक येतात. एका महत्त्वाच्या स्पर्धेत ५३११ असा एक कठिण सूर तिनं मारावा आणि व्यक्तिगत कीर्ती मिळवावी असा त्यांचा आग्रह असतो. पण तो तिच्या ताकदीबाहेरचा असतो. स्पर्धेत ऐनवेळी ती घाबरते. तिचा धीर सुटतो आणि सूर मारण्याऐवजी ती नुसतीच पाण्यात कोसळते; अर्थातच ती आणि तिचे शिक्षक या दोघांनाही आपल्या या अ-सामाजिक कृत्याचा पश्चात्ताप होतो. यानंतर शिया-हो ला ५३११ कधीच जमत नाही. पण एकदा जंगलात सहलीला गेल्यावर एका बुडणाऱ्या मुलाला वाचवण्यासाठी, खूप उंच कडयावरून एका अमोळखी आणि भल्या मोठ्या तळयात ती सूर मारते. तो नेमका ५३११ असतो (कारण 'सामाजिक' कारण असतं ना!) आणि मग अर्थातच शेवट गोड इत्यादी इत्यादी.

पण बाकी म्हणाल तर चित्रपटाच्या या 'गोष्टी'ला जितकी वळणं आहेत, तितकीसुद्धा प्रत्यक्ष चित्रपटाला नाहीत. तेव्हा काही सूक्ष्म, तरल भावनांची गुंतागुंत असल्या भानगडीत पडतो कोण? चित्रपटाचा उद्देश पहिल्यापासून ठरलेला आहे आणि रणगाडयासारखा चित्रपट अगदी सरळसोट 'ध्येयाप्रत पोचतो.' वाटेत येणारे कोणी बारकावे वगैरे असलेच तर ते सगळे भुईसपाट. व्यक्ती विरुद्ध समाज हा संघर्ष. यात समाज श्रेष्ठ, हे उत्तर मुळी आधीच ठरवून ठेवलेलं. आपण फक्त बुद्धिबळातल्या हत्तीसारखं (बुद्धी न वापरता!) सरळ चालून ते मिळवायचं. मार्ग चुकलेले नाठाळ आणि खटयाळ हे शेवटी कान धरून शरण येणारच. त्याची पद्धत पण अगदी सोपी, 'शिया हो, असं करू नकोस, हे बरं नाही' असं म्हटलं की झालं. शिया-होची समजूत पटणार आणि एवढंच नाही तर ती परत कधी तसं वागणारही नाही. व्यक्तिवादी शिक्षकाला त्याची चूक समजावून दिली, तर तो आपल्या जुन्या हिंदी चित्रपटाच्या नायकासारखा रुसून, गाल फुगवून बसला! म्हटलं, आता हा गातो-बितो की काय? 'टूट गया दिल मेरा' वगैरे? पण तोही 'गोड शेवटात' सामील झाला.

खरं म्हणजे चिनी भाषा इतकी संवेदनाक्षम आहे की, केवळ उच्चाराच्या उच्च नीच स्वरांनी इन्टनेशन पॅटर्ननी इथे शब्दांचे अर्थ बदलतात असं ऐकलं होतं; पण इथं प्रत्यक्ष ऐकताना सगळीच भाषा आपली एकसुरी आणि भातुकलीच्या खेळातल्यासारखी खोटी खोटी वाटणारी. त्याच्या जोडीला ठोकळेदार चेहरे. त्याना फक्त आनंद, दुःख, राग इत्यादी दोन-चार मूलभूत आणि प्राथमिक तेवढयाच भावना दाखवता येतात.

कदाचित 'साम्यवादी चीनच्या साम्यवादी रहिवाशाना तेवढयाच भावना वाटल्या पाहिजेत'-असं ताह्येचं नाही तर माओचं वचन असावं!

-ललिता बर्वे

## उत्तरमामीसा : १४ :

स. शि. भावे

# बोर्ग-मॅकेन्रो यांची चिवट झुंज -आणि आमचे क्रीडाप्रदूषण

गेल्याच्या गेल्या वेळी (उत्तरमीमासा : १२) प्रदूषणासंबंधी लिहिले.त्या वेळी मानसिक प्रदूषणाचा उल्लेख केला होता. साधे छोटे अंतर चालायलादेखील आपला मानसिक कंटाळा आड येतो असे सर्वांच्या अनुभवाला येणारे एक उदाहरण दिले होते.

—गेल्या आठवड्यात बोर्ग व मॅकेन्रो यांची अटीतटीची लढत पाहताना हे सारे विरोधाने आठवत होते.

४ जुलै रोजी सायंकाळी झालेली ही लढत अविस्मरणीय अशा मोजक्या लढतींपैकी एक म्हणून वारंवार आठवली जाईल.

एक महत्त्वाचा अपेक्षाभंग आणि तितकीच महत्त्वाची स्वप्नपूर्ती हे अशा महान लढतीचं वैशिष्टय असते.

विम्बल्डनच्या लढतीकडे गंभीरपणाने लक्ष देऊ लागलो त्या पोरवयातली अशी एक लढत मला अजून (वाचलेली) आठवते.

आपल्या पहिल्याच विम्बलडनमध्ये अंतिम सामन्यापर्यंत धडक मारणारा, सहजसुंदर शैलीदार खेळ करणारा सोळा वर्षांचा ऑस्ट्रेलियन कुमार-केन रोझवाल आणि आता काही आपल्याला विम्बल्डनचे प्राविण्यपद मिळत नाही अशी जवळजवळ खात्री पटून निराश झालेला ईजिप्तचा प्रौढ खेळाडू जारोस्लाव ड्रॉब्नी-यांच्यातला गाजलेला अंतिम सामना.

पहिल्याच धडकेत विम्बल्डन पटकावयाचे हे केन रोझवालचे स्वप्न, परीकथेचा शोकान्त शेवट व्हावा, तसे भंगले. आणि, इजिप्तच्या टेनिसकोर्टावर चेंडूमागे धावणारा लहान मुलगा जारोस्लाव ड्रॉब्नी-याचे विम्बल्डन जिंकण्याचे कितीं तरी वर्षांचे स्वप्न, महाकाव्यात शेवटी विरक्त विजय मिळावा तसे, साकार झाले.

डोळयांतून अश्रू मागे सारणाऱ्या रोझवॉलला हरविताना ड्रॉब्नीला खचित वाईट वाटले असेल.

असाच सारखा आठवणारा अपेक्षाभंग हा आपल्याच रामनाथन् कृष्णन्चा. दोन वेळा उपान्त्य फेरी गाठूनसुद्धा विम्बल्डन विजयापासून कृष्णन् दूरच राहिला.

खरे म्हणजे समकालीन सर्व महत्त्वाच्या पटूना कृष्णनने या ना त्या वेळी हरवले होते. अगदी दोन वेळा 'ग्रॅण्ड स्लॅम' मारणाऱ्या डावऱ्या रॉड लेव्हरलाही त्याने हरवले होते. पण विम्बल्डन म्हटले की, सर्वच टेनिसपटूच्या जणू अंगात येते. आणि तसे किंवा तितके ज्यांच्या अंगात येत नाही, त्यांचा चेव विजेता होण्यासाठी खेळाव्या लागणाऱ्या एकूण सात सामन्यांमध्ये केव्हा ना केव्हा सैल पडतो. रामनाथन् कृष्णन् हा तर 'टच आर्टिस्ट', शैलीदार, फसवे, तऱ्हेतऱ्हेचे कोन साधून फटके मारणारा. 'सर्व्ह-व्हॉली-स्मॅश' या तंत्राने खेळणाऱ्या. म्हणजेच दांडगेपणाने खेळणाऱ्या, नव्या पटूंपुढे तो सैल पडत असे आणि झाताशी लागलाच असे वाटायला लावणारा सामनाही तो हरत असे.

दोन वर्षांआधी विजय अमृतराज बियॉन बोर्गकडून दोन सेट जिंकून आणि तिसऱ्या सेटमधे ५-४ असा आघाडीवर असताना हरला होता. त्याही आधी रॉड लेव्हर विरुद्ध पहिले दोन सेट सहज घेऊन आणि तिसऱ्या सेटमध्ये ३-० असा आघाडीवर असताना आपला प्रेमजित लाल असाच हरला होता, परवा

काल बोर्ग असाच नाउमेद होत गेला. पहिला सेट त्याने ६-४ असा घेतला. दुसऱ्यातही दहाव्या गेममध्ये त्याला मॅकेन्रोची सर्व्हिस तोडण्याची संधी होती. तिसऱ्यात तर ४-१ अशी आघाडी त्याने घेतली. आणि मॅकेन्रोने झपाट्याने ४-४ असे बरोबरीत गाठल्यानंतरही, व ५-४ असा आघाडीवर असताना बोर्गला चार सेट पॉइंट्स् मिळाले होते एरवी याच्या एकदशांश संधी जरी बोर्गला मिळाली असती तरी त्याने ती कधीही सोडली नसती. कॉनर्सला आदल्या दिवशीच त्याने तसेच हरवले नव्हते का ? त्यातही चौथा सेट त्याने ६-० असा झोडपून घेतला होता. म्हणून तर परवाच्या अंतिम सामन्यात, गेम-सेट व मॅच पॉईंट त्याने जेव्हा एकदा वाचविला, त्या क्षणीही बोर्ग पारडे उलटवू शकेल असे वाटू शकत होते.

पण परवाचा दिवस जितका मॅकेन्रोचा होता, त्याहीपेक्षा तो बोर्गचा नव्हता, हेच खरे ! अगदी पहिला सेट त्याने ६-४ असा जिंकला तेव्हाही तो खोलवर दमलेला आणि मुख्य म्हणजे उदास व विरक्त वाटत होता.

कॉनर्सला हरवल्यानंतर बोलताना तो म्हणाला होता 'इतकी लांबलेली खेळी खेळताना शारीरिक त्रास तसा झाला नाही. पण इतका काळ मनाची एकाग्रता साधताना मनोमन दमायला होतं.' परवा हरल्यानंतर तो म्हणाला, 'टेनिसच्या खेळाच्या दृष्टीने मॅकेन्रो जिंकला हे बरेच झाले !'

ही विरक्त शांति खरी की खोटी ? सततची की तात्पुरती ?

त्याची ही शांतता सततचीच म्हणावी लागेल ! परवा हरल्यावर तो शांत होता. गतवर्षी जिंकल्यानंतरही तो आजच्याइतकाच शांत होता !

सतत सहाव्यांदा अजिंक्यपद जिंकण्याचे स्वप्न भंगणे हा काही साधासुधा धक्का नव्हे तरी बोर्ग शात कसा ?

आणि उपान्त्य फेरीपर्यंत सीमानिरीक्षक, पंच, सरपंच यांना सळो की पळो करणारा मॅकेन्रो अंतिम सामन्यातच एवढा शांतपणा कसा राखू शकला ?

टेनिसवरची, खेळावरची निष्ठा हे याचे उत्तर आहे.

लक्षात घ्या. बोर्गची पहिली सर्व्हिस सतत

चुकत होती. तरी सर्व्हिस 'एसेस' मारण्याची चिकाटी त्याने सोडली नाही. हातातला खेळ हातातून चालला आहे हे त्याने पाहिले. पण निराशा पत्करुन त्याने जिद्द सोडली नाही !

आणि जिद्द कशाची ? तर कसेही करून जिंकायचे अशी जिद्द नाही, तर प्राप्त परिस्थितीत शक्य तेवढा उत्कृष्ट खेळ खेळणे ही जिद्द !

म्हणून परवा बोर्ग हारला नाही, तर मॅकेन्रोने त्याला हारविले.हारविले तेही बोर्ग-सारख्याच जिद्दीने !

परवाच्या अंतिम सामन्यात तो प्रयत्न-पूर्वक शांत राहिला याचे सर्वांनीच कौतुक केले आहे. केवळ दंड वाचवा किंवा स्पर्धेतून बाद केले जाऊ नये म्हणून मॅकेन्रो चांगला वागला, पराकाष्ठेच्या प्रयत्नाने शांत राहिला असे नव्हे. म्हणजे ही कारणे होती; पण ती कमी महत्त्वाची होती. महत्त्वाचे कारण हे होते की, तसे शांत राहिल्याने मॅकेन्रोचा खेळ सुधारत होता. आणि आपला खेळ अत्युत्तम व्हावा ही तर मॅकेन्रोची खरी जिद्द होती !

म्हणूनच परवा, एक नाही, दोन नाही, चांगल्या डझनभर डबल फॉल्टस् झाल्या तरी त्याने तुफानी सर्व्हिस करण्याचे सोडले नाही या चिकाटीने त्याला तितकेच सर्व्हिस 'एसेस' मिळाले. शिवाय दुसऱ्या व तिसऱ्या सेटांमध्ये हीच तुफानी सर्व्हिस त्याला खरी उपयोगी पडली.

गमतीची आणि महत्त्वाची गोष्ट अशी की, जसजसा मॅकेन्रोचा खेळ निर्दोष, सफाई-दार कलात्मक होत गेला तसतसा तो अंतरंगात खरोखरच शांत होत गेला. अजिंक्यपदाचा चषक स्वीकारताना तर तो नम्रपणाने शांत झाला होता !

अत्युच्च यशातील मॅकेन्रोचा नम्र शांत-पणा बघताना मनात आले की खेळातील उच्च नैपुण्याचे (excellence) खरे रहस्य आज मॅकेन्रोला कळले आहे आणि त्यामुळेच बोर्गच्या संतकोटीच्या शांतपणाचे रहस्यही त्याला आजच खरे कळले आहे. बोर्गचे आणि खऱ्या क्रीडावृत्तीचे महत्त्व आजच्या विज-याच्या क्षणी मॅकेन्रोला चरचरून समजले आहे !

कलात्मक उत्कट निष्ठा आणि व्यवहा-रात निर्मम अलिप्तता,—अशा परस्परविरुद्ध गुणधर्मांचा दुर्मिळ मिलाफ बोर्गच्या खेळाडू-व्यक्तिमत्त्वात झालेला आहे, म्हणूनच तर गेल्या वर्षी जिंकल्यानंतर तो जेवढा शांत होता तेवढाच यंदा हरल्यानंतरही होता ! ◻

बोर्गचे, मॅकेन्रो चे असे कौतुक मनातल्या मनात मी करीत होतो आणि त्याच वेळी एक खंत माझ्या मनाला दंश करीत होती. आपल्या या पासष्ट कोटींच्या प्रचंड देशात असे खेळाडू का निर्माण होऊ नयेत ?

ऑलिंपिकमध्ये एकमेव व्यक्तिगत पदक म्हणजे हेलसिंकीला खाशाबा जाधवाने कुस्तीत जिंकलेले ताम्रपदक ! आजतागायत हे एकच पदक भारताजवळ आहे!

सांघिक पदक हॉकीचे. १९२८ पासून आपण सुवर्णपदक जिंकीत होतो. १९५६ साली ती सुवर्णपदकांची मालिका तुटली. ६० साली पुन्हा सुवर्णपदक मिळविले. नंतर वीस वर्षांनी, गतवर्षी, मॉस्कोला मिळाले. तेही बलाढ्य पाच संघ न आल्यामुळे मिळाले !

बिलियर्डसमध्ये विल्सन जोन्स आणि




मॅायकेल फरेरा. बॅडमिंटनमध्ये गेल्या वर्षी प्रकाश पदुकोने. बस्स ! संपले आमचे जागतिक अजिक्यवीर. क्रिकेटमध्ये आपला वीर अजिक्यपद मिळवण्याची शक्यता, सुनील गावसकरच्या पराक्रमाने, वाटते; पण अजून त्याने अद्वितीयत्व मिळविलेले नाही !

२६६ बळी घेऊन बिशनसिंग बेदी सध्या जगात चौथ्या क्रमाकावर आहे. पण डेनिस लिली त्याच्यापुढे जाऊ पहात आहे.

आम्ही इतके वाईट का खेळतो ?

पैसा नाही म्हणून का ? हे खरे की, बरेच खेळाडू बरेच दिवस परदेशी पाठवण्याइतका पैसा आपल्याजवळ नाही; पण पाठवायचे म्हटले तरी आवश्यक किमान पातळी गाठणारे आपल्या चमूत किती असतात ? चार किंवा पाच ! म्हणजे पैसा नाहीच; पण तो आहे असे क्षणभर धरले तर आवश्यक किमान गुणवत्ता आपल्याजवळ नाही.

गुणवत्ता नाही याचे कारण साधारणपणे आपल्या क्रीडाक्षेत्रात कोणास गुणवत्तेची कदर नाही. खेळप्रेमी आणि खेळाडू वृत्ती आपणाजवळ नाही.

हेच ते क्रीडाप्रदूषण !

आपल्या क्रीडासंस्था पाहाव्या. आपले क्रिकेटबोर्ड ही सर्वात श्रीमंत क्रीडासंस्था! तर अॅमॅच्युअर अॅथलेटिक फेडरेशन आणि पतियाळाची राष्ट्रीय क्रीडा संस्था (HIS) या सरकारी आश्रयाखालील बड्या संस्था ! या संस्थांत काय किंवा इंडियन ऑलिंपिक असोसिएशन, किंवा इंडियन हॉकी फेडरेशन यासारख्या नावाला स्वतंत्र; पण उच्चभ्रू श्रीमंत आणि नोकरशाहीच्या दबावाखाली काम करणाऱ्या संस्थांत काय-जे क्षुद्र राजकारण चालते ते पाहून अट्टल व्यावसायिक राजकारण्यानीही मान खाली घालावी !

आमच्या देशी खेळाच्या संस्थांचा कारभारही असाच क्षुद्र राजकारणाने दूषित झाला आहे. कबड्डी असो, खोखो असो, की आपला राष्ट्रीय खेळ कुस्ती असो. कोणत्याही खेळांच्या संस्थेत राजकारण प्रथम, खळ नंतर असा विकृत अग्रक्रम बघायला मिळतो !

साधारणपणे, कोणी बडे राजकारणी संस्थेचे प्रमुख असतात. बडेबडे सरकारी अंमलदार आणि नवश्रीमंत उद्योगपती हे इतर अधिकारपदांवर असतात. देशभर हिंडून आपले हितसंबंध वर्धिष्णु ठेवण्याची सुवर्णसंधी म्हणून हे सारे आपापल्या अधिकारपदांचा वापर करीत असतात. मग, वार्षिक साधारण सभा बंगलूरला, तर निवड समितीची सभा तिसऱ्याच दिवशी मुंबईला, नंतर एखाद्या 'पोट' समितीची सभा नैनितालला, अशा सभा असतात.

आंतरराष्ट्रीय क्रीडापरिषदा अथवा आतरराष्ट्रीय क्रीडास्पर्धा म्हणजे तर यांना पर्वणीच ! प्रत्यक्ष खेळाडू म्हणून देशाचे प्रतिनिधित्व करणारे सात-आठच खेळाडू असले तरी त्यांच्या सोबत पथकाचा नेता, उपनेता, व्यवस्थापक, क्रीडामार्गदर्शक, वैद्यकीय तज्ज्ञ, मालिशतज्ञ, आहारतज्ज्ञ इत्यादी पदे भूषवीत सुमारे अठरा-वीस जणांचा जथा, देशाचे किंमतशीर परकी चलन उधळीत परदेशी वारीला रवाना होतो !

परदेशात गेल्यावर हे पदाधिकारी राजा-महाराजांसारखे वागतात, यांना कधीकधी दोन दोन व्हीआयपी सूटस्. तर खेळाडू 'ब' वर्गाच्या निवासात दर खोलीत दोघे अशा काटकसरी पद्धतीने. उत्तरेतील एका बलाढ्य बॉक्सिंग क्रीडाचमूची अवस्था गतवर्षी, स्पर्धा संपल्यावर किती हालाची झाली (देशातल्या देशात) आणि त्यांना रेल्वे-कर्मचाऱ्यांच्या सहानुभूतीने बोरीबंदर-स्टेशनच्या प्लॅटफॉर्मवर रात्र कशी काढावी लागली ही घटना ताजीच आहे.

प्रतिष्ठा, मानसन्मान, सुखसोयी या आधी (आणि कधीकधी फक्त संस्थेच्या पदाधिकाऱ्यांना आणि नंतर उरल्यास खेळाडूना असा हा खेळाडूना अपमानकारी क्रम असतो. बरे, इतर राष्ट्रातील खेळाडूंच्या बरोबरीने निदान पैसे मिळावे तर तसेही नाही. पुन्हा पुन्हा गयावया केल्यावर आश्रितासारखे पैसे मिळणे हेच आमच्या क्रीडापटूच्या नशिबी आहे.

¤

म्हणूनच मग विजय व आनंद अमृतराज AILTA च्या आश्रयाने खेळायचे नाकारतात, स्वतःचे मॅनेजर, स्वतःचे कोच स्वतंत्रपणे नेमतात आणि त्यांचे वेतन देऊनही लाखो डॉलर्स कमावतात ! प्रकाश पदुकोनेही याच मार्गाने जाण्याची इच्छा धरतो.

आणि सर्वात वाईट म्हणजे आमच्या खेळाडूंच्या मनाचेही प्रदूषण सुरू होते.

एक तर ते आत्मकेंद्रित व्यावसायिक होऊ पाहतात, नाही तर मंधिसाधू, लाचार, खुषमस्करे होतात. या दोन्हीपैकी काहीच जमले नाही तर निराश होतात, दैववादी होतात, आत्मविश्वास गमावून बसतात. सत्पालशी कुस्ती टाळणाऱ्या आपल्या विख्यात मल्लांचे उदाहरण येथे सहज डोळ्यांसमोर येते. ऑस्ट्रेलिया व न्यूझीलंड येथील दौऱ्यात खचून गेलेला सुनील गावसकरही डोळ्यांसमोर येतो.

यात एक महत्त्वाची गोष्ट हे खेळाडू गमावतात. ती मौल्यवान गोष्ट म्हणजे खेळातील प्राविण्याचा सहजसुंदर, निरागस आनंद ! स्पर्धेतले विजय, अजिक्यपद, नंतरचे मान, धन, प्रसिद्धी हे सारे निवडक खेळाडूनाच मिळणारे असतात; पण खेळातील तन्मयता आणि सारे सामर्थ्य पणाला लावून अनुभवता येणारा स्वत.मधील सुप्त शक्तीचा परमोत्कर्ष (excellence) ही खेळातील खरी समृद्धी प्रत्येकाला हक्काने अनुभवता येण्याजोगी आहे. किंबहुना खेळाने मिळणारे मूळ समाधान म्हणजे निरागसपणे अनुभवता येणारा हा आत्मगौरवाचा अनुभव! One may not be 'the' best player around. Yet every one could bring 'his best' into play.

परवा हरताना बोर्गला आणि जिंकताना मॅकेन्रोला, दोघांना हे समाधान मिळाले. (आणि दोघेही नंतर म्हणाले की, गतवर्षीच्या अंतिम सामन्यात हे समाधान अधिक उच्च प्रतीचे मिळाले होते.) दोघे खेळत असताना त्यांना हे समाधान जाणवत होते आणि बघणाऱ्यांनाही तसे समाधान मिळत होते.

आपले खेळाडू मात्र या समाधानाला फार कोवळ्या वयापासून पारखे होत आहेत याचे वाईट वाटते, काळजी वाटते.

आपल्या सर्वंकष सामाजिक प्रदूषणामुळे क्रीडाक्षेत्रातील प्रदूषण शक्य होते आणि या क्रीडाप्रदूषणामुळे सार्वत्रिक सामाजिक प्रदूषणाचे पोषण होते. हे दुष्टचक्र आपण आणखी किती दिवस चालू देणार ?

□

अवतीभवती । शरद कृष्णन्

# केंद्रीय मंत्रिमंडळामधील संभाव्य फेरबदल : चव्हाणांची लगोलग वर्णी लागणे कठीण !

लोकसभेच्या पावसाळी अधिवेशनाच्या आगेमागेच केंद्रीय मंत्रिमंडळाच्या विस्ताराच्या आणि खात्यांच्या फेररचनेच्या वार्ता येऊं लागल्या आहेत. केंद्रीय मंत्रिमंडळामधील अनेक मंत्र्यांना सध्या आपल्या खात्याखेरीज अन्य खात्याची जबाबदारी स्वीकारावी लागत आहे. स्वत: पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांना संरक्षणासारख्या महत्त्वाच्या खात्याचे कामकाज बघावे लागत आहे, पंतप्रधानांनी संरक्षणखाते संभाळणे ही काही कायमची तरतूद होऊ शकत नाही. त्यामुळेच यशवंतराव चव्हाण यांच्या स्वगृही परत येण्याच्या वार्तेबरोबरच त्यांना केंद्रीय मंत्रिमंडळामध्ये घेतले जाऊन संरक्षणखाते दिले जाणार अशा बातम्याही आल्या; पण प्रत्यक्षात मात्र स्वगृहाचे दरवाजे अजून तरी त्यांच्यासाठी उघडले गेलेलें नाहीत; आणि आज ना उद्या त्यांना प्रवेश दिला गेला तरी सध्याचे एकंदर वातावरण पाहता चव्हाणांची लगोलग वर्णी लागणे जरा कठीणच दिसते आहे. इंदिराजींच्या मंत्रिमंडळामधील काही ज्येष्ठ केंद्रीय मंत्र्यानी या बाबतची आपली नाराजी नोंदली असल्याने त्यांना पुनीत करून लगोलग मंत्रिमंडळामध्ये घेण्याची कल्पना मागे पडली आहे. सी. एम. स्टीफन, वसंत साठे यांनी चव्हाणविरोधी भूमिका घेतली आहे. चव्हाणांचे काय व्हायचे असेल ते होईल; परंतु खुद्द स्टीफन यांनाच वगळले जाण्याची शक्यताही बोलली जाते. एक गोष्ट निश्चित की, आजवर कधीही नव्हती एवढी प्रचंड हुकमत इंदिराजींनी प्राप्त करून घेतली आहे. अलीकडेच झालेल्या पोट-निवडणुकीमधील निकालावरून त्यांच्या लोकप्रियतेची आणि सामर्थ्याची पूर्ण कल्पना येते. त्या ज्या वेळी विशेष बलशाली नव्हत्या त्या वेळीसुद्धा सामर्थ्यशाली नेत्यांकडे असलेल्या खात्यांमध्ये बदल करवून घेऊन त्यांनी आपले वादातीत प्रभुत्व प्रस्थापित केले होते. आज चव्हाणांना केंद्रीय मंत्रिमंडळामध्ये घेणे-ना घेणे हा सर्वस्वी त्यांच्या मर्जीचा प्रश्न आहे. परंतु गृहमंत्री म्हणून चव्हाण ज्या वेळी बाईंच्या मंत्रिमंडळामध्ये काम करत होते आणि ज्या वेळी त्यांची स्वत:ची अशी बऱ्यापैकी शक्ती होती, त्या वेळीसुद्धा आपण आपल्या कोणत्याही सहकाऱ्याच्या बाबतीत काहीही करू शकतो अशा भावनेतूनच तीन वर्षे गृहमंत्रिपद संभाळणाऱ्या चव्हाणांना बाईंनी गृहमंत्रीपदावरून हलवून अर्थमंत्रीपदावर नेऊन बसवले. चव्हाण हा बदल स्वीकारण्यास राजी नव्हते; परंतु बाईंनी त्यांना तो स्वीकारण्यास भाग पाडले. केवळ चव्हाणांच्या बाबतीतच बदल केले असे नव्हे तर त्या वेळी थोडे-फार स्वतंत्र स्थान असलेल्या बाबू जगजीवनराम आणि सरदार स्वर्णसिंग यांच्या खात्यांमध्येही फेरबदल केले गेले. जगजीवनराम यांना अन्न व शेती खात्यावरून उचलून संरक्षणखाते देण्यात आले आणि स्वर्णसिंगाकडे अन्न व शेतीखाते सोपवण्यात आले. त्यानंतरही या मंडळीच्या खात्यात बाईंच्या मनाप्रमाणे फेरबदल करण्यात आले आणि अर्थमंत्रीपदी जायबंदी होऊन पडलेल्या चव्हाणांना परराष्ट्रखाते देऊन हात-पाय थोडेफार मोकळे करण्याची मुभा देण्यात आली. हा जुना तपशील देण्याचा हेतू असा की, इंदिराजींनी पंतप्रधानपद स्वीकारल्यापासून मंत्रिमंडळामधील फेररचनेबाबत आपले स्वतःचे मत अखेरचे मानून आपल्या सहकाऱ्यांची खाती बदलली, नवीन सहकाऱ्याची निवड केली आणि घेतलेल्या सहकाऱ्यांना वगळले. प्रारंभीच्या काळात कधी उमाशंकर दीक्षित, तर कधी दिनेश सिंग हे विशेष आतल्या वर्तुळामधील समजले जात. परंतु त्या वेळीही मंत्रिमंडळामधील फेरबदलाबाबत त्यांना विशेष महत्त्व नव्हते. तथापि नाही म्हटले तरी त्या काळी दबाव आणण्याइतकी शक्ती असलेले गट असत. मान्यताप्राप्त असे पाच–सात नेतेही होते आणि त्यांच्या स्थानाला हात लावताना अन्य अनेक गोष्टींचा विचार करणे जरूर होते; परंतु आणीबाणीनंतर जनता पक्षाची राजवट फसल्यावर इंदिराजी केवळ स्वत:च्या ताकदीवर सत्तास्थानी आलेल्या आहेत आणि केंद्रीय मंत्रिमंडळाची रचना व फेरबदल याबाबत पूर्वी कधीही नव्हते इतके परिपूर्ण स्वातंत्र्य त्याना आहे. आणि तरीही त्या पूर्ण मंत्रिमंडळ बनवून राज्यकारभार करत नाहीत. कोणतेही खाते संभाळणाऱ्या मंत्र्याला पाच वर्षे आपण आपले खातें संभाळू शकू असा विश्वास वाटत नाही. किंबहुना तसा तो वाटू नये अशा पद्धतीनेच बाई खातेबदल करत असतात. सार्वत्रिक निवडणुकीनंतर सहकारी काळजीपूर्वक निवडून, त्यांच्यामध्ये पूर्ण विश्वास निर्माण करून आणि मंत्रिमंडळाची परिपूर्ण रचना करून कामाला लागणे सहज शक्य होते. परंतु इंदिराजींची अशी जी खास शैली आहे त्यामध्ये या गोष्टी बसत नाहीत. खुर्ची संभाळणाऱ्या प्रत्येकाला आपले आसन सुस्थिर नसल्याचा फील देण्यात त्यांना एक प्रकारची मौज वाटत असावी. गृहमंत्री झैलसिंग आणि परराष्ट्रमंत्री नरसिंह्राव हे तसे महत्त्वाचे मंत्री; परंतु त्यांच्याही खाते-बदलण्याच्या बातम्या उठत असतात आणि महत्त्वपूर्ण मानल्या जाणाऱ्या वृत्तपत्रांतून त्या प्रसिद्ध होत असतात.

सत्ताग्रहण करताना जे मंत्रिमंडळ होते त्यामध्ये प्रथम सी. एम. स्टीफन यांना घेण्यात आले. सी. एम. स्टीफन हे विसर्जित लोकसभेमधील इंदिरा काँग्रेसचे नेते. सार्वत्रिक निवडणुकीच्या वेळी ते नवी दिल्लीमधून निवडणूक लढवत होते. इंदिरा काँग्रेसचे उमेदवार सर्वत्र विजयी होत असताना स्टीफन अटलजीकडून पराभूत झाले. पुढे त्यांना कर्नाटकामधील गुलबर्गा मतदारसंघातून निवडून आणण्यात आले. मंत्रिमंडळामध्ये त्यांना महत्त्वाचे खाते दिले जाईल अशी सर्वांची अपेक्षा होती. खुद्द स्टीफन यांचे संरक्षण खात्यावर लक्ष होते. किंबहुना हे खाते आपणासाठीच मोकळे ठेवले आहे असेही त्यांना कुठे तरी वाटत असावे; पण त्याना मंत्रिमंडळात घेण्यात येऊन पोस्ट व टेलिग्राफसारखे दुय्यम दर्जाचे खाते देण्यात आले आणि जराही कुरकूर न करता जे मिळाले ते गोड मानून त्यांनी ते स्वीकारले. वीरेंद्र पाटील यांनी इंदिराजींविरुद्ध चिकमंगळूर येथून निवडणूक लढवली होती. ते पराभूत झाले. पुढे इंदिरा काँग्रेसमध्ये सामील होऊन लोकसभेमध्ये निवडून गेले. त्यांना मंत्रिमंडळामध्ये घेतले जाईल असे

कोणाला वाटले होते ? पण बाईंनी त्यांना सामावून घेतले. वीरेन्द्र पाटील मंत्रिमंडळामधील आपले खाते कसे संभाळतात हे कधी कोणाला समजले नाही. परंतु इंदिराजीची थोरवी गाण्याची जेव्हा जेव्हा वेळ आली तेव्हा तेव्हा बघा, खुद्द त्यांच्याविरुद्ध निवडणूक लढवणाऱ्या वीरेंद्र पाटलांना बाईंनी मंत्रिमंडळामध्ये सामावून घेतले याचा दाखला दिला गेला. केवळ त्यासाठीच त्याना मंत्रिमंडळामध्ये घेतले असावे असे वाटावे इतक्या वेळा या गोष्टीचा उल्लेख केला गेला.

मंत्रिमंडळाच्या फेररचनेमध्ये एकच महत्त्वपूर्ण बदल गेल्या जून-मध्ये झाला. त्या वेळी तीन कॅबिनेट मंत्र्यांच्या सहा राज्यमंत्र्यांचा आणि नऊ उपमंत्र्यांचा मंत्रिमंडळामध्ये समावेश करण्यात आला. त्या वेळी तशी गरजही निर्माण झाली होती. कारण केन्द्रीय मंत्री मंडळामधील तीन मंत्र्यांना राज्यामध्ये मुख्यमंत्री म्हणून पाठवण्यात आले होते. जे. बी. पटनायक ओरिसामध्ये, जगन्नाथ पहाडिया राजस्थानमध्ये आणि टी. अंजय्या आंध्र प्रदेशात मुख्यमंत्री म्हणून गेले होते. त्यामुळे मंत्रिमंडळाच्या रचनेमध्ये महत्त्वपूर्ण फेरबदल होणे अपेक्षित होते. त्या वेळी जे मंत्री घेण्यात आले त्यामध्येच महाराष्ट्रातून निवडून गेलेले शंकरराव चव्हाण होते. शरद पवाराच्या मंत्रिमंडळात अर्थमंत्रीपद भूषवणाऱ्या शंकररावांना त्या मानाने लवकरच पुनित करून घेण्यात आले असेच म्हटले पाहिजे. आताही मंत्रिमंडळामध्ये काही महत्त्वपूर्ण फेरबदल अपेक्षित आहेत. पोलाद खाते आणि मजूर खाते यांना कॅबिनेट दर्जाचा मंत्री नाही. वसंत साठे यांच्या विरुद्ध सूर लावताच माहिती आणि नभोवाणी खात्यात राज्यमंत्री म्हणून काम करणाऱ्या राम दुलारी सिन्हा यांना मजूर खात्यामध्ये राज्यमंत्री म्हणून नेमण्यात आले; पण या खात्याला कॅबिनेट दर्जाचा मंत्री मिळणे आवश्यक आहे. नागरी पुरवठा आणि सहकार ही तशी महत्त्वाची खाती. व्ही. सी. शुक्ला यांची हकालपट्टी झाल्यानंतर शेती आणि ग्रामीण विकास खात्याचे मंत्री राव बिरेंद्रसिंग या खात्याची धुरा संभाळत आहेत. या खात्या-खेरीज राव बिरेन्द्रसिंग यांच्याकडेच पाटबंधारे खातेही देण्यात आले आहे. कमलापति त्रिपाठी यांनी रेल्वेमंत्रीपदाचा राजीनामा दिल्यानंतर केदार पांडे याच्याकडे हे खाते देण्यात आले. रेल्वे खाते अत्यंत महत्त्वाचे असल्याने आणि या खात्यामध्ये काही तातडीच्या सुधारणा करणे आवश्यक वाटल्यामुळे केदार पांडे यानी पूर्ण वेळ रेल्वे खात्याचेच काम पहावे असा आदेश देऊन, इंदिराजींनी केदार पांडे यांच्याकडे असलेल्या पाटबंधारे खात्याची जबाबदारीही राव बिरेंद्रसिंग यांच्यावर सोपविली. भारतासारख्या शेतीप्रधान देशाला वास्तविक शेती खात्यासाठी स्वतंत्र मंत्री हवा; पण राव बिरेंद्रसिंग यांच्यावर सध्या इतर खात्यांचे दडपण एवढे मोठे आहे की, त्यांच्या मूळ खात्याकडे लक्ष देण्यास त्यांच्याजवळ पुरेसा वेळ नाही. डॉ. चंद्रजित चानना याच्याकडे उद्योग खाते आहे; परंतु हे महत्त्वाचे खाते त्यांच्याकडे तात्पुरते दिले आहे असेच भासवले जात आहे.


पोटनिवडणुकीनंतर लगोलग मंत्रिमंडळामधील फेरबदल होतील अशी अपेक्षा होती. यशवंतराव स्वगृही परतणार असल्याच्या बात-मीने या फेरबदलाबाबतच्या बातम्याही आल्या; पण प्रत्यक्षात अजून काहीच बदल झालेले नाहीत. तथापि हे खटले असेच दीर्घकाळ रेटणेही शक्य नाही. किमान चार ते पाच नवीन मंडळी मंत्रिमंडळा-मध्ये घेतली जातील आणि काही ज्येष्ठ मंत्र्यांसह अनेकांची खाती बदलली जातील अशी अपेक्षा आहे आणि या महिन्याभरातच इंदिराजी याबाबतचा काही अंतिम निर्णय घेतील असे दिसते. मंत्रिमंडळाच्या या पुनर्रचनेच्या वेळी राजीवचा सल्ला घेतला जाईल आणि त्याच्या विचारांना महत्त्वपूर्ण स्थान दिले जाईल याची कल्पना असल्याने इच्छुक मंडळीची त्याच्या भोवती बऱ्यापैकी ऊठ-बस आहे. जे काही बदल व्हायचे आहेत ते इंदिराजी व राजीव याच्यामधील चर्चेमधूनच होतील. अन्य कोणत्याही नेत्याला याबाबत विश्वासात घेतले जाणार नाही.

## □ मुंबईमधील अरेबियन नाइटस

नोटांची पुडकी घेऊन मौजमजा करण्यासाठी भारतामध्ये आलेल्या अरबाच्या अनेक सुरस आणि चमत्कारिक कथा ऐकायला मिळतात. हे अरब गटागटाने येतात. मुंबईच्या नामांकित हॉटेल्स-मधून त्यांचा मुक्काम असतो. मौजमजा करण्यासाठीच ते भारतात आले असल्याने बाई-बाटलीचा शौक ते पूर्ण करतात; पण मुंबईमध्ये दीर्घकाळ मुक्काम ठोकून राहणाऱ्या या अरबांचे अनेक मजेशीर किस्से चवीने सांगितले आणि ऐकले जातात. मुबईच्या धुवांधार पावसामध्ये चौपाटीवर अरबांचे एक टोळके मोठ्या मजेत रोज भिजत असे. चार-पाच दिवस त्यांना भिजताना पाहिल्यावर आजू-बाजूच्या मंडळींनी कुतूहलाने विचारणा केल्यावर त्यानी सांगितले, आपण पावसात उदंड भिजण्यासाठीच मुबईला आलो आहोत. असा बदाबदा कोसळणारा पाऊस हे आम्हाला फार मोठे अप्रूप आहे. असा पाऊस पहाणे आणि त्याचा आनंद लुटणे यासाठी तुम्हाला पाच वर्षे गल्फमध्ये राहिले पाहिजे. अरब म्हणजे नोटांची चळत बघता बघता चुटकीसरशी खर्च करणारा प्राणी अशी ख्याती या मंडळींनी मिळवली असल्याने अरब पाहिला की हॉटेलवाले, टॅक्सी-वाले सुखावतात. बरा बकरा मिळाला अशा समजुतीने त्याची भरपूर लुबाडणूक करतात. या गोष्टी अरबाला कळत नाहीत असे नाही; पण तो डोळेझाक करतो, तर कधी कधी खरोखरच फसला जातो. अरबांचे आणखी एक आवडीचे ठिकाण म्हणजे मुबईमधील हॉस्पिटल्स. या हॉस्पिटल्सचा अनेक अरबांकडून हॉटेलप्रमाणेच वापर केला जातो. आता हॉस्पिटलमध्ये रुग्ण म्हणून रहावे लागत असल्याने त्याना ठराविक आहार घ्यावा लागतो. अर्थात हा आहार केवळ कागदोपत्री असतो. त्यांना त्यांच्या आवडीचे भोजन बाहेरून आणून पुरवले जाते आणि सढळ हाताने पैशाचे वाटप करून ते हॉस्पिटलमधील कर्मचाऱ्यांची तोंडे बंद करतात. साठ दिवसांपेक्षा जास्त रहायचे असेल तर ज्या हॉस्पिटलमध्ये प्रमुख डॉक्टरांची मान्यता घ्यावी लागते त्या हॉस्पिटलमध्ये एक अरब चांगला १२० दिवस राहिला आणि त्याला आजार झाला होता थंडी-तापाचा आणि भले थंडी-तापाने आजारी असला तरी रोज चांगली कोंबडी झोडत होता. १२० दिवसांनंतर हॉस्पिटल सोडताना त्या अरबाने कर्मचाऱ्यांमध्ये तीन हजार रुपये वाटले. आला तेव्हा १५० पौंडांचा

हा अरब जाताना आणखी तीस पौंड बरोबर घेऊन गेला. मोठ्या श्रीमंत मंडळींच्या हॉस्पिटलमध्ये वातानुकूलित खोल्यांचा जो दर असतो तो तारांकित हॉटेलपेक्षा कमी असतो. खेरीज भोवती छान छान नर्सेस फिरत असल्याने वातावरण मोठे छान असते. त्यातून अरबट–चरबट खाण्यापिण्यामुळे अथवा वेडेवाकडे वागल्यामुळे सहज आजारी पडले तर मुक्काम हॉस्पिटलमध्येच असल्यामुळे उत्तम देखभाल केली जाते. त्यामुळे अनेक अरब चक्क हॉस्पिटलचा हॉटेलप्रमाणेच वापर करतात. अरबांची एकंदर वागणूक मात्र गलिच्छ असल्याने ते उदंड पैसे खर्च करत असले तरीही त्यांच्याबाबत नाखूष असलेली हॉटेलसही आहेत. हे अरब आरडाओरडा करतात, कोणत्याही बाया खोलीत आणून धुडगूस घालतात. जमिनीवर बसून खातात. सर्वत्र खाद्यपदार्थ तसेच सांडून ठेवतात. घाणेरडे खरकटे हात धुण्याऐवजी पडद्यांना अथवा चादरींना पुसून टाकतात. हात पुसण्यासाठी ठेवलेल्या स्वच्छ टॉवेलसचा बूट साफ करण्यासाठी वापर करतात. खेरीज हॉटेल सोडून जाताना कित्येक वेळा उत्तम अॅशट्रे अथवा पांघरण्यासाठी ठेवलेले रग्ज, साबण, नॅपकिन्स हे सारे जणू काही आपलीच मालमत्ता आहे असे समजून घेऊन जातात. एका हॉटेलमधील अरब चक्क गादी घेऊन जाऊ लागला आणि त्याला हटकल्यावर त्याने थोड्याशा नोटा भिरकावल्या आणि म्हणाला, 'मी जरा मोकळ्या जागेत मौजमजा करण्यासाठी जातो आहे. वातानकूलित थंडाव्याचा कंटाळा आला आहे; तुझी गादी देईन दोन दिवसांनी आणून; सध्या हे पैसे ठेवून घे !' मुंबईमधील त्यांचा अनुभव त्यांना असे सांगत असतो की, या मायानगरीत पैशाच्या ताकदीवर काहीही खरेदी करता येते. त्यामुळे वादाचा कोणताही मुद्दा आला की, ते त्यावर पैशाची तोड काढतात ! एका हॉटेलमालकाने, अरबांनी आपल्या हॉटेलमधील खोलीची जी वाट लावली त्याबद्दल विलक्षण नाराजी व्यक्त केली. त्यानंतर जोरदार वादावादी होऊन प्रकरण चांगलेच हातघाईवर आल्यावर अरबांनी हॉटेलमालकाला विचारले, 'बच्चू, तुझ्या हॉटेलची किंमत काय ? आम्ही तुझे हॉटेलच विकत घेऊन टाकतो म्हणजे प्रश्न मिटला !' हॉटेलमालकाने नुकसानीपोटी दोन हजार रुपये घेतले आणि त्यानंतर आपल्या हॉटेलमध्ये पुन्हा अरबांना प्रवेश दिला नाही ! जागा शिल्लक नाही, हे ठराविक उत्तर त्यांनी अरबांसाठी तयार ठेवले ! एका दयाळू अरबाला रस्त्यावर भुक्या फिरणाऱ्या मंडळींची दया आली. त्याने शंभर तंदुरी चिकनची ऑर्डर दिली. प्रत्येक डिश वेगळी बांधायला सांगितली आणि आपल्या सहाव्या मजल्यावरील खोलीच्या गच्चीत उभे राहून त्याने तंदुरी चिकन खाली फेकण्यास प्रारंभ केला. बघता बघता गर्दी जमली आणि पोलीस बोलावून हे प्रकरण आवरावे लागले ! दुसऱ्या एका अरबाने हॉटेल सोडताना पाच हजार रुपयांची मोड खिरापतीप्रमाणे रस्त्यावरील लोकांमध्ये वाटली. मुठी भरभरून तो नाणी फेकू लागल्यावर ते गोळा करणारांची खूपच गर्दी जमली. आपल्याला जास्तीत जास्त नाणी मिळावीत यासाठी जमलेली मंडळी मारामारी करू लागल्यावर अरब व्यथित झाला. त्याने त्यातीलच दोन-चार बलदंड मंडळींना बाजूला घेतले. खाणाखुणा करून त्यांना रांग लावायला सांगितली व रांगेत येणाऱ्या प्रत्येकाचा चेहरा पाहून, किती दान करायचे याबाबतचा निर्णय घेऊन त्याने उरलेल्या पैशाचे वाटप केले. हे अरब हिंदुस्थानात येतात, मुस्लिम वस्ती असलेल्या गावांमध्ये जाऊन गोर-गरीब मुसलमानांच्या मुलींबरोबर लग्ने लावतात व त्यांना पुढे वाऱ्यावर सोडून देतात अथवा स्वदेशी नेऊन मोलकरणींप्रमाणे राबवतात ! 'अरबांची लग्ने' हा स्वतंत्र व गंभीर विषय असून त्याची दखल पुढील अंकी घेण्याचे ठरवले आहे. सध्या या अरेबियन नाइटच्या कथा पुरेशा आहेत !

□

सामाजिक चळवळीच्या इतिहासाविषयी आस्था असणाऱ्या सर्वांना हे पुस्तक वाचावंसं वाटल्याशिवाय राहणार नाही. –डॉ. य. दि. फडके

**महाडचा मुक्तिसंग्राम**

लेखक : प्रा. रा. म. बिवलकर / प्रा. झुंबरलाल कांबळे

मूल्य : वीस रुपये. राजहंस प्रकाशन, पुणे ३०.

मध्य रेल्वे लोकलच्या सदोष वाहतुकीसंबंधी गेल्याअंकात काही मोटरमेनच्या मुलाखती दिल्या होत्या. आता या ठिकाणी लोकलच्या गार्डांची या प्रश्नासंबंधीची मते मुलाखतीद्वारे प्रसिद्ध करत आहोत.

# मध्य रेल्वेची बदनाम लोकल वाहतूक ( २ )

प्रा. चंद्रशेखर राजे

मोटरमननंतर गार्डचा विचार करणे अगदी आवश्यक आहे. कारण तो गाडी 'गार्ड' करतो ना ? तर आपण भेटू या, गार्डमहाशयांना. त्यांनाही काही सांगावयाचे, सुचवावयाचे असेल. मी साऱ्यांना पहिला प्रश्न असा विचारला की, मोटरमन लोकल चालवितो म्हणून तो एक अपरिहार्य, आवश्यक आहे. त्याच्याशिवाय गाडी (आज तरी) चालू शकणार नाही; पण लोकलला गार्ड हवाच कशाला ? एस. टी. मध्ये किंवा बसमध्ये (बेस्टच्या) कंडक्टर प्रवाशांना तिकिटे देतो, प्रवाशांना नेमके कोठे उतरायचे आहे हे ध्यानात ठेवून गाडी थांबविण्यासाठी व (प्रवासी चढले वा उतरले की) सुरू करण्यासाठी ड्रायव्हरला घंटा वाजवून इशारा देतो. तुम्ही तिकिटे देत नाही, मोटरमनला ठाऊक असते की, गाडी कोठे आणि किती वेळ थांबवावयाची. तुमचे नेमके काम कोणते ? तुमचे नेमके स्थान कोणते ? एकाने म्हटले, 'प्रत्येक प्रवाशाला असेच वाटते की काय ? अहो, आम्हाला गार्ड म्हणतात ते का ? आम्ही प्रवाशांना आणि लोकलला 'गार्ड' करतो म्हणून आम्ही 'गार्ड' ! मोटरमनने आमच्या सूचनेबरहुकूम गाडी थांबवावयाची व सुरू करायची. कोठे, कधी आणि किती वेळ गाडी थांबवावयाची ही सारी जबाबदारी गार्डाची असते. प्रवासी नीट चढले का, उतरले का हे तर आम्ही पाहतोच; पण प्रवाशांच्या सूचना व तक्रारी पण आम्हीच ऐकतो. धोक्याची साखळी ओढल्यानंतर किंवा गाडीत वा फलाटावर काही झाले तर गार्डनेच बाहेर पडायचे असते. मोटरमनने आपली जागा सोडावयाची नसते. अलार्म चेन, हेड लाइट्स, डब्यांमधले पंखे, दिवे यांच्यावर गार्डनेच लक्ष ठेवायचे असते.' मी विचारले, 'तुम्ही आता पंख्यांबद्दल सांगितलेत. प्रवाशांचा अनुभव असा आहे की, 'भर थंडीत डब्यातील सारेच्या सारे पंखे पूर्ण वेगाने फिरत असतात व भर उन्हाळ्यात सारेच्या सारे बंद असतात ही किमया तुम्हाला कशी साधते ? मला या संदर्भात एक किस्सा आठवतो तो सांगतो. मग तुम्ही तुमचे उत्तर द्या. एका लॉण्ड्रीवाल्याने आपल्या लॉण्ड्रीत अगदी अद्ययावत यंत्रे बसविली. या नव्या यंत्रसज्ज लॉण्ड्रीचे उद्घाटन आपल्या जुन्यात जुन्या गिऱ्हाइकाच्या हस्ते त्याने केले. त्याला सारी यंत्रे दाखविली. आपल्या गिऱ्हाइकाला प्रतिक्रिया विचारली. त्या गिऱ्हाइकाने विचारले, 'तुम्ही सारी यंत्रे नाही दाखविलीत. एक यंत्र दाखवायचे राहून गेले.' प्रश्नार्थक चेहऱ्याने लॉण्ड्रीवाल्याने गिऱ्हाइकाकडे पाहिले. त्या गिऱ्हाइकाने सांगितले, 'शर्ट, पॅंटची बटणे तोडण्याचे यंत्र कोठे दाखवलेत ?' 'तशी ही किमया करणारे बटन कोठे असते ?' मी विचारले. हसत हसत ते महाशय उत्तरले, 'ही किमया कारशेडमुळे होते. आता हा कारशेडचा संदर्भ आलाच आहे तर मी त्याबद्दल सांगतो. कुर्ला कारशेडमध्ये अत्यंत अनागोंदी कारभार चालतो. त्यांच्या कामावर कोणाचेच नियंत्रण नाही. इ. स. १९७४ साली रेल्वेचा संप झाला. त्या संपानंतर जे अगोदरपासूनच नामांकित उपद्रवी कामगार होते त्याना काढून टाकले; पण तुमच्या आवडत्या आणि लाडक्या रेल्वेमंत्र्यांनी–प्रा. दंडवते यांनी–त्यांना परत कामावर घेतले. ही मूठभर माणसे माजली आहेत,' तो तावातावाने सांगू लागला– 'काम करायचे नाही, नुसतं बसून पगार खायचा, दंडेली करायची ही त्यांची वृत्ती आहे.' 'प्रशासन त्यांची अन्यत्र बदली का करीत नाही', या प्रश्नाला उत्तर देताना तो सांगू लागला, 'युनियनने त्याची कड घेतली. ही बारा-चौदा माणसे कारशेडचे सारे काम बिघडवून टाकतात. त्यांच्यामुळे एकही डबा व्यवस्थित होऊ शकत नाही. त्यांनी घातलेल्या गोंधळाचा फटका बसतो आम्हाला. प्रवाशाच्या रागाला गार्डालाच तोंड द्यावे लागते. प्रवाशांना लगेच दिसू शकणारा, भेटू शकणारा रेल्वेचा प्रतिनिधी म्हणजे गार्ड होय.' एक जण सांगू लागला, 'आमच्यावर अनेक गोष्टींचा ताण पडतो हे प्रशासनाच्या लक्षातच येत नाही. आजच्या लोकलच्या वाढत्या व्यापाला ही जुनी-पुराणी प्रशासनपद्धती पुरी पडू शकत नाही. नेमके काय करायला पाहिजे, काय नको हे प्रशासनाला ठाऊकच नाही. त्यांच्या कल्पना (लोकल वाहतुकीच्या) अगदी ताठर आहेत, जुनाट आहेत. आज पडलेला फरक त्यांना कळतच नाही.' 'कारशेडमुळे, वर्कशॉपमुळे वा गाडी तपासनिसांमुळे (त्यांच्या बेफिकिरीमुळे) काही त्रुटी राहिल्या आहेत हे तुमच्या ध्यानात आल्यावर अशी नादुरुस्त गाडी तुम्ही स्वीकारताच का, तेथेच नकार का देत नाही ?' असे विचारल्यानंतर अनेकांकडून, वेगवेगळ्या वेळी मिळालेली उत्तरे जवळजवळ सारखीच होती. त्याचा सारांश असा : अशी गाडी आम्ही चालविण्यास, न्यावयास नकार देतो; पण अधिकारी सांगतात की, एक फेरी करता येईल, तुम्ही गाडी घेऊन जा. आम्ही गाडी घेऊन जातो. एक फेरी पूर्ण होण्याअगोदरच गाडी चालेनाशी, काम देईनाशी होते. वाटेतच अडकते. मग सारी साखळीच कोलमडते. मी जरी नाही म्हटले, तरी दुसरा कोणी तरी अशी गाडी न्यावयास तयार होतो. त्याला लवकर

काम संपवून घरी जावयाचे असते. (गाडी वाटेत बिघडल्यामुळे त्याला अद्दल घडते हा भाग निराळा) किंवा अधिक पैसे (अधिक फेऱ्या केल्यामुळे) कमवायचे असतात म्हणून तो तयार होतो. न नेणारा मी बदनाम होतो. असहकार करतो अशी वरिष्ठांची समजूत होते आणि पैसेही बुडतात. हे सारे टाळण्यासाठी मीच अधिकाऱ्याचे म्हणणे योग्य नसूनही तयार होतो.

'आमच्यातही एक-दोन टक्के नालायक आहेत, एकजुटीला सुरुंग लावणारे आहेत; पण ते आपल्या गार्डच्या कामात तरबेज आहेत, माणूस म्हणून स्वार्थी आहेत '

'तुमच्यात दारू पिणाऱ्यांचे प्रमाण किती आहे?' असे विचारले असता एक जण म्हणाला, 'आमच्यातील दहा टक्के गार्डस् दारुडे आहेत; पण ते कामावर मात्र पिऊन येत नाहीत. जर आलेच तर वरिष्ठ त्याना त्या अवस्थेत गाडीवर जाण्यास मनाई करतात.'

'गार्डने जे सुरक्षा नियम पाळले पाहिजेत ते तुम्ही पाळत नाही. वाटेत गाडी थांबली असताना मागून येणाऱ्या गाडीच्या ड्रायव्हरला हे कळण्यासाठी गाडीचे दिवे(Detonotors)लावणे, लाल बावटा घेऊन ठराविक अंतरावर उभे राहणे इत्यादी नियम तुम्ही पाळत नाही, म्हणून अपघात होतात असे जे म्हटले जाते त्यावर तुमचे काय म्हणणे आहे?' त्यावर एकाने उत्तर दिले, 'प्रत्येक वेळी दिवे ठेवण्याएवढा वेळ नसतो, लागणार नसतो, लाल बावटा घेऊन जाण्याची आवश्यकता वाटत नसते. मोटरमन ठरवितो की, दिवा लावायचा की नाही. त्याला वाटत असते की, गाडी लगेच सुरू होईल. खाली उतरून हे सोपस्कार करण्यात वेळ घालविणे त्याला कधीकधी अनावश्यकही वाटते. सुरक्षा-नियम आम्ही पाळतोच आणि पाळलेच पाहिजेत, कारण त्यात प्रवाशांच्या सुरक्षिततेबरोबरच आमच्याही जगण्या-मरण्याचा प्रश्न गुंतलेला असतो. अशी भलतीसलती ढिलाई आम्ही करणार नाही!'

## लोकलमधील गुंडगिरी रोखली पाहिजे!

'गाडीचे संरक्षण करणे, प्रवाशांच्या सोयी-गैरसोयीकडे पाहणे तुमचे काम आहे; पण स्त्रियाना त्रास देणाऱ्यांना, स्त्रियांच्या डब्यातून प्रवास करणाऱ्या पुरुषाना, उपद्रवी व्यक्तीना तुम्ही हुसकत घेत नाही, त्यांच्याकडे काणाडोळा करता असे वारंवार म्हटले जाते, यावर तुमचं काय म्हणणं आहे?' असे विचारल्यानंतर एकाला स्फुरणच चढले. तो तावातावाने सांगू लागला, 'खिडकीला दरवाजाला लोंबकळून, टपावर चढून प्रवास करणारे खाली आपटतात, जखमी होतात. हे रोजरोज पाहून आमच्या नजरा मेलेल्या आहेत. जर एखादा प्रवासी फलाटावरच पडला तर तो गाडीखाली जाणार नाही (गाडीची रचनाच अशी केली आहे), तो फलाटावर आपटून जखमी होईल. डब्यातून-विशेषतः स्त्रियांच्या डब्यांतून-मवाली पोरे, गुंड, पाकीटमार, साखळीचोर धुमाकूळ घालतात. त्रास देतात अशी तक्रार आली की आम्ही सहाय्यक स्टेशनमास्टरकडे जातो, पोलिसांना बोलावले जाते. पोलीस येतात व त्या त्रास देणाऱ्याना हाकलून लावतात. (पाकीटमार, साखळीचोर हाताला लागत नाहीत हे सांगावयास नकोच). या साऱ्या प्रकारात वेळ जातो, गाडीचा खोळंबा होतो. ही पोरे पुढल्या स्टेशनवर पुन्हा बायकांच्या डब्यात चढतात. गाडीचा खोळंबा होऊनसुद्धा स्त्रियांचा त्रास कमी होत नाही.' 'यावर तुम्ही कोणता उपाय सुचवाल?' असे विचारल्यानंतर तो सांगू लागला, 'पोलिसांनी त्या उपद्रव्यांना-मुले असोत वा बाप्ये असोत-आपल्या ताब्यात घ्यावे, त्याना तेथल्या तेथे साऱ्यांच्यादेखत फटके मारावेत तरच हा त्रास कमी होईल. तुम्ही हा गुंडगिरीचा प्रश्न काढलात म्हणून सांगतो. कांजूरमार्ग ते ठाकुर्ली हा विभाग मी अशांत विभाग मानतो. गाडीतील सारी गुंडगिरी या विभागातच होते. रेल्वे प्रशासनाने हा विभाग अशांत म्हणून जाहीर करावा आणि त्या दृष्टीने कडक कारवाई करावी. पहाटे तीन वाजल्यापासून पाच-साडेपाचपर्यंत गुंडांच्या टोळ्या या विभागात फिरत असतात. या दरम्यानच्या चार-पाच गाड्यांना खास पोलीस-संरक्षण देऊन त्या गाड्यांचे, त्यातील प्रवाशांचे संरक्षण केले पाहिजे. आमच्या डोळ्यांदेखत लूटमार चालते, चाकू-सुरे दाखविले जातात. आम्हालाच पुरेसे संरक्षण नसल्यामुळे आम्ही काहीही करू शकत नाही. ती माणसे लक्षात ठेवून आमचा काटा कधीही काढू शकतील. खास पोलीसपथके ठेवून ही गुंडगिरी बंद केली पाहिजे. आम्हाला 'तक्रार आली तरच दखल घ्या,' असे वरिष्ठांचे सांगणे असते. 'तुम्ही तुमचे काम सोडून नसत्या फंदात का पडलात' असे अधिकारी विचारतात-आमची अवस्था मृदुंगासारखी होते. एका बाजूने थापटतात वरिष्ठ आणि दुसऱ्या बाजूने हाणतात प्रवासी!'

'जरा अलिप्तपणे, तटस्थपणे विचार करून कोणत्या उणीवा तुमच्यात, प्रशासनात दिसतात, त्यात सुधारणा कशी करता येईल हे सांगू शकाल का?' असे विचारल्यानंतर प्रत्येकानेच या प्रश्नाचे उत्तर दिले असे नाही. ज्यानी उत्तर दिले ते म्हणाले, 'गार्डने (अर्थात मोटरमननेही) जर चांगले, व्यवस्थित काम करावे असे वाटत असेल, चांगली चांगली माणसे या नोकरीकडे वळावीत यासाठी गार्डला मिळणारा पगार, मोबदला चांगला आकर्षक हवा. त्यासाठी Mileage चे नियम बदलले पाहिजेत, Mileage म्हणजे नेमून दिलेल्या कामाचा मैलावर / कि. मी. वर हिशेब करणे. इतर अनेक क्षेत्रात कर्मचाऱ्यांना टी. ए.-डी. ए. मिळतो तसा गार्ड / मोटरमेनना Mileage मिळते. अधिक काम करावे यासाठी ते आमिष असावे. आजच्या नियमांमुळे काम टाळण्याकडे प्रवृत्ती होते. असे काम टाळणाऱ्या आपल्या सभासदांना संरक्षण देण्याचे काम युनियन करते. गार्डलोकांची युनियन वाहतूक विघडविण्यास अशा तऱ्हेने कारणीभूत होते. गार्डला जे प्रशिक्षण दिले जाते ते कुर्ला कारशेडमध्ये. त्याची पुनर्रचना केली पाहिजे. तिथल्या शिक्षकाना ज्ञान नसते, माहिती नसते. तावातावाने बोलणाऱ्या त्या महाशयाना जरा अडविले. कारण गार्ड-महाशय विद्यार्थी-शिक्षक प्रश्नावर घसरले होते. मी त्यांना म्हणालो, 'सगळेच विद्यार्थी आमच्या मास्टरला, प्राध्यापकाला शिकविता येत नाही, त्याला काहीही ठाऊक नाही असे म्हणतात, त्यातलाच हा प्रकार नाही ना?' ते म्हणाले, 'नाही. तसे नाही. या मी हे अगदी प्रामाणिकपणे सांगतो आहे. ज्याना Line working नकोसे वाटते, घृणा वाटते ते या ठिकाणी येतात. इतर कामाचा कंटाळा आला म्हणून ते आमचे मास्टर-शिक्षक बनतात. इतर काहीही करण्याची कुवत नसते म्हणून मास्टर बनतात. गार्ड व मोटरमनला चांगले प्रशिक्षण वारंवार मिळाले पाहिजे. भुसावळ येथे रेल्वेने प्रशिक्षणाची फार छान सोय केली आहे तेथेच लोकलवर काम करणाऱ्या गार्ड-मोटरमनना पाठविले पाहिजे. दर

तीन वर्षांनी गार्ड व मोटरमनला प्रशिक्षणासाठी पाठविलेच पाहिजे. त्याचप्रमाणे गार्ड व मोटरमनची नेमणूक करताना त्यांना तांत्रिक ज्ञान असले पाहिजे. मोटरमनला मेकॅनिकल व इलेक्ट्रिकचा डिप्लोमा असणे आवश्यक आहे. गाडीतील धोक्याची साखळी वारंवार ओढली जाते वा लोक लोंबकळतात म्हणून खाली येते, आज ती साखळी ज्या ठिकाणी आहे तेथून बदलावी असे आम्ही वारंवार सांगितले. शक्यतो प्रवाशांच्या डोक्यावर असण्याऐवजी ती खालून जावी असे सुचविले; पण प्रशासनाने तसे करणे शक्य नाही, असे सांगितले.'

मोटरमेन आणि गार्डस् यांच्याकडून लोकलवाहतुकीविषयी वस्तुस्थिती समजून घेतल्यानंतर सहाय्यक स्टेशनमास्टरांशीही बातचीत करणे आवश्यक आहे. इथे एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, प्रत्येक स्टेशनवर असणारे स्टेशनमास्टर आणि लोकल वाहतुकीशी संबंधित सहाय्यक स्टेशनमास्टर हे दोन वेगळे प्रकार आहेत. स्टेशनवरचे स्टशनमास्टर आणि लोकल वाहतूक याचा संबंध कमी येतो. स्टेशनवरच्या सहाय्यक स्टेशनमास्टराकडे गार्ड आला तरच त्यानी त्याला लागेल ती मदत द्यावयाची नाही तर त्या स्टेशनमास्टराचा लोकल वाहतुकीशी सुतराम संबंध नाही. त्याचे राज्य वेगळे, त्याचे प्रश्न वेगळे. आपल्या विषयाशी संबंधित सहाय्यक स्टेशनमास्टर म्हणजे मोटरमेन व गार्डस् यांच्याकडून काम करवून घेणारे त्याचे वरिष्ठ, त्यांची संख्या कमी असते; पण त्यांचा लोकल वाहतुकीशी साक्षात संबंध असतो. त्यानीच गाड्यांची ये-जा, वेळापत्रक सांभाळणे, रजा इत्यादींवर लक्ष ठेवायचे असते. या सहाय्यक स्टशनमास्टरची नेमणूक गार्डमधून झाली, त्याना गार्डपेक्षा अधिक पगार मिळाला तरच लोकलवाहतूक सुधारेल.

## नियम आणि प्रशिक्षणात आमूलाग्र बदल हवा !

मी प्रश्न विचारला, 'तुम्हा सहाय्यक स्टशनमास्तराना काम तरी कोणते आणि कशा प्रकारच असते?' एकजण म्हणाला, 'अगदी बारसे ते बारावे! म्हणजे गाडी सोडण्यापासून ती वेळेवर सुटेल की नाही हे पाहण्यापर्यंत. ही एक तारेवरची कसरतच आहे. गार्ड व मोटारमनची हजेरी, उपस्थिती अपेक्षेएवढी असलीच पाहिजे तरच गाड्या सोडता येतात. हल्ली दूरदर्शन हा एक नवा रोगच निर्माण झाला आहे. (दुसऱ्याने तर चक्क त्याला 'झंझट' हाच शब्द वापरला)! गार्ड, मोटरमेन शनिवार/रविवारी येतच नाहीत कामावर! एक पारशी गार्ड टी. व्ही. वरच्या चिमणरावावर इतका लट्टू झाला होता की, त्याला जर तो कार्यक्रम पाहता येण्याजोगी ड्यूटी मिळाली नाही तर तो खुशाल दांडी मारीत असे किंवा रजा घेत असे. दूरदर्शनावर जर चागला हिंदी सिनेमा असेल तर मात्र विचारूच नका! हिंदी सिनेमामुळे गार्डस् व मोटरमेनपैकी वीस टक्के लोक गैरहजर राहतात.'

आज सर्वत्र राखीव जागाबद्दल चर्चा होत आहे, असंतोष आहे. त्या वादाचा परिणाम गार्डस्, मोटरमेन, स. स्टे. मास्तर यांच्यावरही झाला आहे. हे प्रमाण किती आहे हे जाणून घेण्यासाठी या तिघांना प्रश्न विचारले. त्यांनी सांगितले, 'दलित समाजातील लोकांना बढत्या मिळाल्यामुळे वाहतुकीवर फारसा परिणाम होत नाही. आमच्यात असंतोष आहे हे नक्की.' एक गार्ड व एक स. स्टे. मास्तर, दोघेही ब्राह्मण असल्यामुळे ते या प्रश्नाचा विचार कसा करतात हे जाणून घेण्यासाठी त्यांना म्हटले, 'तुम्ही ब्राह्मण आहात, सवर्ण आहात म्हणून असंतोष व्यक्त करता का? जरा अलिप्तपणे, जरा वेगळ्या दृष्टिकोणातून या प्रश्नाचा विचार का नाही करीत? त्यांना आपण फार काही देतो असे का मानता?' त्यावर त्या दोघांनीही एकमुखाने सांगितले, 'या प्रश्नाचे गांभीर्य आम्ही जाणतो. आम्ही ब्राह्मणी दृष्टीकोणातून या प्रश्नाकडे पहात नाही. या प्रश्नाचा विचार व्यावहारिकदृष्ट्या करतो. या मंडळींना सरळच नेमणूक मिळते. ते आमच्या डोक्यावर येऊन बसतात. त्यांना सहकार्य मिळत नाही. आमच्यापैकी काहीजण देत नाहीत. ती मंडळीही शिकत नाहीत. मिळालेल्या जागेला लायक व्हावे अशी त्यांची इच्छा नसते, धडपड नसते. ते कष्ट करण्यास तयार नसतात. If they are not fit, make them fit असे खात्याचे परिपत्रकच आहे. हा प्रश्न गार्ड, मोटरमेन, सहाय्यक स्टेशनमास्तर यांच्या संदर्भात म्हणजे कामावर परिणाम होणे असा उत्पन्न होत नाही; पण कारशेडमध्ये होतो. कालपर्यंत आपल्या हाताखाली फिटर म्हणून काम करणारा राखीव जागेच्या सवलतीमुळे जर सुपरवायझर वा चार्जमन झाला तर तो बढती न मिळाल्यामुळे नाराज होतो. हा बढती मिळालेला आपल्या कामात वाकबार असतोच असे नाही. मग त्याला सहकार्य मिळत नाही. त्याचा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष परिणाम कामावर होतो. आपल्या हक्काचे, लायकीचे नाकारले जात आहे असे अनुभवल्यानंतर तत्त्व, विचार राहतात बाजूला आणि व्यवहार, स्वार्थ बलवत्तर ठरतो. हा मनुष्यस्वभाव आहे. त्याला तुम्ही-आम्ही काय करणार?' या मंडळींनीसुद्धा प्रशिक्षणावर भर दिला. भुसावळच्या प्रशिक्षण केंद्रांची, तिथल्या शिक्षकाची स्तुती केली. तेथे मिळणाऱ्या शिक्षणाची आवश्यकता सांगितली; एकाने सांगितले, 'आज ज्या नियमावर ही लोकल वाहतूक चालू आहे ते नियम आहेत इ. स. १९४२ चे. आज ते आमूलाग्र बदलण्याची वेळ आली आहे. आमचे काम दिसणारे आहे. त्यात दिखाऊपणा, बनावटपणा आणता येत नाही. यासाठी बदलत्या काळाबरोबर, गतीबरोबर, सुसंगत असे नियम हवेत, चांगल्या कामासाठी चांगले वेतन हवे!'

या तीन घटकाचा, आधारस्तंभांचा विचार केल्यानंतर कुर्ला येथील कारशेडमध्ये डोकावणे आवश्यकच आहे. तेथे काय चालते, कसे चालते हे समजावून घेतल्याशिवाय या प्रश्नाची योग्य त्या प्रकारे दखल घेतली, हा प्रश्न योग्य त्या तऱ्हेने समजावून घेतला असे होणार नाही. म्हणून कारशेडमध्ये काम करणाऱ्याच्या गाठी/भेटी घेतल्या. 'तुम्ही काय करता? तुमच्या येथे नेमके काय चालते?' हे विचारल्यानंतर उत्तर मिळाले, 'आम्ही लोकलच्या आरोग्याची देखभाल करतो. बिघाड झाला असेल तर तो नाहीसा करतो. बिघाड होऊ नये म्हणून प्रयत्न करतो.' 'म्हणजे नेमके काय करता? असे विचारल्यानंतर त्यांनी कारशेडमधील कामाचे स्वरूप समजावून सांगितले. ते म्हणाले, 'रुळावरून धावणारा प्रत्येक डबा एकवीस दिवसांनी तपासणीसाठी आमच्याकडे आलाच पाहिजे. असे डबे आल्यानंतर आम्ही या डब्यातील विजेवर चालणारी सारी यंत्रे तपासतो, ब्रेक्स पाहतो, त्याचप्रमाणे इतर भाग खराब झाले आहेत काय हेही पाहतो. चाकापासून ते टपावरच्या पेंटोग्राफपर्यंत साऱ्या भागांची पाहणी, देखभाल येथे केली जाते. त्यासाठी मेकॅनिकल आणि इलेक्ट्रिकल अशा दोन प्रकारच्या (फिटरपासून ते चार्जमनपर्यंत) टीम्स

लागतात. गाडीचे डबे तपासण्यासाठी माणसे असली तरी गाडी पूर्णतया दुरुस्त करण्यासाटी आवश्यक असणारी सामग्री मिळत नाही. अनेक महत्त्वाचे सुटे भाग मिळतच नाहीत ! पाच–सहा वर्षे अगोदर मागणी नोंदवूनही ही आवश्यक सामग्री उपलब्ध होत नाही. त्यात भर पडते ती कामगार संघटनांच्या भाडणांची ! वाजवी अवाजवी मागण्याची ! त्या संघटनेच्या कार्यकर्त्यांचा एकच धोशा असतो–' तुम्ही जास्त काम करवून घेता आणि पगार कमी देता !' अशा अनेक अडचणीमुळे कारशेड अपेक्षित ते काम करू शकत नाही.'

' कारशेडमध्ये चोऱ्या फार होतात असे अनेकांचे म्हणणे आहे. रेल्वेची वर्कशॉप्स, कारशेडस्, मोठमोठे यार्डस् यामधून कोटयवधी रुपयांचा माल चोरला जातो. असे म्हणतात की, या चोऱ्या जरी थाबविल्या तरी रेल्वेला अमाप फायदा होईल. हे खरे आहे काय,' असे विचारल्यानंतर कोणी खरेखुरे सांगेल असे वाटले नव्हते; पण एकजण पुढे आला. तो सांगू लागला, ' रेल्वेमध्ये रेल्वेसाठी पहारेकरी, पोलीस खाते आहे. पूर्वी त्याला ' Watch & Ward ' म्हणत असत. आज त्याचे नाव ' Railway Protection Force ' हे आहे. खरे सांगायचे म्हणजे याच्यापासूनच रेल्वेचे संरक्षण (Protection) झाले पाहिजे. कारण त्यांच्या संगनमताने आतील माणसाचे सहकार्य घेऊन या चोऱ्या होतात. चांगला माल भंगार म्हणून विकला जातो. तांब्याचे आणि पितळेचे सुटे भाग बाहेर काढले जातात. Voltage Regulotors ला बाहेर चांगला भाव मिळतो हे सारे काम सर्वांच्या सहकार्याने, रात्रीच्या वेळी बिनबोभाटपणे होते. हवी असलेली सामग्री मिळत नाही आणि असणारा माल चोरीला जातो, अशा परिस्थितीत गाड्या कशा दुरुस्त होणार ?'

कारशेडमध्ये वातावरण चांगले नसते. दहशतीचे वातावरण असते, मारामाऱ्या होतात असे म्हटले जाते, ते कितपत खरे आहे ? त्याचा तुमच्या कामावर कितपत परिणाम होतो ? या प्रश्नाचे उत्तर फारसे सविस्तर कोणी दिले नाही. मारामाऱ्या होतात, दादागिरी चालते. ही दादागिरी अनेक प्रकारची, अनेक कारणांसाठी चालते. युनियनच्या लोकांची कामचुकारांची, असंतुष्टांची अशी विविध आहे; पण त्याचा फारसा परिणाम गाड्यांच्या देखभालीवर होत नाही, त्यामुळे प्रशासन त्याची दखल घेत नसणार. अशी मोघमातच चर्चा झाली. दलित समाजातील कर्मचाऱ्यांना मिळणाऱ्या सवलती, मिळणाऱ्या बढत्या याबद्दलही बोलणे झाले; पण हा विषय काही साऱ्यांशी संबंधित नाही म्हणून कोणी फारसे बोलले नाही. काहीजणांना बढत्या मिळतात, ज्याला मिळत नाही तो कुरकुरतो, रागावतो, असंतुष्ट बनतो. पंख्याबद्दल, :(थंडीत चालू–उन्हाळयात बंद) मी विचारले तेव्हा एकजण म्हणाला, ' आयात केलेल्या डब्यांतून हा प्रकार घडत नाही. कारण त्यांची दुरुस्ती करताना अडचण येत नाही. आपल्याकडे बनलेल्या डब्यातूनच हे होते. त्यासाठी डब्यांचे डिझाइन करताना कारशेडच्या माणसांना, तज्ज्ञांना विश्वासात घ्या. त्यांना दुरुस्ती करताना कोणत्या अडचणी येतात हे समजून घ्या.'

कारशेडमध्ये कोणकोणत्या अडचणी आहेत, त्यात कसा बदल केला म्हणजे ही यंत्रणा कार्यक्षम होईल या संदर्भात अनेकांनी अनेक महत्त्वाच्या सूचना केल्या; पण त्या सूचनांचा इथे फारसा विचार करता येणार नाही. एक गोष्ट जाणवली की, प्रशासनाने या संबंधित विभागातील जाणकार माणसांना, मग ते गार्डस् असोत वा कारशेडमधील असोत, त्यांना विश्वासात घेऊन त्यांच्याकडून काय आणि कसे हवे, काय नको, काय टाळावे हे जाणून घ्यावे. अलीशान केबिनमध्ये बसणाऱ्यापेक्षा जे प्रत्यक्ष काम करतात त्यांना अडीअडचणी कळतात यावर विश्वास ठेवायला हरकत नाही. रेल्वे खाते हे मोठया सुस्त अजगरासारखे आहे. त्याला आधुनिक बनविणारा किमयागार हवा आहे. ज्या माणसाच्या हाती हजारो प्रवाशांचा जीव असतो अशा गार्डस्, मोटरमनची शारीरिक, मानसिक, आर्थिक आणि कौटुंबिक परिस्थिती कशी आहे याचा अभ्यास करणे आवश्यक आहे. त्यांची मानसशास्त्रज्ञाकडून तपासणी होणे अवश्यक आहे. केवळ नाक, कान, डोळे अशी शारीरिक तपासणी करून आज तरी चालणार नाही. आपण जुनाट परंपरा मोडून नव्या वाटा कधी चोखाळणार हा खरा प्रश्न आहे. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी 'अद्यावत बना' असे सांगितले. रेल्वे ही राष्ट्राची जीवनवाहिनी आहे तिला अत्याधुनिक बनविणे नितांत आवश्यक आहे.

आणि शेवटी जाता जाता माझ्या वैयक्तिक कुतूहलाचा भाग म्हणून मी विचारले, ' डोंबिवली लोकल होणार का ? धावणे शक्य आहे का ?' एक गार्ड म्हणाला, 'त्यात अशक्य काहीच नाही त्याच्या आड कोणतीही तांत्रिक अडचण येत नाही. रेल्वे प्रशासनालाच ही गाडी सुरु करायची नाही. त्यांनी मनात आणले तर दुसऱ्या दिवसापासून डोंबिवली लोकल सुरू होईल !' 'अशी गाडी सुरु करणे सहज शक्य आहे' असाच निर्वाळा अनेकांनी दिला. फार पूर्वी शनिवारी दुपारी मुंबई–पुणे लोकल सुटत असे. आता असे ऐकतो की पुन्हा एकदा मुंबई–पुणे लोकल वाहतूक सुरू होणार आहे पुण्याला जाणाऱ्या, पुण्यावर प्रेम करणाऱ्या असंख्य मुंबईकरांना ही बातमी आनंदाची वाटेल; पण त्यामुळे रोजच्या वाहतुकीवर परिणाम तर होणार नाही ना ? असा प्रश्न मनात ठेवून हा प्रपंच पुरा करतो.

समाप्त

## पुस्तके

# गंगाधर गाडगीळ, जी. ए. व टीकापद्धतीच्या मर्यादा

अजय आरोसकर

गंगाधर गाडगीळ यांचे लिखाण ताजे, सूक्ष्म-तरल, प्रसन्न असेच असते. मुख्य गोष्ट म्हणजे ते सभ्य आणि नीटनेटके असते. 'खांडेकर हे अत्यंत लोकप्रिय सामान्य लेखक आहेत,' असे ते जेव्हा म्हणतात तेव्हा खांडेकराचा त्यांना अनादर करायचा नसतो आणि ही गोष्ट आपल्याला चटकन समजते. मला असं म्हणायचं नव्हतं, माझ्या लिखाणातून हा अर्थ मला अभिप्रेत नव्हता, मी असं म्हणूच शकणार नाही अशा प्रकारच्या विधानांची त्यांच्या लिखाणात शक्यता नसते. ते स्वच्छ, स्पष्ट असते.

गाडगीळाचे भाग्य असे की, त्यांना सुरुवातीच्या प्रतिकूल काळातच जो समर्थक भेटला तो साहित्य हे जीवनातील एक श्रेष्ठ मूल्य मानणारा. मर्ढेकरांचा लेख 'सत्यकथे'त जून ४७ मध्ये प्रसिद्ध झाला; पण सुरुवातीच्या काळात गाडगीळांना सर्व मान्यवर टीकाकारांकडून प्रतिकूल टीकाच सहन करावी लागली. १९५० च्या मागेपुढे आम्ही या टीकाकाराचे एक अलिखित मत म्हणून या नवकथाकारांच्या लिखाणात जे चांगले आहे ते जुनेच आहे आणि नवे म्हणून जें काही आहे ते घाणेरडे आहे, असेच ऐकत होतो. 'टिंबे' किंवा 'अदृश्य किरण' प्रयोग म्हणून देखील त्यांना मान्य नव्हते. त्यातील श्री. के. क्षी. आणि बेडेकर यांनी आपले म्हणणे अखेरपर्यंत सोडले नाही वा त्यात थोडा-फारही बदल केला नाही आणि त्यांच्यावर पहिला प्रदीर्घ गुणग्राही लेख माधव अचवल यांनी फेब्रु.-मार्च १९५८ साली लिहिला. तोपर्यंत गाडगीळांनी लेखनातील सर्व प्रयोग तुफान वेगाने केलेले होते व त्यानंतर नवीन असे फारसे काही केले नाही. पहिल्या दहा वर्षांतील त्यांचे लेखन म्हणजे एक तुफानच होते. किती विषय, किती प्रकार त्यांनी हाताळले हे पाहिले म्हणजे त्यापाठीमागील बुद्धिमत्तेचा जोष चकित करतो. ते आमच्या पिढीचे लेखक. मासिकातून त्यांची कथा, प्रवासवर्णने जशी येत तशी ती वाचून आम्ही त्यावर चर्चा करीत होतो. चर्चा म्हणजे ते लिखाण एकमेकांना वाचून दाखवणे एवढेच असे. कारण त्यांचा 'बासू' आमचा नव्हता. त्यांची किडलेली माणसं आमची नव्हती किंबहुना त्यांची बिनचेहऱ्याची संध्याकाळही आमची नव्हती. त्यांच्या प्रत्येक लिखाणाने आमच्याजवळचे थोडेफार 'गोड' नष्टच केले आहे. आमची स्वस्थता गमावूनही आम्ही त्यांचे लिखाण वाचत होतो. बेडेकरांना दिसलेला 'मानव-जंतूसाठी वेदात' आम्हाला त्यांच्या कथेत दिसतच नव्हता. त्यांच्या कथेच्या वाचनानंतर साध्या गोष्टीही साध्या वाटेनात आणि एकूण जीवनाकडे बघण्याचीच दृष्टी अधिक तीव्र, स्वच्छ आणि काटेकोर होऊ लागली. वरवरची सुख-दुःखे, वरवरचा चकचकीतपणा याने आम्ही प्रभावित होईनासे झालो. कथेकडून, जीवनाकडून अधिक अपेक्षा करू लागलो. आमची कुतूहल बुद्धीच रुंदावली. आम्हाला एक धारदार तरीही तरल अशी स्वच्छ, नवी कोरी भाषा मिळाली. मर्ढेकरांच्या कवितेने नेमकी अशीच काव्याची नवी भाषा दिली होती.

मग श्री. के. क्षीरसागर वा दि. के. बेडेकर चुकत होते का? त्या वेळी तरी ते चुकत होते असे मला स्पष्ट वाटत होते. आज मात्र तसे वाटत नाही. अधिक वाचनानंतर आणि जीवनातील *अनुभवानंतर आज जाणवते ते हे की, श्री. के. क्षींच्या जीवनपद्धतीत* आणि वाङ्मयीन मूल्यव्यवस्थेत गाडगीळ बसूच शकत नाहीत. त्यामुळे श्री. के. क्षींची मूल्यव्यवस्था कमी दर्जाची व गाडगीळांची श्रेष्ठ, हे सिद्ध होत नसून त्या दोन आमूलाग्र वेगळ्या व्यवस्था आहेत एवढेच स्पष्ट होते. दि. के. बेडेकरांना गाडगीळांची कथा रुचली असती तर त्यांना जीवनमूल्याची वेगळीच व्यवस्था करावी लागली असती. एक दुसऱ्यास चूक म्हणत असले तरी दोघांचे जग एक मुळातच नव्हतं.

असे का होते? पाब्लो पिकासो हा या युगातील एक सर्वश्रेष्ठ कलावंत समजला जातो. केनेथ क्लार्क हे इंग्लिश कलासमीक्षक तसे सामान्य नाहीत. त्यांची कलासमीक्षा उच्च दर्जाची आहे; पण ते जेव्हा पिकासोविषयी लिहितात तेव्हा त्यांना पिकासो हे मोठे कलावंत म्हणून मान्यच होत नाही. मानवी अवयवांची जी विटंबना पिकासोनी केली आहे ती त्याना कला म्हणून मान्य नाही. त्याची आवश्यकता वाटत नाही व ती विटंबना करून पिकासोने काही श्रेष्ठ कला साध्य केली आहे असे त्यांना वाटत नाही व ठामपणे ते त्याची कला नाकारतात. याचे कारण केनेथ क्लॉर्क यांची एकूण जीवन-कला-मूल्य-व्यवस्थाच फार वेगळी आहे. हेन्री मूरसारखा अत्याधुनिक शिल्पकार त्यांना खूप श्रेष्ठ वाटतो; पण पिकासो वाटत नाही. म्हणजे क्लार्क हे जुन्या परंपराच फक्त श्रेष्ठ, असे मानणारे कर्मठ सनातनी रसिक नाहीत; पण जेव्हा त्यांना पिकासो आवडणे शक्य होत नाही तेव्हा श्रेष्ठ कलाकृती ठरविण्याची मूल्यमापने एकच एक नसतात एवढेच सिद्ध होते. कसलीही अपेक्षा न करता, 'मोकळ्या', 'स्वच्छ', मनाने ना. सी. फडके 'मला उमजलेले बालगंधर्व' ही कुमार गंधर्वांची मैफल ऐकायला जातात तेव्हा त्यांचे निखळ कलासक्त मन तितके स्वच्छ नसते, कोणाचे असू शकते की नाही हे ठामपणे सांगता येणार नाही. आणि मग ते गाणे त्याना आवडले नाही तर ते अप्रामाणिक वा, जुनाट बुरसटलेले, मागासलेले रसिक ठरत नाहीत, त्याची रसिकता एका विशिष्ट शिस्तीनेच घडलेली असते आणि लवचिक असली तरी त्या रसिकतेच्या लवचिकतेलाही काही मर्यादा अटळ असतात. एकाच वेळी, सिनेमातले हल्लेगुल्ले गाणे व भीमसेनचा ख्याल यांना मान डोलावणाऱ्या रसिकतेला कसलीच शिस्त नाही आणि ती परिपक्व रसिकता म्हणता येणार नाही.

तेव्हा कोणत्याही कलाकृतीचे श्रेष्ठत्व हे एकमेव, बिनचूक तोलणारा वजनकाटा असत नसतो.

हे लक्षात घेतले नाही की डोस्टोव्हस्की का टॉलस्टॉय ? असा प्रश्न मान्यवर टीकाकारही विचारतात आणि टॉलस्टॉय हा श्रेष्ठ ठरवितात. ते नुसते चूक नसते. लेखनकलेकडे बघण्याची ती दृष्टीच सदोष असते.

बरोबर हीच चूक थोडया-फार प्रमाणात गाडगीळ जी. एं. वरील त्यांच्या टीकालेखात करीत आहेत. 'थोडया-फार प्रमाणात' असे म्हटले कारण, जी. ए. एक प्रतिभावंत आहेत व त्यांच्या कथा गाडगीळ आवडीने वाचतात असे त्यांनीच मान्य केले आहे. मग जी चूक श्री. के. क्षी. नी वा. दि. के. बेडेकरांनी गाडगीळांच्या बाबतीत केली तशी ते करीत नाहीत हे सरळ आहे. ना. सी. फडके यांनी कुमार गंधर्वांच्या मैफलीबद्दल जी टीका केली त्या प्रकारची ही गाडगीळांची टीका समजता येईल का ? जी. एं. चे नियतीचे जबरदस्त तत्त्वज्ञान त्यांच्या विषयातील एकसुरीपणा, प्रतिमांचा बेसुमार वापर एवढ्याचमुळे गाडगीळांना ते एक 'भोवऱ्यात अडकलेला प्रतिभावंत' वाटतात ?

## गरगरणारा भोवरा !

जी. ए. हे वास्तविक गाडगीळांचे समवयस्क. त्यांची 'गुतवळ' सारखी कथा १९५५ मध्ये प्रकाशित झाली. त्यापूर्वी दीड-दोन वर्षे 'छंद'मधूनही काही कथा प्रसिद्ध झाल्या होत्या. त्यांचा लेखनाचा वेगही मर्यादितच. एकही टीकालेख प्रसिद्ध न करणारा हा लेखक त्याच्या वाचकांसमोर कधीच उभा राहिला नाही. त्यांच्यावर आतापर्यंत ज्यांनी लिहिले त्या सर्वांनी गुणगानच केले. अगदी नरहर कुरुंदकरांनीदेखील त्यांची धारदार विधानप्रियता थोडा वेळ राखून ठेवली. माधव अचवलांनी १९६१ मध्ये एक दीर्घ लेख लिहिला आणि १९७४ मध्ये 'जास्वंद' या ग्रंथात समाविष्ट करताना फक्त त्या लेखातच मोठी भर घातली. 'समाजप्रबोधनपत्रिके'च्या डिसेंबर ७१ च्या अंकात म. द. हातकणंगलेकर यानी 'जी. ए. कुलकर्णी यांची कथासाधना' असा एक दीर्घ लेख लिहिला. द. भि. कुलकर्णी यांनी प्रथम त्यांची भलावण करणारेच लेख लिहिले. अस्तित्ववादी तत्त्वज्ञानाच्या दृष्टिकोनातून त्यांनी ते लिहिले. अलीकडे त्यांना जी. एं. मध्ये खांडेकरांची भ्रष्ट नक्कलच दिसू लागली आहे. जी. एं. वरती गंगाधर गाडगीळाना सहन करावी लागली तशी प्रच्छन्न प्रतिकूल टीका गाडगीळांच्याच या लेखापर्यंत–म्हणजे लेखन संपेपर्यंत ( कारण ७५ नंतर जी. एं. नी फार लिहिलेलेच नाही. ) झालीच नाही. ते त्यांच्या सामर्थ्यानेच भारून गेले होते.

गाडगीळानी जी. एं. वरती एक दीर्घ लेख लिहिण्यात एक औचित्य आहे. स्वत: गाडगीळानी वेगाने आणि विविध विषयांवर कथा लिहिली. 'बिनचेहेऱ्याची संध्याकाळ', 'पावसाळी हवा' यासारखे तर एकदम नवीन प्रकारचेच लिखाण त्यांनी केले. त्यांची प्रवासवर्णने, 'खरे सांगायचे म्हणजे' सारखे लिखाण, 'लहान मुलांचे विश्व' या सर्वांतून त्यांचे होणारे दर्शन विविधतेने समृद्ध झालेले होते. आणि त्यामुळे त्यांनी जी. एं. च्या दाखविलेल्या मर्यादा निर्विवाद, अंतिम वाटाव्या इतक्या प्रभावी वाटतात. त्यात गाडगीळांची टीकापद्धती गणितासारखी. बिनचूक, स्पष्ट. त्यामुळे त्यांना जे सिद्ध करायचे आहे ते त्यांनी नीटनेटके गणित मांडून सिद्ध केले आहे.

एकीकडे जी. ए. हे एक प्रतिभावंत कलावंत आहेत हे त्यांना सतत जाणवत असते. दुसरीकडे ती प्रतिभा स्वच्छ नाही हेही तितक्याच तीव्रतेने जाणवते.

'आणि सर्वच कथात मध्यवर्ती स्थान असलेली नियती तर निष्ठुरपणे घटनांची एकामागून एक अशी उतरंड उभी करते की, तिच्याखाली सापडून, चिरडून जी. एं. च्या कथांतील पात्रे विव्हळून अगर न विव्हळता नाश पावतात–त्यांची जीवने उद्ध्वस्त होतात.'

असा हा अनुभवांचा एकच एक झपाटलेला मूलाकार जीएंच्या कथांत निरनिराळ्या स्वरूपात आढळतो. हा मूलाकार पुन:पुन्हा पाहिल्यावर जाणवते की, त्यांच्या अनुभव घेण्याच्या पद्धतीच्या केंद्रस्थानी एक मनोविकृती आहे. अनुभवांच्या प्रवाहाच्या मध्यभागी एका प्रचंड भोवऱ्यासारखी गरगरते आहे. कुठलाही अनुभवाचा पुंज त्या भोवऱ्यात खेचला जातो आणि गरगरू लागतो. ह्या गरगरल्यामुळे त्या अनुभवांना, त्या घटनांना आणि पात्रांना काही विशिष्ट आकार प्राप्त होतात. त्यांची परस्पराशी काही विशिष्ट नाती जुळतात. झपाटल्याप्रमाणे तो अनुभवपुंज गरगरत राहातो, त्या भीषण भोवऱ्याच्या केंद्रस्थानाकडे खेचला जातो आणि खोल खाली दडपला जातो. तरी तो भोवरा असुरी अपरिहार्यतेने गरगरत राहतो आणि नवे अनुभवपुंज आले की त्यांना आपल्या कवेत खेचून घेतो.

असामान्य कलावंत आणि मनोविकृती हा एक स्वतंत्र विषय आहे. अनेक टीकाकारांनी त्यावर ग्रंथही लिहिले आहेत. निरोगी मनाचा, समाधानी माणूस श्रेष्ठ कलावंत होईल का, आहेत का ? हा एक कूट प्रश्न आहे. डोस्टोव्हस्की, स्ट्रिंडबर्ग, काफ्का ही उवडउघड पछाडलेली, झपाटलेली माणसे होती; पण टॉलस्टायसारख्या संतामध्ये विकृती नव्हती असे त्याच्या कलाकृतीवरून ठामपणे म्हणता येणार नाही. मायकेल एंजेलो, लिओनार्डो दा विंचीसारखे साक्षात्कारी कलावंत निरोगी होते असे निश्चितपणे म्हणता येणार नाही; म्हणजे व्यक्तिगत आयुष्यापुरते नव्हे, तर त्यांच्या कलाकृतीमध्ये ही विकृती उतरलेली आहे की नाही या अर्थाने असे निश्चित सांगता येणार नाही; पण कोणत्याही कलाकृतीचे असे मानसशास्त्रीय विवेचन करून निर्विवादपणे ती निकृष्ट दर्जाची कलाकृती आहे, असे सहजासहजी म्हणता येणार नाही. डोस्टोव्हस्कीसारख्या कलावंताच्या बाबतीत तर अशी मनोविकृती गृहीत धरून त्याच्या कथा-कादंबऱ्या वाचता येतात. तरीही त्या वाचाव्याशा वाटतात, आपल्याला खेचून ठेवतात. अशा कोणत्या तरी विकृतीचा अनुभव घेतल्याशिवाय स्वत: गाडगीळाना 'अदृश्य किरण' वा 'टिंबे' अशा विलक्षण कथा लिहिता आल्या असत्या का ?

गाडगीळांना जी. एं. च्या कथात जाणवणारा हा गरगरणारा भोवरा त्यांची सुट्टी एक-एक कथा वाचताना जाणवत नाही. त्यांनी सविस्तर विवेचनाला निवडलेली 'राणी' ही कथा लहानशी म्हणून नव्हे, तर त्यांना जे सिद्ध करायचे आहे त्याला सोयीची आहे म्हणून निवडली. 'कैरी'सारखी कथा घेतली असती तर ते काम जड गेले असते. कारण जेथे जेथे मूळ कथांतील तुकडे त्यांनी गोळा केलेत, मीठ मांडलेत, तेथे तेथे त्या तुकड्यांशी ते प्रामाणिक राहिले आहेत. विवेचनासाठी ते विकृत केलेले नाहीत; पण त्या एकेक तुकड्यासाठी जी. एं. नी काळजीपूर्वक घट्ट विणीची दीर्घ रचना केलेली आहे. असे

तुकडे जर एकत्र केले तर काय होते पहा :

'शाळेत मास्तरकी करताना सावणेच्या हलकटपणाची शिकार झालेली शोभा, दरिद्री बापाने निवडलेल्या सासरी छळाला कंटाळून विहिरीत जीव देणारी अश्राप पोर सुम्मी, बापाच्या छळाने पिचलेली काशी, नवऱ्याच्या समक्ष एका दारुड्या डॉक्टरबरोबर बेधडक शृंगार करणाऱ्या सौंदर्यसंपन्न माई, पाणी भरण्याचे वेड लागलेली साधी सुशील रमा...'

अशा गोष्टी एकत्रित मांडल्या की, त्यात बघता बघता तो भयंकर गरगरणारा भोवरा दिसू लागतो. हा भोवरा गाडगीळांनी निर्माण केलेला आहे. 'गुतवळ'मध्ये, 'चंद्रावळ'मध्ये, 'तुती'मध्ये, 'कैरी'मध्ये त्याचा आवाज ऐकू येत नाही. कारण त्या कथामध्ये एक एक जीवन त्या जीवनाच्या गतीनेच घडत गेले आहे. गरगरणाऱ्या भोवऱ्याचा वेगच त्या जीवनाला नाही आणि त्यांच्यावर जी नियतीची छाया पडलेली आहे ती जी. एं. नी कलात्मक परिणाम साधण्यासाठी योजलेली एक युक्ती नाही. बाहेरून लादलेली एका गच्च तत्त्वज्ञानाची चौकट नाही, सावज पकडण्यासाठी मांडून ठेवलेला सापळा नाही. ती कोंडीत पकडल्या गेलेल्या माणसाची सरळ साधी शरणागती आहे. छळछावण्यातील ज्यूंना दुसरा पर्याय नव्हता तेंव्हा त्यांनी जे केले असेल तेच ही माणस करीत आहेत. सोलझेनित्सिनची 'मेट्रोव्हनाचे घर' ही एक श्रेष्ठ कथा आहे. त्यातील मेट्रोव्हना वाटयाला आलेले जीवन बिनतक्रार स्वीकारते म्हणून ती असहाय्य, दुबळी ठरत नाही. 'कैरी' या कथेतील तानीमावशी अशीच निव्वळ लोभसवाणी आहे — क्रूर परिस्थितीत नष्ट झालेली तरीही नष्ट न झालेली—म्हणजे असे की, तिचा नाश तिला विकृत करत नाही.

जसा हा गरगरणारा भोवरा जी. एं. च्या कथेत प्रत्यक्ष भेटत नाही तसेच त्यांच्या प्रतिमा कचकचत नाहीत. वास्तविक त्यांच्या प्रतिमांचे वेगळेपण गाडगीळांनाही जाणवले आहे व काही त्यांना आवडलेली उदाहरणे त्यांनी दिलेली आहेत. त्यांचा बेसुमार वापर त्यांना अस्वस्थ करतो, त्यांचेही स्वरूप असेच आहे. 'कैरी' या कथेत अशा उपमा दिसत नाहीत. त्यात जो मोर येतो त्या प्रतिमेचा केलेला उपयोग गाडगीळ विवेचनात घेत नाहीत आणि काही वेळा या प्रतिमांचा उपयोग फारसा होत नसेल तरी पण त्या पूर्णपणे अनावश्यक वाटत नाहीत. 'गडद लाल रंगाची निग्रेटा गुलाबाची कळी उमलत होती...त्या फुलाच्या रंगात रानटी श्वापदाच्या डोळधाप्रमाणे काही तरी आकर्षक होते.' ही 'पारधी' कथेतील उपमा कोणासाठी आहे ? वातावरणनिर्मितीसाठी ? दादासाहेबांचे व्यक्तिमत्व स्पष्ट करणारी, का सौंदर्यसंपन्न माईत सुप्त असलेले श्वापद सूचित करणारी ? तसे कोणतेच काम ही उपमा करीत नाही. तरी पण ती केवळ शोभेसाठी त्या गोष्टीत येत नाही. गोष्ट वाचून संपली तरी ती उपमा मनात रेंगाळते. तिचे अस्तित्व पूर्णपणे उलगडत नसूनही मनात राहते. 'का कोणास ठाऊक ?' या चालीवर मला हे विधान करायचे नाही.

जी. एं. च्या कथाचा मी समर्थक नाही किंवा गाडगीळांचे आक्षेप खोडून काढण्यासाठी मी हे सर्व लिहीत नाही. जितक्या वेळा मी गाडगीळांच्या कथा व इतर लेखन पुन्हापुन्हा वाचले आहे त्यामानाने मी जी. एं. च्या सर्व कथा एकदाही पूर्णपणे वाचलेल्या नाहीत. बऱ्याच वाचल्यात. 'कैरी', 'तुती', 'राधा' सारख्या खूप वेळा वाचल्यात; पण गाडगीळांचा हा लेख प्रथम 'अनुष्टुभ्'च्या ७८ च्या दिवाळीत वाचला, तेव्हा माझ्या मनात जी. एं. च्या कथांची जी समज होती ती यत्किंचितही दुरुस्त करावीशी वाटली नाही. गाडगीळाचे लिखाण नेहमी देते तसा आनंद मला मिळाला. ती गरगरणाऱ्या भोवऱ्याची कल्पना, 'पचकन थुकल्यासारखे जी. ए. मुंबईचे वर्णन करतात' अशी काही वाक्ये मला मनापासून आवडली. प्रश्न निर्माण होतो तो या टीकापद्धतीने काय सिद्ध होते ? लेखकाच्या मर्यादा ? त्याच्या लिखाणातील उणीवा ?

जी. एं. च्या कथाविश्वाबाहेर खूप जीवन पसरले आहे. खूप विविधता असूनही गाडगीळाच्या कथेत न आलेले विश्वही खूप आहे आणि खोलीविषयी गाडगीळानी 'अनुष्टुभ'मध्ये दिलेले उत्तरही बरोबर नाही. कारण खोल बुडी मारून प्रत्येक वेळी जी. ए. तेच ते एक सत्य सांगतात हे म्हणणे म्हणजे त्यांनी फक्त एकच कथा जरा आलटून पालटून लिहिली, असे म्हणण्यासारखे होईल आणि गाडगीळानी 'पिंगळावेळ' कथासंग्रहाला स्ट्रिंडबर्गचे एक वाक्य जोडले आहे त्याचा फार बटबटीतपणे अर्थ स्वीकारला आहे. त्याच अर्थाने ऑडेन या कवीने असे म्हटले होते, 'अशी कविता लिहिता यावी की, पुन्हा कविता लिहायला काही प्रयोजनच राहू नये; म्हणून इतकी वर्षे मी कविता करीत आलो आहे आणि हे स्वप्न प्रत्येक कवी मनाशी अखेरपर्यंत बाळगून असतो.'

## मूल्यव्यवस्था हवीच

सुख—दु:खाच्या वेदनेतून कलेचा उगम अनेक वेळा झालेला आहे. श्रेष्ठ दर्जाची 'ट्रॅजिडी' लिहिण्याचे स्वप्न प्रत्येक श्रेष्ठ कलाकार पाहात असतो. त्या वेदनेला काटेकोरपणे शब्दात पकडता यावे म्हणून जी. एं. नी कथेचा पसारा मांडला. अशा अर्थानेदेखील ते स्ट्रिंडबर्गचे वाक्य घेता येईल. त्याच्या कथेत येणारा नियतीचा खेळ सोफोक्लिसच्या ग्रीक ट्रॅजिडीत दिसणाऱ्या खेळाइतका (थोडा-फार कमी), कथावस्तूच्या अंगभूत स्वरूपात आहे असे मला वाटते. हार्डीच्या चांगल्यादेखील कादंबऱ्यांत येतो इतका घुसडलेला वाटत नाही. मला स्वतःला हे नियतीचं तत्त्वज्ञान मुळीच रुचत नाही. तरी पण मला जी. एं. च्या कथेचा स्वाद घेताना त्याची अडचण झाली नाही. ख्रिस्ती नसून वा ख्रिस्ताच्या कथांमध्ये बरेच भाकड आहे असे वाटत असतानादेखील त्याच्या जीवनातील जन्मापासून अखेरच्या क्षणापर्यंतच्या घटनावर (?) अनेक चित्रकारांनी काढलेली चित्रे मला मंत्रमुग्ध करतात. त्या वेळेपुरता मी ख्रिस्तीच होतो. जी. एं. च्या कथेतील वेदनेने, ती ज्या कलात्मक उत्कटतेने व्यक्त केलेली असते ती उत्कटता, मला अस्वस्थ करते. जीवनाचे एकच एक दर्शन मला त्यांच्या कथेत दिसलेले नाही. 'गुतवळ'मध्ये वेगळे, 'श्वापद'मध्ये वेगळे, 'कैरी'मध्ये वेगळे आणि गाडगीळांच्या 'पावसाळी हवे'प्रमाणे 'अनंत' वा 'प्रवासी' या आगळ्या लिखाणातून वेगळेच!

जी. एं. च्या अनुभवपद्धतीतून, त्याच्या नियतीच्या तत्त्वज्ञानातून ते जे एका गरगरणाऱ्या भोवऱ्यात अडकले आहेत याचे दु:ख गाडगीळांना आहे, ते तत्त्वज्ञानच कदाचित त्यांच्या कलेतील उत्कटतेचे मूळ असेल आणि जे सामर्थ्य गाडगीळांना चि. त्र्यं खानोल-

करांच्या काव्यात दिसते (कोणत्याही एका जीवनविषयक तत्त्वज्ञानाचे अगर दृष्टिकोनाचे झापड ते आपल्या डोळ्यांवर बांधत नाहीत. त्यामुळे त्यांचे काव्यविश्व विलक्षण संपन्न झाले आहे.' पान ९२) त्या कारणामुळेच बा. सी. मर्ढेकरांच्या काव्यात जाणवणारी उत्कटता आरती प्रभूमध्ये जाणवत नाही. प्रत्येक कलावंताला कोणती तरी एक मूल्यव्यवस्था लावावीच लागते–अगदी जीवन अर्थशून्य आहे हे म्हणणाऱ्या कलावंतालादेखील–ती त्याच्या वैयक्तिक आयुष्यातून झगडत त्याला मिळालेली असते वा त्याने ती मिळविलेली असते. त्याशिवाय त्याच्या कलेला मूळच लाभणार नाही आणि ती त्याची स्वतःची वैशिष्ट्यपूर्ण व्यवस्था असेल. कामूची होती, सार्त्रची होती, टॉलस्टॉयची होती, डोस्टोव्हस्कीची होती, बॅल्झॅकची होती आणि प्रत्येकाची निरनिराळ्या कारणांनी चुकीचीच होती–त्यामुळे त्याच्या कलाकृतीत मर्यादा आल्या, दोष आले; पण तिला जी संपन्नता होती तीही त्यामुळेच लाभली होती.

डी. एच्. लॉरेन्सचे कामप्रेरणेसंबंधी जे एक 'रक्ताचे' तत्त्वज्ञान होते ते निखालस चुकीचे होते; पण त्या चुकीच्या तत्त्वज्ञानातूनही निर्माण केलेल्या कथा-कादंबऱ्या श्रेष्ठ कलाकृती होऊ शकल्या आणि जगाच्या या टोकापासून त्या टोकापर्यंत हिंडवत अनेक प्रकारच्या लोकाच्या भानगडी सांगणाऱ्या हॅरॉल्ड रॉबिन्स आणि कंपनीच्या लाखो प्रती खपणाऱ्या कादंबऱ्या श्रेष्ठ होत नाहीत. खानोलकरांचे विषयवासनेच्या विकृत दर्शनांचे आकर्षण मूळ धरू शकत नाही आणि याउलट अपूर्ण अवस्थेत असल्या तरी काफ्काच्या कथा-कादंबऱ्या अस्वस्थ करतात. कोठे तरी न विसरता येणारा स्पर्श करतात. खरे तर काफ्काचे जग जी. एं. पेक्षाही छोटे आणि त्यांच्या प्रमुख पात्रांना नावेही नाहीत. एकही महत्त्वाची कादंबरी पूर्ण नाही.

कोणतेच तत्त्वज्ञान कलाकृतीला मारत वा तारत नाही; पण ते आवश्यक असते. काही वेळा तर ते सरळ चुकीचे असते. कलाकृतीचे श्रेष्ठत्व चटकन सिद्ध करणारे एकमेव मूल्य अजून सापडायचे आहे.

याचा अर्थ श्रेष्ठ कलाकृतीचे मूल्यमापन करायला काही निश्चित वजने आणि ती तोलणारा काटा उपलब्ध नाही असा होतो. खरे म्हणजे वास्तविक असेच आहे. श्रेष्ठ कलाकृती निर्माण होते. मग तिचे वजन करण्यासाठी रसिकाची शोधाशोध होते. काही वजने मिळविली जातात पुन्हा दुसरा एक कलावंत येतो तो अशी कलाकृती निर्माण करतो की, मिळविलेली वजने जवळजवळ बाद होतात. मग पुन्हा नवा शोध सुरू होतो. गाडगीळांनी वापरलेली वजने एके काळी शेक्सपिअरच्या नाटकांचा अभ्यास करताना काही थोर टीकाकारांनी वापरली आणि काही वाटेल ते सिद्ध करायला सुरुवात केली. 'मॅक्बेथ' वगैरे नाटके लिहिताना शेक्सपिअर आजारी होता किंवा मोठ्या दुखण्यातून उठला होता येथपासून तो 'अँटनी अँड क्लिओपात्रा'मध्ये तर विविध रत्नांचा इतका व असा वापर केलेला आहे की, शेक्सपिअरने प्रथम ती सर्व रत्ने आपल्या टेबलावर पसरून ठेवली, त्यांची एक व्यवस्था लावली व त्या व्यवस्थेनुसार सर्व नाटक लिहिले असे वाटावे येथपर्यंत. अलीकडच्या एका टीकाकाराने तर पोलंडमध्ये सध्या जे राजकीय डावपेच चालले आहेत ते सगळे शेक्सपिअरच्या नाटकातून दाखविले आहेत.

या उद्योगातून करमणूक होत असली तरी कलाकृतीचे एकमेव मूल्य सापडत नाहीच. कारण तसे ते नसतेच.

या उद्योगापेक्षा एक वेगळ्या प्रकारची विवेचनपद्धती असते. ती खरी कलावस्तू अधिक समजण्यास आणि म्हणून अधिक नीटपणे मूल्य समजण्यास मदत करते, असा लेख म. द. हातकणंगलेकरांनी ७१ डिसेंबरच्या 'समाजप्रबोधनपत्रिके'त लिहिलेला आहे. स्वतः गाडगीळांनी मर्ढेकरांच्या एका कवितेवर खूप वर्षांपूर्वी 'सत्यकथे'त लेख लिहिला होता, 'साहित्याचे मानदंड'मध्ये तो संग्रहित का केला नाही कळत नाही.

एकीकडे 'पहिलेवहिले–चटपटीत, हलकेफुलके–कथालेखन जीएंनी केलेच नाही. कथालेखनाला सुरुवात केली तीच मुळी जीवनातील काही विलक्षण, मन कुरतडणारे भावले त्याला आकार द्यावासा वाटला तेव्हाच.' अशा भूमिकेतून चित्रकलेतील कल्पना, पाश्चिमात्य लेखकांच्या लेखनपद्धती इत्यादी अनेक गोष्टींचा उपयोग करून आस्वादक लेख लिहिणारे माधव आचवल, तर दुसरीकडे सगळ्या कथांच्या 'पसाऱ्यातून' त्यातील ठळक गोष्टी उचलून एकत्र मांडून त्यांची व्यवस्था 'निर्माण' करणारे गाडगीळ. दोन्ही लेख मनाची पकड घेणारे जबरदस्त; पण दोन्हीही मूळ हेतू सफल न करणारेच.

म्हणून हातकणंगलेकराची टीका सौम्य असली तरी अधिक उपयुक्त. आचवलांच्या वा गाडगीळांच्या लेखात जी तीव्रता आहे, भडक रंगाची गंमत आहे ती या लेखात नाही; पण त्या लेखामुळे जी. एं. ची कथा अधिक कळू शकेल. जी. एं. च्या कथेत अनेक जागा नीटपणे कळतच नाहीत. मर्ढेकरांच्या कवितेत तशा जागा आहेत. श्री. पु. भागवतांनी मर्ढेकरांची अशी सटीप आवृत्ती काढली तर त्यांच्या कवितेचे आकलन अधिक होईल. मागे त्यांनी जी दोन व्याख्याने दिली त्यात त्यांनी असेच काम बरेचसे केले. हातकणंगलेकर जी. एं. च्या निवडक कथांची एक आवृत्ती तयार करीत असल्याचे समजते. त्यांनी अशा टीपा लिहिल्या तर उपयुक्त होतील एरवी टीकालेख उत्तम असेल तर चांगली करमणूक होते; पण ते तितकेच. एखाद्या श्रेष्ठ कलाकृतीचे योग्य रसग्रहण करता आले की, टीकेचे मुख्य काम झाले; पण गणिते मांडून काही प्रमेये सिद्ध करण्याच्या भानगडीत टीकाकाराने पडू नये. काहीही विपरीत विधाने सिद्ध करता येतील.

दि. के. बेडेकरांना गाडगीळांच्या कथेत मानवी जंतूसाठी वेदांत दिसला. गाडगीळांना जी. एं. मध्ये एक गरगरणारा भोवरा दिसत आहे. कोठे तरी काही तरी चुकते आहे खचित. कारण रसिक वाचकाला त्या दोन्ही लेखकांच्या श्रेष्ठ कलाकृतीत फक्त एक तरल, आर्त, स्वच्छ जीवनस्पर्शच होत होता. ◻

आजकालचे साहित्यिक :
गंगाधर गाडगीळ
उत्कर्ष प्रकाशन
मूल्य २० रुपये

फिनिक्स निवड

## People's Almanac Presents The Book of Predictions

By David Wallechinsky,
Amy Wallace.
Irwing Wallace.

आमच्या ग्रंथालयासाठी मी एक थोडंसं इंटरेस्टिंग पुस्तक मागवलं आहे. भविष्याविषयी लोकांना नेहमीच उत्सुकता असते. तसा माझा वर्तमानपत्रातील रविवारी येणाऱ्या भविष्यावर अजिबात विश्वास नाही. एकदा मी दोन-तीन मिनिटांत एक रफ गणित केलं होतं. रविवारच्या इतक्या लाख आवृत्त्या. त्या सर्वांतील येणारे भविष्य जर कात्रीने कापून (मला कात्रणांचं भलतंच आकर्षण आहे!) गठ्ठेच्या गठ्ठे केले तर ते कित्येक लाखांच्या घरात जाईल! एवढं वेस्टेज! म्हणजे काय, लोकांना मटक्याचे आकडे हवेत म्हणून आम्ही ते छापतो! सध्या इतर बातम्या रवतदाब वाढविणाऱ्या असतात म्हणून आम्ही ते छापतो! हे सर्व दुबळं समर्थन आहे. मी तर असे म्हणेन की काही काही वर्तमानपत्रांनी (नशाबंदी विरुद्ध जशी मोहीम उघडली जाते तशी) हीच जागा या प्रकारच्या भविष्याविरुद्ध प्रचार करण्यासाठी वापरावी. एके काळी कधीकधी 'माणूस'सारखी मासिके सुद्धा भविष्य छापत होती. निदान असल्या प्रबोधन करणाऱ्या मासिकांनी तरी अशा प्रकारच्या भविष्याला बार्ज-पोलने शिवू नये. सर्वच भविष्य सांगणारे भोंदू असतात असे नाही; पण रविवारच्या आवृत्त्यात आणि मासिकांत येणारं भविष्य निश्चितच अर्थशून्य असतं. एखादे घड्याळ बिघडले की ते २४ तासात दोनदा अचूक वेळ दाखवणारच. तसेच एखादे वेळेला एखाद्या ज्योतिष्याचे भविष्य खरे ठरले तर त्याचा काय उदो उदो होतो!

परंतु अलीकडे अशी काही इंग्रजी पुस्तके निघायला लागली आहेत की, तांत्रिक ज्ञान गोळा करून काही भविष्ये दिली आहेत. उदाहरणार्थ इ. स. २००० च्या आसपास चंद्रावर कॉलनी होईल. १९९० साली कॅन्सरवर मात होईल. (इंटरफेरॉनमुळे) १९८४ मध्ये एखाद्या प्रवाही पदार्थाचा फवारा मारून दात किडण्याची कटकट कायमची जाईल. १९८६ मध्ये बऱ्याच व्यथा लोहचुंबकाच्या उपयोगाने बऱ्या होतील. १९८९ मध्ये फ्युझन पॉवरने विद्युत्शक्तीला पर्यायी शक्ती सापडेल. १९९४ मध्ये वादळाला गवसणी घातली जाईल व मानव वाळवंटात पाऊस पाडू शकेल. अशा प्रकारची, शास्त्राचा अभ्यास करून, भविष्ये सांगितली आहेत; पण असल्या भविष्यांना वर्तमानपत्रातील येणाऱ्या भविष्यासारखा उठाव नाही. तथापी हळूहळू त्याचे वाचक वाढत चालले आहेत हे निश्चित. असल्याच एका 'ब्रेकथ्रूज' नावाच्या पुस्तकाचा परिचय मी 'माणूस'च्या १३-१२-१९८० च्या अंकात करून दिला होता.

आता मी जे या विषयावर दुसरे इंटरेस्टिंग पुस्तक मागवले आहे त्याचे नाव 'द पीपल्स अल्मानॅक प्रेझेन्टस् द बुक ऑफ प्रेडिक्शन्स.' अल्मानॅक वगैरे आले म्हणून तुम्हाला वाटेल पंचांग वगैरे आले; पण तसे नाही. हे एक 'ब्रेकथ्रूज' सारखे शास्त्रांची माहिती गोळा करून सांगितलेले भविष्याचे पुस्तक आहे. ते लिहिले आहे आयर्विंग वॉलेस, डेव्हिड वॉलेचिन्सकी व ॲमी वॉलेस या तिघांनी. डेव्हिड हा आयर्विंगचा मुलगा. (पण सालं त्याने पुढे वॉलेचिन्सकी असं हॉरिबल नाव का लावले ते कळत नाही.) ॲमी हीसुद्धा त्याची मुलगी. या वॉलेस फॅमिलीला 'द रायटिंग वॉलेसेस' म्हणूनच ओळखले जाते. या आयर्विंग वॉलेसच्या फॅमिलीमधला जो तो लिहीत सुटतो!

४–२–१९७५ रोजी चीनमध्ये हायचिंग येथे ७·३ रिश्टरस्केलवर येवढा भूकंप झाला. पण भूकंपाच्या मानाने प्राणहानी कमी झाली. कारण तिकडे प्राण्याच्या वर्तनावरून भूकंपाबद्दल भविष्य केले होते. चीन हा जगातील एक अत्यंत भूकंपग्रस्त देश आहे. चिनी सरकारच्या भूकंपाच्या कार्यालयातून खालीलप्रमाणे पत्रिकेचे वाटप होते. भूकंप होण्याच्या काही दिवस आधी—

१) गुरेढोरे, शेळ्या, घोडे वगैरे त्यांच्या तबेल्यात जायला तयार होत नाहीत. २) उंदीर त्यांच्या बिळांमधून बाहेर पडतात. ३) कोंबड्या झाडावर उडण्याचा प्रयत्न करतात. ४) बदके पाण्यात जात नाहीत व कुत्री कारणाशिवाय भुकायला लागतात. (हे सर्वांनाच माहीत आहे ५) साप त्यांच्या बिळातून बाहेर येतात. ६) कबुतरे घाबरून त्यांच्या घरट्यांत जात नाहीत. ७) कान उभे करून ससे उड्या मारायला लागतात आणि त्यांच्यामध्ये आलेल्या वस्तूशी त्यांची अक्षरशः टक्कर होते. ८) मासेसुद्धा पाण्याच्या पृष्ठभागावर उड्या मारायला लागतात.

प्राण्यांच्या वागण्यावरून हायचिंग येथे लोकांना भूकंपाची सूचना आधी दिली गेली होती. आणखी कोणकोणत्या शहरात याच धर्तीवर सूचना दिल्या गेल्या होत्या त्यांची नावे अशी.

(१) तलाकाहुआने, चिली. तेथे १८३५ मध्ये भूकंप होण्याच्या आधी सर्वच्या सर्व कुत्री गाव सोडून गेली होती.

(२) ओगा पेन्शिुला. जपान इथे १९३९ मध्ये भूकंप झाला तेव्हा ३०–३० पौंडांचे ट्युना मासे व ऑक्टोपस एकदम किनाऱ्यावर आले व झिंगल्यासारखे करू लागले.

(३) अलास्का, यू. एस्. ए. येथे १९६४ मध्ये ८.४ रिश्टर तीव्रतेचा भूकंप झाला होता. त्या वेळेला तेथील अस्वल आपल्या हिबरनेशनच्या जागा सोडून टेकडीवर पळाले.

(४) फ्रायली, इटली. ६·५ स्केल, तीव्रता कुत्र्याचे भुंकणे, पिंजऱ्यातल्या पक्ष्यांची बाहेर येण्याची खटपट व मांजर, हरिणांचे विचित्र वर्तन.

या क्षेत्रात बरेच संशोधन सुरू असून त्याचा पद्धतशीर अभ्यास करून अनुनय केल्यास प्राणहानी बऱ्याच प्रमाणात खाली येईल असे सर्व वॉलेस म्हणतात.

या पुस्तकात निगेल काल्डर यांचा उल्लेख आहे. त्यांनी लिहिलेल्या 'द वेदर मशीन' या पुस्तकाच्या अनुषंगाने हा उल्लेख आहे. काल्डर यांच्या मते एक मोठे हिमयुग फक्त १०० वर्षे लांब आहे. या हिमयुगात १५ देशांचा नायनाट होईल! त्यात भूतान, नेपाळ, सिकीम, कॅनडा, डेन्मार्क, फिनलँड, ग्रीनलँड, आइसलँड, आयरिश रिपब्लिक, लिचटेन्स्टन, न्यूझीलँड, नॉर्वे, स्वीडन, स्वित्झलँड व

इंग्लंड हे देश बर्फाखाली गायब होतील !

दीर्घकाळ जगण्याची इच्छा सर्वांनाच असते. त्याचे एक निराळेच शास्त्र आहे, सायन्स ऑफ लॉन्जेव्हिटी. कॅलिफोर्निया, सान्स मॉनिका येथे एक भव्य लॉन्जेव्हिटी सेंटर आहे. त्याचे संचालक आहेत नाथान प्रिटकीन. त्यांचे व्यायामाविषयी व खाण्या-पिण्याविषयीचे विचार त्यानी त्याच्या दोन बेस्टसेलर पुस्तकात दिले आहेत. १) प्रिटकीन प्रोग्रॅम फॉर डायेट अॅन्ड एक्झरसाईज २) लिव्ह् लॉंगर नाऊ ही ती दोन पुस्तके.

सर्व वॉलेसचे म्हणणे असे आहे की, अमेरिकेत या दशकात खाण्या-पिण्याच्या बाबतीत टोटल रिव्होल्यूशन होईल. या समग्र क्रांतीची घुसखोरी अमेरिकेतून इतर देशात येईल. प्राणिजन्य प्रथिनाचे सेवन आठवड्याला फक्त ७॥ पौंड, ७०० मिलिग्रॅम कॅलॅस्टेरॉल, चरबी सर्व कॅलरीच्या फक्त १०% व सर्व प्रकारची प्रथिने कॅलरीच्या १५% पेक्षाही कमी व सर्व खाद्यपदार्थ unrefined असतील. असे प्रमाण सर्वसामान्य अन्नसेवनात राहील. आधी काही थोडेच लोक याप्रमाणे राहतील. त्यांचे अनेक प्रकारचे दुखणे या पद्धतीनुसार अन्नसेवन केल्यामुळे नाहीसे झालेले असेल. १९८५ मध्ये अमेरिकेतील जवळजवळ निम्मी प्रजा असे सेवन करील व १९९२ मध्ये अशा प्रकारचे अन्नसेवन देशव्यापी होईल. (अनरिफाइन्ड साखर कुठे मिळते हो ? )

या प्रकारचे अन्न, पिणे नाही, धूर सोडणे नाही, नियमित व्यायाम वगैरे कारणामुळे इ. स. २०३० च्या काळात शंभरी ओलांडलेले (व एकटेपणाने ग्रासलेले) अनेक वृद्ध वाढतील. मग त्याची पावडर करून खावी असे एखादे सोल्यूशन तर निघणार नाही ना ? Soylent Green !

—जे. एन्. पोंडा

रंगभूमी

# पंखांना ओढ पावलांची

## दृष्ट लागण्याइतका देखणा प्रयोग

वर्तमानपत्रात नाटकाचा ठळक मथळा आणि त्याच्या नावातील नऊ अक्षरे पाहिल्यानंतर वाटलं, 'बाळ कोल्हटकरांचं नवं नाटक आलेलं दिसतंय;' पण संपूर्ण जाहिरात जवळून पाहिल्यावर लेखक–वसंत कानेटकर आणि दिग्दर्शिका विजया मेहता या दोन नावानी लक्ष वेधून घेतले. श्रीमती शांता निसळ यांच्या 'बेघर' या कादंबरीवर आधारित हे नाटक चंद्रलेखातर्फे 'प्रकाशित' (हा खास चंद्रलेखी शब्द) करण्यात आले. 'बेघर' वर डॉ. जब्बार पटेल एक चित्रपटही काढत असल्याचे ऐकतो.

'बेघर' कादंबरीच्या लेखिका श्रीमती शांता निसळ या १९६० च्या सुमारास सावंतवाडी येथील निवारागृहाच्या अधीक्षिका असताना त्यांना ज्या कथा ऐकायला, पहायला आणि अनुभवायला मिळाल्या त्यांच्या मिश्रणातून बनलेले रसायन म्हणजे 'बेघर' ! शांताबाईंच्याच शब्दांमध्ये सांगायचे तर– 'या कादंबरीत निर्माण केलेल्या व्यक्तिरेखा मी पाहिलेल्या आहेत; पण मनाचं भिंग कधी अंतर्वक्री करून, तर कधी बहिर्वक्री ! त्यामुळं ते मूळच्या व्यक्तिरेखाचं छायाचित्र तर नाहीच, आरशातलं रूपही नाही. ते आहे चित्रकलेचं रूप ! मनाच्या कुंचल्यानं पाहिजे त्याप्रमाणं बदल करून रंगवलेलं. त्यामुळं कुणीही माझ्यावर हे माझं छायाचित्र, निदान ही माझी सावली आहे, असा दावा करू शकणार नाही !' त्याचे शब्द एवढ्यासाठीच दिले की, जाहिरातीत म्हटल्याप्रमाणे त्यांची कादंबरी हा केवळ आधारच राहावा इतकी ती कलाकृती नाट्याविष्काराच्या लोलकातून बाहेर पडताना बदलली आहे. नावा–गावाचे किरकोळ तपशील सोडून देऊन कलाकृतीचा आशय व उद्दिष्ट म्हणून संक्षेपित होणाऱ्या परिणामाचा विचार केला तरीसुद्धा हा बदल लक्षात येण्याइतका मोठा आहे.

सौ. सेवा संजीव महाजन नावाची एक स्त्री एका विशिष्ट ध्येयाने झपाटून, आपल्या निष्ठा आणि ज्ञान एका विशिष्ट कार्याला वाहण्याच्या निश्चयाने स्वतःच्या सुखी संसाराचा त्याग करून संगमवाडीच्या 'स्त्री-निकेतन' संस्थेत पूर्ण वेळ–पगारी अधीक्षिका म्हणून दाखल होते. त्या संस्थेतील प्रवेशित स्त्रियांच्या समस्या स्वत.ची सदसद्विवेकबुद्धी आणि व्यक्तिसाहाय्याचे निकष याच्या जोरावर शक्य तितक्या चागल्या मार्गाने, प्रसंगी नियमबाह्य मार्गांनीसुद्धा सोडविण्याचा प्रयत्न करते. यातूनच तिचा आणि संस्थेच्या व्यवस्थापनाचा झगडा उद्‌भवतो. व्यवस्थापनातील दिखाऊ, ढोंगी समाजसेवक, मुलींच्या कल्याणाच्या नावाखाली त्यांना केवळ नियमावर बोट ठेवून संकटात लोटण्याचा चाललेला उपद्व्याप या साऱ्यांचा उबग येऊन सेवा नोकरी सोडते. त्याच वेळी व्यवस्थापनातर्फे तिच्यावर अनेक खोटेनाटे आरोप केले जातात. त्या खटल्याच्या दिव्यातून ती तावून निर्दोष बाहेर पडते. सेवाच्या सासूबाईंनी हरिजनांच्या उद्धारासाठी 'नीलायन' नावाची संस्था काढलेली असते. सेवा त्यानंतर 'नीलायन' ची जबाबदारी स्वतःच्या खाद्यावर घेते आणि स्वत.चे परित्यक्त घरही पुन्हा आपलेसे करते. अशी ही कादंबरीची कथा–किंवा कथेचा गोषवारा.

सौ. साधना संजीव महाजन नावाच्या तरुणीच्या मनात तिचे पूर्वाश्रमीचे प्राध्यापक डॉ. राजवाडे सामाजिक कार्याची महत्त्वाकांक्षा उत्पन्न करतात. पण या महत्त्वाकांक्षेत समाजसेवेपेक्षा स्वत.च्या अंगभूत सामर्थ्याचा (Potential) वापर करून स्वतःला स्वतंत्र व्यक्तित्व (identity) मिळविणे हा उद्देश अधिक असतो. साधनाही आपले घर सोडून रतनपूर या दुसऱ्या गावी एका महिलाश्रमाची अधीक्षिका म्हणुन रुजू होते. तिच्या निष्ठा, तिचे वेगळे मार्ग यामुळे तिचेही,

व्यवस्थापनाशी झगडे होऊन त्याचे पर्यवसान तिच्यावर निरनिराळे आरोप ठेवण्यात होते डॉ. राजवाड्यांच्या मदतीने सर्व बालंटे निस्तरून साधना महिलाश्रमाचा राजीनामा देते. त्यानंतर संजीव तिला परत घरी न्यायला आला असतानाही अशा पराभूत अवस्थेत घरी येण्यास नकार देऊन आपल्या अपुऱ्या शोधाचा वेध घेण्यासाठी साधना मुंबईची दुसरी नोकरी स्वीकारतो. ही नाटकाची कथा!

'बेघर' ही कादंबरी पुढे सरकते ती दोन रूळावरून. एक रूळ आहे स्त्री–निकेतन मधील अन्य व्यक्तींच्या जीवनातील घटनांचा सेवाशी येणारा संबंध. या बहुतेक सर्वच घटना त्यातील विविधतेमुळे आणि वेगळेपणामुळे मुळातच बऱ्याच नाट्यपूर्ण आहेत. दुसरा रूळ आहे सेवाच्या मनोविचाराचा आणि त्या अनुषंगाने तिच्या घरगुती आयुष्यातील घटनाचा. याउलट 'पंखांना ओढ पावलाची' मध्ये एका व्यक्तीची एक स्वतंत्र व्यक्तित्व मिळविण्यासाठी चाललेली धडपड ह्या प्रवाहातून नाटक वाहत जाते आणि त्याला त्याच प्रवाहातून पुढे सरकविण्यासाठी साधनाच्या कुटुंबातील आणि महिलाश्रमातील घटना वल्ह्याचे काम करतात.

'बेघर' आणि 'पंखाना ओढ पावलांची' या दोन्हीची तुलना परिहार्य आहे आणि 'बेघर' चा आधार न घेताही केवळ नाटकाबद्दल लिहिणे शक्य आहे, हे मान्य करूनही दोन्ही कलाकृतीमधील मान्यताप्राप्त दुव्यामुळे दोन्हीमधील साम्यस्थळाचा आणि विरोधस्थळाचा विचार करणे जरुर आहे, असे मला वाटते.

१. दोन्हीमधील प्रमुख कथासूत्राचा विचार याआधी केला आहेच.

२. व्यक्तिरेखा–संजीव महाजन, सेवाची / साधनाची मुलगी करुणा / तितली, श्रीमती शीलाबाई (स्त्रीनिकेतन / महिलाश्रमाच्या व्यवस्थापनाच्या अध्यक्षा) आणि स्त्रीनिकेतन / महिलाश्रमातील अन्य व्यक्ती (कर्मचारी+प्रवेशिता स्त्रिया) या व्यक्तिरेखा दोन्हीकडे जवळपास सारख्याच आहेत. फरक उरतो तो मुख्यतः पुढील व्यक्तिरेखांमध्ये–

अ) डॉ. राजवाडे–'बेघर'मध्ये नसलेले आणि नाटककाराने सर्वस्वी स्वतःच्या अखत्यारीत जन्माला घातलेले हे पात्र. साधनाचे महिलाश्रमात जाणे हे समाजसेवेसाठी नसून व्यक्तित्वाच्या शोधासाठी आहे, या नाटकातील प्रधान सूत्राशी मिळतेजुळते असे हे पात्र. स्वतःच्या आयुष्यातील बाधिलक्याना बंधने पडू नयेत, म्हणून स्वतःचे विवाहबंधन तोडून, पत्नीशी घटस्फोट घेऊन एकटे मनचाहे जीवन जगणारा हा समाजशास्त्राचा प्राध्यापक. साधना या आपल्या सरांना फक्त आदरणीय व्यक्ती म्हणून पाहत नाही, तर आपल्या मनातील पुरुषी आदर्शाची मूर्ती म्हणून त्यांच्याकडे पाहते. सराच्या आग्रहाखातर संसार सोडून महिलाश्रमात जाणे, सराच्या घटस्फोटानंतर ते आपल्याला 'माझ्याशी लग्न करशील का?' असं कदाचित विचारतील, अशी कल्पना करणे आणि महिलाश्रमाच्या हताश पराभवानंतरही आपल्या पावलांची, आपल्या घरट्याची ओढ नाकारून साधनाने पुन्हा पंख पसरून सरानी शोधलेल्या नव्या नोकरीकडे झेपावणे या गोष्टीमधून तिची स्वत.चे वेगळेपण प्रस्थापित करण्याची धडपड दिसते. त्याचबरोबर या आदर्श मूर्तीबद्दलचे सुप्त आकर्षणही दिसते. प्रेक्षकांपुढे मात्र डॉ. राजवाडे हे इतक्या आदर्श स्वरूपात संक्षेपित होत नाहीत. उलट प्रसिद्धीची, ग्लॅमरची हाव असलेला, कदाचित त्यालाच जीवनातील चलत्प्रेरणा (डायव्हिंग फोर्स) मानणारा एक हुशार आणि अभ्यासू माणूस अशा स्वरूपात डॉ. राजवाडे उभे राहतात. डॉ. राजवाड्यानी स्वतःच्या ओळखीचा वापर करून आपल्या एका विद्यार्थिनीला परदेशी पाठविणे, त्याच ओळखीच्या जोरावर साधनासाठी ब्रिटिश कौन्सिलची एक शिष्यवृत्ती आणि महिलाश्रमाची नोकरी मिळवून देणे, त्याच जोरावर साधनाची आरोपांमधून सुटका करणे आणि तिला नवीन नोकरी उपलब्ध करून देणे, 'समाजशास्त्रज्ञाच्या आंतरराष्ट्रीय वर्तुळामध्ये प्रवेश' हे ध्येय साधनापुढे मांडणे इत्यादि गोष्टीमधून उभा राहतो तो या प्रसिद्धि-वलयाच्या मागे धावणारा आणि ते प्राप्त करून घेण्यासाठी सतत हिशेबी आकडेमोड करणारा एक व्यापारी! मग हा हिशेबीपणा डॉ.राजवाड्यांच्या आजपर्यंतच्या आयुष्यातील समाजकार्याच्या अनुभवांमुळे आला का? अर्थात हा प्रश्न अनुत्तरित राहिल्याने फारसे बिघडत नाही. मात्र साधनाच्या स्वत.साठी स्वतंत्र व्यक्तित्वाचा वेध घेण्याच्या प्रयत्नातील धार या गोष्टीने बोथट होऊन जाते. अर्थात या गोष्टीचा विचार पुढे साधनाच्या व्यक्तिरेखेचा विचार करताना होईलच. 'बेघर'मध्ये डॉ. राजवाडे ही व्यक्तिरेखा अस्तित्वातच नसल्याने दोन्हीच्या तुलनेचा प्रश्नच उद्भवत नाही.

## कादंबरी आणि नाटक–साम्य-भेद

आ) चदना बनसोड–सेवा / साधनाने घर सोडण्याचा निर्णय घेतला असतानाच चंदना या हरिजन मुलीचा महाजनांच्या घरी होणारा प्रवेश, तिला त्या घराबद्दल वाटलेली ओढ आणि (सेवा / साधनाच्या अनुपस्थितीमुळे?) संजीवबद्दल वाटणारे आकर्षण, बऱ्याच अंशी तिने सेवा / साधनाची भरून काढलेली जागा या गोष्टी कादंबरी व नाटक दोन्हीकडे समान आहेत. चंदनाला संजीवविषयी वाटणाऱ्या आकर्षणाची साधनाने संजीवला दिलेली जाणीव आणि त्याच वेळी ते साधनाचे बोलणे ऐकल्यामुळे चंदनाला उमगलेले स्वत.चे स्थान या गोष्टी नाटकात फारच सुंदर रीतीने व्यक्त झाल्या आहेत. याउलट कादंबरीमध्ये मात्र काही पुसटते संदर्भ वगळता चंदना व सेवाच्या अखेरच्या संवादांमधून अत्यंत ढोबळ व बटबटीतपणे या गोष्टी आल्या आहेत. त्या संवादामधून दिसणारा चंदनाला स्वतःच्या जातीबद्दल असलेला न्यूनगंड आणि जानकीबाई (संजीवची आई) आणि संजीव याना असलेल्या अहगंडाबद्दलची (तो अहंगंड हाही प्रत्यक्षात नसून चदनाच्याच डोक्यातील कल्पना आहे का?) अढी हे दोन्ही तिच्या आधीच्या व्यक्तिमत्त्वाशी, जानकीबाईंनी चालवलेल्या हरिजनकार्याशी, महाजनाच्या वातावरणाशी आणि घरातील सर्व माणसाकडून चंदनाला मिळणाऱ्या वागणुकीशी पूर्णतः विसंगत आहे. ज्या घरात करुणा चंदनाला 'चंदन आई' म्हणून हाक मारते, त्या घराला आपली गरज 'गृहकृत्यं करणारी दासी' म्हणून होती, ही भावना चंदनाच्या मनात असेल, हे पटत नाही. नाटकात मात्र चंदनाला स्वतःच्या मनातील संजीवबद्दलचे आकर्षण साधनाच्या तोडून व्यक्त झाल्यानंतर झालेल्या स्वतःच्या

स्थानाच्या जाणिवेपाशीच सोडून दिलेले आहे. चंदनाच्या भवितव्यातील अधुरेपण, अनिश्चितता, कादंबरीत आहे, नाटकातही आहे; पण साधना परतेपर्यन्त, कदाचित त्यानंतरही ही वेगळी जाणीव घेऊन महाजनांच्या घरी राहणारी चदना खरी वाटते, तिचे अधुरेपणही अधिक हुरहूर लावते. याउलट कादंबरीतील चंदनाच्या कृत्रिम आक्रोशामुळे आणि 'अपरिपक्व विचारांमुळे ही अनिश्चितता वा अधुरेपण चंदनाचे पात्र विसरून जाण्याइतके तकलादू बनले आहे. चंदनाचा हा आक्रोश केवळ 'माझी जात म्हणजे उल्का नव्हे काय? या उल्केला वाटत होतं, आपण तारा बनू; पण आता कळलं उल्का बनण्याचा शाप मिळालेल्या अशनीला तारका बनण्याचा वर कधीच मिळू शकणार नाही!' किंवा 'आम्ही नुसता फळवळघाचा तुकडा चघळीत बसायचा. नुसत्या सहानुभूतीवर जगायचं.' किंवा 'युगानुयुगं आमची शरीरं घाण उचलीत आहेत. ती घाण आमच्या शरीराला लागली आहे असं ह्या सवर्णीय पुरुषांना वाटतं.' (हे वाक्य खरे मानायचे झाल्यास अनेक हरिजन स्त्रियावर होणारे बलात्कार खोटे मानावे लागतील.) अशी ठेवणीतील वाक्ये वापरण्यासाठी टाकलेला आहे, असे वाटण्याइतका ठिगळलेला आहे. आता हा आक्रोशच तकलादू ठरल्यामुळे त्याचीच दुसरी बाजू माडण्यासाठी सेवाच्या मनातील विचारतरंग–'चंदनाला एका विशिष्ट गंडानं पछाडलं नव्हतं का? सासूबाईंच्याबद्दल तिचा दुराग्रह होता की खरं मत होतं?'– यांनाही काहीही महत्त्व उरत नाही. उलट हा दुसरी बाजू दाखविण्याचा प्रयत्न अधिकच केविलवाणा ठरतो.

इ) जानकीबाई– बेचाळीसच्या लढ्यात पायावर लाठी बसल्याने एक पाय अधू झालेली ही संजीवची आई चंदनाप्रमाणेच हेही पात्र कादंबरीपेक्षा नाटकात अधिक चांगले आणि अधिक पटण्यासारखे उतरले आहे. जुन्या जमान्यात वाढलेली, गेल्या पिढीचे संस्कार अंगावर वागवणारी ही वृद्धा. आधुनिक काळाची गरज भागविणाऱ्या हरिजनोद्धाराच्या तिच्या समाजकार्यातही नाटकामध्ये या जुन्या संस्काराचे छाप उमटलेले आहेत. याउलट कादंबरीत मात्र जानकीबाईंना आभाळाएवढ्या मनाची, समाजसेवी, ध्येयवादी, गुणग्राहक आणि अशी बरीच बरीच महिला करून टाकले आहे आणि तेही अचानक एका प्रसंगात. जवळजवळ दोन वर्षे सेवा घराबाहेर राहून काम करीत असताना तिची अथवा तिच्या कामाची विचारपूस करण्याचीसुद्धा आस्था न दाखवणाऱ्या जानकीबाई, सेवा घरी आल्यानंतरही जणू ती अनोळखी असल्याप्रमाणे त्रयस्थपणे अथवा तिची दखलही न घेता वावरणाऱ्या जानकीबाई अचानक सेवाच्या एका नमस्काराने आपल्या 'नीलायन' संस्थेची सर्व जबाबदारी तिच्या अंगावर टाकतात, हे एखाद्या हिंदी चित्रपटात शोभून दिसले असते. जानकीबाईंची ही संस्थाही नाटक आणि कादंबरीत बऱ्याच तफावतीसह येते. घर–गृहस्थी सांभाळून उरलेल्या वेळातच समाजसेवा करणाऱ्या नाटकातील जानकीबाईंचा आश्रम हाही तसाच छोट्या प्रमाणावर राहिला आहे. याउलट कादंबरीतील जानकीबाईंच्या 'नीलायन'चे वर्णन एखाद्या पुढारलेल्या पाश्चात्य देशातील प्रशालेला लाजविणारे आहे. हे संपूर्ण वर्णन म्हणजे लेखिकेच्या कल्पनेतील आदर्श स्वप्न कागदावर उतरविण्यासारखे आहे. फक्त कादंबरीत मात्र जागेपणीची प्रत्यक्ष वस्तुस्थिती अशा स्वरूपात ते येत असल्यामुळे ते कृत्रिम वाटत राहते.

## स्वतंत्र की पराभूत व्यक्तित्व?

ई) सेवा / साधना – कादंबरी व नाटक यातून उभ्या राहणाऱ्या नायिकेच्या व्यक्तिरेखामधील फरक त्यांच्या नावापासूनच सुरू होतो कादंबरीची नायिका सेवा ही समाजसेवा हे एक व्रत आहे असे मानते. त्यासाठीच आपल्या सुखी संसाराचा त्याग करून 'स्त्री–निकेतन' मधील हतभागी, दुर्दैवी स्त्रियाची आयुष्ये सुखी करण्याचा तिचा प्रयत्न चालू आहे. याउलट साधनासाठी महिलाश्रमात काम करणे हे तिच्या बुद्धीला, तिच्या अंगभूत सामर्थ्याला मिळालेले एक आव्हान आहे, घरच्यांचा विरोध सहन करून स्वतःसाठी एक स्वतंत्र व्यक्तित्व शोधण्याचा तिचा चाललेला खडतर प्रयत्न (=तपश्चर्या=साधना) आहे. या दोन अत्यंत भिन्न अशा व्यक्तिरेखाटनांमुळेच कादंबरी आणि नाटकामध्ये शेवटी सेवा आणि साधना अतिशय भिन्न मार्ग स्वीकारतात. ज्या घराला सोडून सेवा समाजसेवेसाठी बाहेर पडलेली असते, त्याच घराचा आसरा घेऊन त्याच्याच सावलीत वाढणाऱ्या 'नीलायन'चे काम ती नंतर स्वीकारते. सेवाची बांधिलकी समाजसेवेला आहे, घराच्या कोंडवाड्यात मारल्या जाणाऱ्या स्त्रीच्या व्यक्तित्वाला नाही. अर्थातच तिच्यासाठी समाजसेवेचे दुसरे दालन खुले होताच तिने घरासकट त्याचा स्वीकार करणे स्वाभाविकच आहे. याउलट नाटकामध्ये साधनाची निष्ठा स्वतःच्या स्वतंत्र व्यक्तित्वाच्या शोधाला आहे, अर्थातच नाटकाच्या अखेरीस आधी सोडून आलेल्या घराचे परत बोलावणे नाकारून साधना याच शोधासाठी अन्य ठिकाण शोधते. प्रश्न उरतो तो एवढाच–ही दोन भिन्न भिन्न व्यक्तिरेखाटने दोन्हीकडे त्यांच्या आधी उल्लेखलेल्या वैशिष्ट्यांना साकार करण्याइतकी व्यवस्थित उतरली आहेत का? माझ्या मते, कादंबरीतील सेवा ही निरलस समाजसेविका आणि सेवामूर्ती म्हणून उभी राहते; पण साधना मात्र स्वतःच्या स्वतंत्र व्यक्तित्वाचा शोध घेण्याचा प्रयत्न करते, असे वाटत नाही. (साधना तशी म्हणजे स्वतःला identity मिळविण्याचा प्रयत्न करणारी व्यक्ती म्हणून प्रेक्षकांपुढे उभी रहावी, असा उद्देश नाटकाच्या दिग्दर्शिका श्रीमती विजया मेहता यांनीच व्यक्त केला. मला वाटते, लेखक श्री. वसंत कानेटकरांचाही या उद्देशाशी मतभेद होईल, असे वाटत नाही.) प्रत्यक्षात मात्र स्वतःच्या महत्त्वाकांक्षेसाठी, काही तरी वेगळे करून दाखविण्याच्या जिद्दीसाठी प्रयत्न करणारी-थोडक्यात वेगळ्या पातळीवरून, पण डॉ. राजवाड्यांनाच समांतर धावणारी एक स्त्री म्हणून साधना उभी राहते. स्त्री समाजसेविकेला + नोकरी करणाऱ्या स्त्रीला + कोणत्याही व्यवस्थापनाच्या चौकटीत बांधल्या गेलेल्या पण वेगळे विचार, वेगळी धोरणे असलेल्या व्यक्तीला येणाऱ्या अडचणी हा या समाधानाचा दुसरा भाग. त्यातील व्यवस्थापनाच्या चौकटीतील बंधनामुळे लटपटणारी, तडफडणारी साधना ही नाटकाच्या उद्देशरूपी साधनेच्या खूपच जवळ जाणारी आहे. याउलट नाटकातील पुढील मुद्दे या identity

च्या शोधातील अडसर म्हणून उभे राहतात.

१) डॉ. राजवाड्याबद्दल साधनाच्या मनात असलेला आदर स्वीकारूनही त्यांच्या शिफारसीमुळे मिळणारी (थोडक्यात, राजवाड्यांचा कृपाप्रसाद म्हणून मिळणारी) शिष्यवृत्ती अथवा नोकरी स्वतंत्र व्यक्तिमत्त्वाची अथवा ते मिळवू इच्छिणारी साधना स्वीकारील का ? या प्रश्नाचे उत्तर 'होय' असे मिळाल्यास साधनामधूनही मिळालेल्या प्रत्येक संधीचा फायदा घेणारा, राजवाड्यांचा हिशेबीपणा डोकावू लागतो.

२) समजा, सुरुवातीला साधनाने डॉ. राजवाड्यांची शिफारस स्वीकारली तरी त्यानंतर कामाबद्दलच्या निष्ठेपेक्षा दिखाऊ समाजसेवेलाच अपरिहार्य तडजोडीच्या गोंडस नावाखाली वाहिलेले डॉ. राजवाडे पाहिल्यानंतरही त्यांचा आदर्श मनात जपणारी साधना स्वतंत्र विचार करणारी कशी म्हणावी ? की डॉ. राजवाडे हा प्रांत तिच्या स्वतंत्र विचारांसाठी मनाई-क्षेत्र मानायचा ?

३) 'स्वतंत्र व्यक्तित्वाचा शोध', 'स्वतंत्र व्यक्तित्वाचा शोध' असे सारखे म्हणत असताना ते स्वतंत्र व्यक्तित्व म्हणजे नेमके काय ? माझ्या मते–कोणतीही गोष्ट–मग ती एखादे कार्यक्षेत्र असो–एखादी कलाकृती असो वा एखादा विचार असो ज्या गोष्टीकडे पाहून पाहणाऱ्याच्या डोळ्यांपुढे साधना ही व्यक्ती उभी राहील, अशी गोष्ट निर्माण करणे वा अस्तित्वात असलेल्या गोष्टीशी अशा प्रकारचे बंध (associations) निर्माण करणे म्हणजे स्वतंत्र व्यक्तित्व मिळविणे. या गोष्टीचे आणि अर्थातच त्या व्यक्तिमत्त्वाचे लहान मोठेपण हे त्या व्यक्तीच्या सामर्थ्यावर अवलंबून आहे. हाच मुद्दा पुढे वाढवायचा झाला तर नाटकाच्या शेवटी तरी साधना म्हणजे एक पराभूत व्यक्तित्व ठरली आहे. तिने महिलाश्रमावर काही छाप पाडणे, ठसा उमटविणे दूरच, महिलाश्रमानेच तिच्यावर अनेक बोचकारे, ओरखडे उमटविले आहेत. या पराभूत अवस्थेतही साधना जर डॉ. राजवाड्यांच्या संरक्षक सावलीखालून बाहेर आली असती तरी तिला किती तरी उंच व्यक्तित्व मिळाले असते; पण त्याच संरक्षक सावलीला उभे राहून पराभवाची डागडुजी करणारी साधना स्वतंत्र व्यक्तित्वाचा शोध घेण्याचा प्रयत्न करणारी स्त्री ठरेल की परभृत व्यक्तिमत्त्व ? या संरक्षित सावलीच्या अस्तित्वामुळे आणि स्वीकारामुळेच घरचे बोलावणे नाकारणारी साधना वाढ शकत नाही.

३. आविष्करण / शैली मुख्यत: कादंबरी आणि नाटकाची संहिता (नाट्यप्रयोग नव्हे) यांचा विचार करायचा झाल्यास मूळ कथाबीज वाढविणाऱ्या कादंबरीचे स्थान वरचे आहे, हे उघडच आहे; पण याचे सर्व श्रेय त्या सुंदर कथाबीजाला आहे. लेखिकेने कादंबरीमध्ये काही ठिकाणी या सौंदर्याला स्वत:च्या अतिसंस्कृतप्रचुर वा अति-अलंकारिक भाषाशैलीने बाधाच आणली आहे. त्याचप्रमाणे कादंबरीतील अनेक प्रसंग हे केवळ दिवास्वप्नी हिंदी चित्रपटात शोभून दिसतील इतके योगायोगांनी खच्चून भरलेले अथवा कृत्रिम आहेत. (सेवावर चालणारा खटला हा सुरुवातीपासून निकालापर्यंत असाच एक फिल्मी विनोद म्हणून बघायला हरकत नाही. सेवाने चंदनाला सोन्याच्या बांगड्या देताना–करुणाची–मुलीची शपथ घालणे, चंदनाने त्या बांगड्या नाकारणे आणि करुणाने नतर पोलिओच्या आजारपणात पाय गमावणे हा तर वैद्यकीय शास्त्राचा आणि पोलिओच्या जीवाणूंचा योगायोगांनी केलेला महान पराभव आहे) सुदैवाने अशा हानिकारक गोष्टींना कानेटकरांनी नाटकातून रजा दिली आहे. (उदाहरणार्थ, साधना मॅनेजिंग कमिटीच्या मीटिंगसमोरच सर्व आरोप निस्तरते, असा उल्लेख करून कानेटकरानी कोर्ट, खटला आणि निकाल वगैरे सर्व भानगडी एका वाक्याच्या फटक्यात मिटवून टाकल्या आहेत. काही कुसुमाग्रजी वाक्ये आणि काही कोल्हटकरी ओळी वगळता नाटकाची उभारणीही कानेटकरानी हुकमी सराइतपणाने केली आहे. शिवाय माध्यम बदलामुळे नाटकावर आलेल्या मर्यादांना अनुलक्षून केलेले बदल नाटकात आहेतच.)

'बेघर' आणि 'पंखांना ओढ पावलांची' संहिता यांच्या तुलनात्मक विचाराला पूर्णविराम देऊन आता नाट्यप्रयोगाकडे वळतो.

दिग्दर्शक विजया मेहता म्हटल्यानंतर अपेक्षित तो रेखीव आणि बांधेसूद प्रयोग येथेही भेटतो. त्याचप्रमाणे संपूर्ण नाटकभर सूत्रगीताप्रमाणे केलेला एका अर्थवाही भजनाचा वापर, ते भजन म्हणजे साधनाच्या आवडत्या गायिकेचे–रेश्माचे टेप केलेले गाणे अशी त्या भजनाची नाटकाशी केलेली एकजीवता, प्रकाशयोजनेच्या साहाय्याने उभे केलेले सजीव परिणाम, 'सहस्रबुद्धे' सारख्या नाटकातील अनावश्यक पात्रालाही काही काही लकबींनी अविस्मरणीय बनविणे इत्यादी अनेक लहान-मोठ्या गोष्टींमधून त्यांचे कल्पक दिग्दर्शन दिसून येते. विशेषत: प्रकाश आणि ध्वनी या तांत्रिक बाजू एखाद्या सुंदर चित्रपटाला शोभणाऱ्या सफाईने विजयाबाईंच्या नाटकात पेश झालेल्या असतात.

कलाकार आणि त्यांचा अभिनय याबद्दल विजया मेहतांच्या अभिनयशाळेत शिकून तयार झालेले एवढा उल्लेख करून त्यांची यादी देणे पुरेसे आहे. साधना–सुहास जोशी, संजीव–प्रभाकर पाटणकर, जानकीबाई–रेखा, तितली–बेबी ममता, चंदना–मीनल परांजपे, शीलाताई–वैजयंती चिटणीस, गंगाराम–दिलीप कोल्हटकर, सहस्रबुद्धे–सुधीर जोशी, उत्पला–स्वाती टिपणीस. या सगळ्या यादीत अपवादाच्या खड्याप्रमाणे टोचणारे आणि बोचणारे एक नाव म्हणजे बाळ धुरी. डॉ. राजवाडे झालेल्या या धुरींच्या बाळाने बाकी सर्व ठिकाणी वर चढणारे नाटक मनोभावे शक्य तितके खाली आणले. खरे म्हणजे नाटकातील ताण कमी व सह्य करण्यासाठी काही ठिकाणी नर्म विनोद, काही विनोदी पात्रे नाटकाच्या दिमतीला दिलेली असताना आपल्यावरही ती जबाबदारी सोपवलेली आहे, असे बाळ धुरींनी मानण्याचे काही कारण नव्हते.

हा एकमेव तिळाचा ठिपका सोडल्यास बाकी प्रयोग दृष्ट लागण्याइतका देखणा होता.

–सदानंद बोरसे

# पुणे वार्ता

पृष्ठ २ वरून

वृक्षारोपणाच्या जागेकडे जाऊ लागले. इतक्यात मुख्यमंत्र्यांची गाडी पुन्हा पोर्चमधून बाहेर पडू लागली. सगळ्यांचीच पळापळ सुरू झाली. सीएमसाहेब असे अचानक निघाले कुठे ? प्रोग्रॅममध्ये तर वृक्षारोपण आहे. बडे बडे अधिकारी रस्त्यावर टाग्याच्या मागे लहान पोरं धावतात तसे सीएमसाहेबांच्या गाडीमागे धावू लागले. कौन्सिल हॉलच्या आवारातच अगदी डावीकडे उभारलेल्या एका शामियान्याजवळ गाडी जाऊन थाबली.

या शामियान्यातच खास 'जनता दरबार' होता. आपापली गाऱ्हाणी, अडचणी घेऊन आलेल्या असंख्य पुणेकरांनी सकाळपासूनच शामियान्याचा ताबा घेतला होता. मुख्यमंत्री आतमध्ये शिरले आणि एकच हलकल्लोळ सुरू झाला. जो तो मुख्यमंत्र्यापर्यंत पोचण्यासाठी घुसू लागला, प्रचंड ढकलाढकली व कोलाहल माजला. तशा गडबडीतच मुख्यमंत्र्यांनी पाच-सहा लोकाच्या अडचणी समजावून घेतल्या आणि 'आता मुख्यमंत्री दुपारी पुन्हा जनतेची गाऱ्हाणी ऐकण्यासाठी येतील', असं पुण्याच्या पालकमंत्र्यांनी ( जयवंतराव टिळक ) आपल्या दमदार आवाजात सांगितल्यावर साहेब पुन्हा बाहेर पडले.

बहुतेकांना वाटलं की, हा एक नवा फार्स दिसतोय, नवा स्टंट दिसतोय; पण सकाळी दिलेल्या आश्वासनाप्रमाणे दुपारी मुख्यमंत्री खरोखरच शामियान्यात आले आणि मग या दरबाराला जो रंग भरला तो प्रतिदिनी वाढत आणि चढतच गेला. एकेक माणूस लेखी निवेदन घेऊन पुढे येत होता, आपले गाऱ्हाणे मांडत होता. अंतुलेसाहेब ऐकत होते. काही उपप्रश्नही विचारत होते आणि त्याक्षणी डोक्यात जसं चमकून जाईल तसा आदेश देत होते. सीएमसाहेबांचा आदेश योग्य तऱ्हेने नोंदवताना स्टेनो आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांची नुसती धावपळ उडत होती. कुणाच्या अर्जावर स्वत:च शेरे मारून, कुणाला आर्थिक सहाय्यासाठी चेक फाडून, तर एखाद्याला 'हे जमण्यातलं नाही' असं स्पष्ट सांगून समोर येणाऱ्या प्रकरणाचे धडाधड तुकडे पाडत होते. या तक्रारी किंवा अडचणींचं स्वरुप सर्वसमावेशक होतं. कुणाची बैलजोडी चोरीला गेली होती, कुणाला महाविद्यालयात प्रवेश हवा होता.

जोशी-अभ्यंकर हत्याकाडातील फाशीची शिक्षा झालेल्या चार गुन्हेगारांपैकी मुनावर शा या गुन्हेगाराची आई तर मुलाची फाशीची शिक्षा रद्द करण्यात यावी, अशी याचना करण्यासाठी आली होती. तिची ती विनंती मुख्यमंत्र्यांनी साफ नाकारली, पण त्याचबरोबर तिला काही आर्थिक मदतही केली.

हे सारंच दृश्य अनोखं होतं. अनेकजण यामुळे भारावून गेले, तर काहीजण म्हणाले, 'आज सीएमची भेट सहज झाली; पण त्याने मारलेल्या शेऱ्यानुसार काम करून घ्यायला या माणसाला सरकारी कचेऱ्यांचे उंबरे झिजवावेच लागतील.' एक गोष्ट मात्र निश्चित, हे सारं काही तरी वेगळं आहे, अपूर्व आहे याची कबुली सर्वजण देत होते.

दहा तारखेलाच पुणे बार असोसिएशनतर्फे मुख्यमंत्र्याच्या सत्काराचा कार्यक्रम होता. अपेक्षेनुसार तिथेही ते तास-दीड तास उशीराच आले. आल्यावर जोरदार भाषण केलं. स्वातंत्र्य आणि लोकशाहीबद्दल बुद्धिजीवी लोकांनी तयार केलेल्या संकल्पनांपेक्षा मी गरीबाच्या पोटात अन्नाचे चार घास घालण्याला जास्त महत्त्व देतो,' असं ठासून सांगितलं. जमलेल्या सगळ्या वकिलांनी टाळ्या पिटल्या.

रात्री पुणे विद्यापीठातर्फे सबंध मंत्रिमंडळाला भोजन होतं. त्यावर 'या कार्यक्रमामागे शैक्षणिक हेतू नसल्याने' कार्यक्रमावर मनाई हुकूम मिळविण्याचा प्रयत्न पुण्यातल्या स्टुडंटस फेडरेशन ऑफ इंडिया या विद्यार्थी संघटनेने केला. त्यांचं हे करणं प्रामाणिक असेल तर 'मुलं फारच भाबडी आहेत'


## NEW TITLES RECEIVED

| | | Rs. |
|---|---|---|
| 1. | **The Serengetti Lion** (Wild life – National Book Award winner) : George B. Schaller | 96·55 |
| 2. | **The Snow Leopard** (Travel–Philosophy): Peter Matthiessen | 22·90 |
| 3. | **Goodbye Jenette** (Bestseller Novel) Harold Robbins | 25·00 |
| 4. | **The Executioner's Song** (Bestseller–Non fiction Convict Gary Qilmore's story) · Norman Mailer | 38·40 |
| 5. | **Fanny** (Bestseller Novel) : Erica Jong | 44·35 |
| 6. | **The Lives of A Cell** (Bestseller–National Book Award Winner) : Lewis Thomas | 25·65 |

( Science made simple and enchanting ! )

☐ *Hema Malini is ( or was ? ) called a dream girl. At 22, Phoenix, too, is a dream of a Library ! !*

**THE PHOENIX LIBRARY**
727, Sadashiv, Pune – 411 030

MANOOS (Marathi Weekly) 100 Paise Regd. No. PNC-W 28
(Licensed to post without prepayment of postage-No. 11)

यापलीकडे काय बोलणार ?

विद्यापीठाच्या पदवीदान सभागृहात भोजनाचा कार्यक्रम होता. याच वेळी स्टेट बँक ऑफ इंडियातर्फे पुणे विद्यापीठात ऊर्जाविषयक संशोधन करण्यासाठी एक अध्यासन निर्माण करण्याच्या दृष्टीने सुमारे सव्वासहा लाख रुपयांचं अनुदान देण्यात आलं. मुख्यमंत्र्यांनी तो चेक विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. राम ताकवले यांच्या स्वाधीन केला आणि मग ते बँकवाल्यांवर तुटून पडले.

भोजनानंतर सर्व मंत्र्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार होणार होता; पण कित्येकांनी या कार्यक्रमाला हजर राहण्याचंसुद्धा सौजन्य दाखवलं नाही. हातावर पाणी पडल्याबरोबर जो तो आपापली पळी-पंचपात्री घेऊन बाहेर !

अकरा आणि बारा जुलैला मंत्रिमंडळाची बैठक होती. 'जनता दरबार' होताच. बारा तारखेला दुपारी चार वाजता मुख्यमंत्र्यांची पत्रकार परिषद होती. मंत्रिमंडळाने दोन दिवस चाललेल्या बैठकीत पश्चिम महाराष्ट्र व पुणे विभागाच्या समस्यासंबंधी घेतलेले महत्त्वाचे निर्णय या पत्रकार परिषदेत जाहीर केले जातील, अशी अपेक्षा असल्याने पत्रकार मंडळी मोठ्या प्रमाणावर जमली होती; पण एकूण हा बार अगदीच फुसका निघाला. काही तरी थातुर-मातुर, मचूळ 'पॉलिसी डिसिजन्स' जाहीर करून सीएमनी प्रे. कॉं. आटपली.

रात्री सीएमतर्फे सर्व पत्रकारांना 'ब्लू डायमंड'मध्ये 'स्नेहभोजना'चं निमंत्रण होतं. ते झालं आणि तीन दिवसाच्या धावपळीवर पडदा पडला. पोलीस, शासकीय अधिकारी आणि पत्रकार-तिन्ही गटांची मंडळी मोठ्या व्यापातून सुटका झाल्यासारखी पांगली.

¤

मंत्रिमंडळाच्या बैठकीच्या निमित्ताने विरोधी पक्ष व संघटनांनाही एक मोठा फायदा झाला. वार्षिक अहवालात नोंदवण्यासाठी कार्यक्रम मिळाला- मंत्रिमंडळाच्या पुण्यातल्या बैठकीच्या वेळी कौन्सिल हॉलवर मोर्चा- निदर्शनं- धरणे- अटक ! जनता-भाजपच्या लोकाना प्रत्यक्ष कार्यक्रमापेक्षा गर्दी कोणाकडे जास्त, याचीच चिंता जास्त ! बाकी कॉंग्रेस (अरस), शिवसेना, रिपब्लिकन, दलित पँथर यांचा फारसा विचार करण्याचीही गरज नाही. कारण यातली बहुतेक सर्व मंडळी सोय-सवडीनुसार सत्ताधाऱ्यांशी हातमिळवणीही करत असतात. त्यामुळे तीन दिवसात जवळजवळ वीसएक मोर्चे कौन्सिल हॉलवर आले, पण एकाही मोर्चामध्ये चैतन्य नव्हतं. वार्षिक वेळापत्रकातला एक 'आयटम' म्हणूनच हे सारं पार पाडलं. जात आहे, हे स्वच्छ जाणवत होतं. राजकीय पुढाऱ्यांची प्रसिद्धीची हावही घृणास्पद होती.

या मोर्चे-निदर्शनांनी एकच केलं-पोलीस आणि शासकीय यंत्रणेला तीन दिवस विनाकारण दमवलं !

¤

मंत्रिमंडळाच्या या बैठकीने नेमकं काय साधलं ? या बैठकीतून फारसं काही निष्पन्न झालं नसलं तरी अंतुलेसाहेबांनी मात्र बरंच काही साधलं. त्यांचा 'जनता दरबार' चा फार्स झक्कपैकी वठला. मुख्यमंत्र्यांनी दिलेले काही चेक वटतच नाहीत,अशी तक्रार एकीकडे ऐकू येत असतानाच आपण आपलं गाऱ्हाणं डायरेक्ट राज्याच्या मुख्यमंत्र्याच्या पुढ्यात मांडू शकतो, याचंच अनेकांना अप्रूप वाटल्यासारखं दिसत होतं. दुःखावर इलाज व्हावा अशी फारशी कोणाचीच अपेक्षा नसते; पण कोणी तरी आपलं दु:ख, गाऱ्हाणं गंभीरपणे ऐकावं, असं मात्र प्रत्येक दु:खी माणसाला वाटत असतं. ज्योतिषी किंवा बाबा-बुवांचं खरं भांडवल हेच असतं. जनाब अंतुलेंनी ते काम चोखपणे पार पाडलं.

तीन दिवस जवळजवळ सर्व मंत्रिमंडळ पुण्यात असूनही शहरातल्या प्रत्येक कार्यक्रमात मुख्यमंत्री हेच उत्सवमूर्ती राहतील किंवा ते ज्या ठिकाणी उत्सवमूर्ती असतील त्याच कार्यक्रमांना योग्य प्रसिद्धी दिली जाईल, याची काळजी विविध पातळ्यांवर घेतली गेलेली दिसत होती. थोडक्यात, इथे मंत्रिमंडळाची बैठक दुय्यम होती, या निमित्ताने पुण्याला-पश्चिम महाराष्ट्राला मुख्यमंत्र्याचा नबाबीपणा माहीत होणं, हेच महत्त्वाचं होतं. तीन दिवस चाललेल्या या एकपात्री प्रयोगाने आणि मुख्यमंत्र्यांच्या 'शासकीय प्रसिद्धी विभागा'नं हे कार्य निश्चिंतच बऱ्याच अंशी सिद्धीस नेलं !

— प्रतिनिधी

तिसरी आवृत्ती संपत आली
हुकूमशहा सत्तेवर
कसे येतात ?
राष्ट्रवादाची शुभशक्ती
अशुभ केव्हा ठरते ?
या व अशा प्रश्नांची
उत्तरे शोधण्यासाठी....
नाझी
भस्मासुराचा
उदयास्त
लेखक : वि. ग. कानिटकर
आवृत्ती : तिसरी ( सचित्र )
किंमत : रुपये पंचेचाळीस
राजहंस प्रकाशन, पुणे ३०